


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# स्पेशल ऑडिटमधून व्हीआरएसला वगळले

## ● अजित दादांचा बळी घेणा-या विमान कंपनीचा बचाव? ● डीजीसीएचा धक्कादायक निर्णय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अजित पवार यांचा चार्टर विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर आता नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) देशातील चार्टर कंपन्यांच्या विमानाचे स्पेशल ऑडिट करण्याचा निर्णय घेतला असून मात्र यातून व्हीआरएस व्हेंचर या विमान कंपनीला वगळण्यात आल्याने आश्चर्य व्यक्तहोत आहे. कारण याच कंपनीच्या विमानाचा अपघात होउन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बळी गेला आहे.त्यानुसार पहिल्या टप्प्यात प्रमुख १४ कंपन्यांचे स्पेशल ऑडिट करण्यात येणार आहे. मात्र, त्यात अजित पवारांच्या विमान अपघातास कारणीभूत कंपनीचा समावेश नाही. या तपासणीत विमानाची देखभाल कशी आहे, इंजिन व अन्य तांत्रिक गोष्टी कशा पद्धतीने जोपासण्याला आहेत, नियमित तांत्रिक तपासणी होते का, आदी मुद्यांवर भर देण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात ज्या कंपन्यांची तपासणी होणार आहे, त्यामध्ये एअर चार्टर सर्व्हिसेस प्रा. लि., ए. आर. एअरवेज प्रा. लि., एरो एअरक्राफ्ट सेल्स अँड चार्टर, चिप्सन एव्हिएशन प्रा. लि. डेक्कन चार्टर प्रा. लि., ग्लोबल व्हेक्ट्रा हेलिकर्प लि., इन्डो -पॅसिफीक एव्हिएशन प्रा. लि., इंडिया फ्लाय सेफ एव्हिएशन लि., कर्णावती एव्हिएशन प्रा. लि., पवन हंस लि., राजस एरोस्पोटर्स प्रा. लि., रेडबर्ड एअरवेज प्रा. लि., रिलायन्स कमर्शिय डिलर्स लि., झेस्ट एव्हिएशन लि. या कंपन्यांचा समावेश आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे पहिल्या टप्प्यात ज्या १४ कंपन्यांची तपासणी होणार आहे, त्यात अजित पवार यांच्या अपघातास कारणीभूत ठरलेल्या विमानाच्या व्हीआरएस व्हेन्चर कंपनीचा समावेश नाही. या विशेष ऑडिटकरिता डीजीसीएने विशेष पथक स्थापन केले असून, येत्या २५ फेब्रुवारीपर्यंत या कंपन्यांसंदर्भातील अहवाल देण्याचे आदेश या विशेष पथकाला देण्यात आले आहेत.



# ब्लॅक बॉक्स बंद ठेवता येत नाही-रोहित पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाता संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्याकडून सातत्याने शंका उपस्थित केल्या जात आहेत. त्यांनी गेल्या १० फेब्रुवारीला एक पत्रकार परिषद घेत पीपीटीच्या माध्यमाने या अपघाता संदर्भात घातपाताचा संशय व्यक्त केला होता. यानंतर आज राजधानी दिल्लीतून त्यांनी पुन्हा एकदा यासंदर्भात भाष्य केले आहे. 'जर, ब्लॅक बॉक्स बंद असल्याने आम्हाला तपास करता येत नाही, असे कारण दिले गेले, तर मी म्हणतोय, त्यावर शिक्का मोर्तब होईल आणि दादांचा अपघात नव्हता, तर घात होता, हे स्पष्ट होईल', असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

विमान अपघातासंदर्भात बोलातना रोहित पवार म्हणाले, 'या प्रकरणात क्रिमिनल इनव्हेस्टीगेशनची आवश्यकता आहे. भारतीय यंत्रणा असणे आवश्यक आहे. राज्याकडून मुख्यमंत्र्यांनी सीआयडी दिली आहे. तेही चांगलीच गोष्ट आहे. त्याच बरोबर इंटरनॅशनल एजन्सीही असणे आवश्यक आहे. या सर्वांचे कॉम्बीनेशन करून पारदर्शक स्वरुपाचा तपास झाला तर त्यातून ख-या गोष्टी समोर येतील.' याच वेळी, '२०२३ मध्ये मुंबईचा व्हीएसआर कंपनीच्या विमानाचा जो अपघात झाला होता, त्याच्या तपासाचा अहवाल अद्यापही आलेला नाही,' असेही रोहित पवार म्हणाले.



**तर मी म्हणतोय, त्यावर शिक्का मोर्तब होईल -**काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांचे म्हणणे आहे की, व्हीएसआर कंपनीकडून विमानातील ब्लॅक बॉक्स बंद ठेवण्यात येतो. जर ब्लॅक बॉक्स बंद ठेवला तर कुठली माहिती समोर येणार? असे विचारले असता रोहित पवार म्हणाले, विमानातील ब्लॅक बॉक्स बंद ठेवता येत नाही आणि अतूल लोंढे जसे म्हणत आहेत तसे, ब्लॅक बॉक्स बंद केला असले अथवा मुंद्दामहून आज सांगण्यात येत आहे की, ब्लॅक बॉक्स बंद होता. म्हणजे, ख-या गोष्टी बाहेर येउ नयेत, म्हणून आतापासूनच एक कारण लोकांमध्ये पेरले जात आहे, असे आपल्याला म्हणावे लागेल. ब्लॅक बॉक्स बंद ठेवता येत नाही. जर, ब्लॅक बॉक्स बंद असल्याने आम्हाला तपास करता येत नाही, असे कारण दिले गेले, तर मी म्हणतोय, त्यावर शिक्का मोर्तब होईल आणि दादांचा अपघात नव्हता, तर घात होता, हे स्पष्ट होईल,' असे पवार यावेळी म्हणाले.

# दिल्ली स्फोटाची जबाबदारी जैशने घेतली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** युनायटेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिल (यूएनएससी) च्या एका अहवालात दावा करण्यात आला आहे की, दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटाची जबाबदारी जैश-ए-मोहम्मदने घेतली आहे.१० नोव्हेंबर २०२५ रोजी दिल्लीतील लाल किल्ल्यावर एका कारमध्ये स्फोट झाला होता, ज्यात १५ लोकांचा बळी गेला होता. याची चौकशी नॅशनल इन्वेस्टिगेशन एजन्सी करत आहे. एजन्सींनी याला व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूल म्हटले होते. अहवालात जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचाही उल्लेख आहे. ज्यात म्हटले आहे की, पहलगाम हल्ल्यात सामील असलेले तिन्ही दहशतवादीही मारले गेले आहेत. हा अहवाल यूएनएससीच्या १२६७ सँक्शन्स कमिटीला सादर करण्यात आला आहे. ही कमिटी आयएसआयएस, अल-कायदा सारख्या दहशतवादी संघटनांवर लक्ष ठेवते. खीटने महिला दहशतवाद्यांची संघटना स्थापन केली. अहवालानुसार, जैश प्रमुख मसूद अजहरने ऑक्टोबर २०२५ मध्ये महिला दहशतवाद्यांची एक वेगळी शाखा (विंग) तयार केली होती. तिचे नाव जमात-उल-मुमिनात आहे. ही शाखा दहशतवादी कारवायांना पाठिंबा देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. मात्र, ही शाखा संयुक्त (पान २ वर)



# भगतसिंह कोश्यारी एक नंबरचा लफंगा माणूस

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक मोहन भागवत यांच्यावर भाषिक मुद्द्यावरून टीका केली होती. रटाळ प्रवचनाच्या राजकीय टीका टिप्पणी करू नका, असे राज ठाकरे यांनी म्हटले होते. यावर महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी पलटवार केला होता. जी लोक कार्यक्रमाला आली ती सर्व लोक पंतप्रधान नरेंद्र मोदींना घाबरली नसतील. पण, राज ठाकरे हे नरेंद्र मोदींना जास्तच घाबरले आहेत, अशी उपरोधिक टीका कोश्यारी यांनी केली. आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी भगतसिंह कोश्यारी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय.

संजय राउत म्हणाले की, त्याला नीट धोतर नेसता येत नाही, तो काय आम्हाला अक्कल शिकवतोय. जो स्वत? धोतर नीट नेसू शकत नाही, तो ठाकरेंना सांगतोय की मोदींना घाबरू नका. मोदींना कोण घाबरतंय? काल राहुल गांधींनी सांगितलं नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यात डोळ्यात डोळे घालून बोलण्याची हिंमत नाही. गांधींचे भाषण सुरू असताना पंतप्रधान आणि अमित शाह यांनी संसदेतून पलायन केले आणि हे आम्हाला सांगत आहेत. तुमच्या हातात सत्ता आणि एजन्सी आहे म्हणून तुम्ही आम्हाला सांगत आहात. पहिले नीट धोतर नेसायला शिका आणि मग इथे महाराष्ट्रात येउन आम्हाला अक्कल शिकवा. हा एक नंबरचा लफंगा माणूस आहे. त्याला पद्मभूषण दिलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांचा अपमान करणारा हा माणूस आहे. त्याला भारतीय जनता पक्षाने पद्मभूषण दिले. हा बाळासाहेब ठाकरे यांचा विचार नाही मिस्टर फडणवीस हे लक्षात घ्या. त्याला पद्मभूषण देणा-यांना बाळासाहेब ठाकरेंनी जोड्याने मारले असते, अशी टीका त्यांनी केलीय.




महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी म्हटले होते की, संघाच्या कार्यक्रमात आलेले ते मोदींना घाबरून नाही आले. मी राज ठाकरे यांचा आदर करतो. मला असं वाटतं आहे की, राज ठाकरे नरेंद्र मोदींना जास्तच घाबरले आहेत. त्यांनी घाबरलं नाही पाहिजे. त्यांनी मोंदीजींच्या जवळ गेलं पाहिजे. मोदींजींसाठी सर्व जनता समान आहे. ज्याप्रमाणे रामाला त्यांची सर्व प्रजा समान होती, त्याप्रमाणे मोदींजींना देखील सगळे समान आहेत. राज ठाकरे माझ्या लहान भावासारखे आहे. ते खूप चांगले, कडक नेते आहे. त्यांना मी सांगू इच्छितो मोदींना घाबरू नका. तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्मभूमीमध्ये आहात. त्यामुळे घाबरण्याचं काही कारण नाही. घाबरायचं असेल तर चुकीचे काम करण्यास घाबरा, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली होती.

# भाजप म्हणजे विषारी साप-बच्चू कडू

**नागपूर/प्रतिनिधी :** बारामती येथे २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विमान अपघातात राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दुर्दैवी निधन झाले. मुंबईहून बारामतीकडे जात असताना लँडिंगपूर्वी विमानात तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर विमानाचा स्फोट झाल्याचे सांगितले जाते. या अपघाताबाबत विविध स्तरांतून प्रश्न उपस्थित केले जात असून सखोल चौकशीची मागणी होत आहे.या पार्श्वभूमीवर प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी भाजपवर तीव्र टीका केली. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी भाजपवर संशय व्यक्त करत आक्रमक भूमिका घेतली. भाजप म्हटलं की संशयानेच पाहावं लागतं. त्यांनी खांद्यावर हात ठेवला तरी लोक घाबरतात. भाजप म्हणजे विषारी साप आहे. भाजपसोबत ना दोस्ती, ना दुश्मनी. आम्ही दुश्मनी केली आहे. ते कधीही नाग पाठवू शकतात, असे वक्तव्य कडू यांनी केले.



प्रशासनातील निर्णयप्रक्रियेवर भाष्य करताना त्यांनी औषध खरेदीतील केंद्रीकरणावर टीका केली. पूर्वी सिव्हिल सर्जनला औषध खरेदीचे अधिकार होते. आता सर्व अधिकार मंत्रालयात केंद्रीत झाले. त्यामुळे कमिशनखोरी वाढली आणि औषधे महागली, असा आरोप त्यांनी केला. टेंडर प्रक्रियेतही गैरव्यवहार होत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.एमआरईजीएस, लाडकी बहीण योजना आणि अपंगांच्या मानधनाबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. एमआरईजीएसचे पैसे अद्याप मिळाले नाहीत. लाडकी बहिणीचे मानधन वेळेवर दिले जात नाही. अपंगांचे मानधनही रखडले आहे, असे ते म्हणाले. लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना त्यांनी सरकारवर दुहेरी भूमिका घेतल्याचा आरोप केला. लाडक्या बहिणींच्या खात्यात १५०० रुपये टाकून मतं मिळवली असतील; मात्र स्मार्ट मीटरच्या माध्यमातून नागरिकांकडून किती पैसे वसूल केले, याचा हिशेब करायला हवा. एका हाताने दिले आणि दुस-या हाताने घेतले, अशी टीका त्यांनी (पान २ वर)

# लोकसभेत राडा

## काँग्रेसचे खासदार लोकसभाध्यक्षांच्या दालनात घुसले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून लोकसभेत मागच्या काही दिवसांपासून जोरदार गदारोळ सुरू आहे. अशातच आज केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी एक व्हीडीओ पोस्ट करत काँग्रेसच्या खासदारांवर गंभीर आरोप केला आहे. काँग्रेसचे २० ते २५ खासदार लोकसभा अध्यक्षांच्या कार्यालयात घुसले आणि त्यांना शिवीगाळ केली. तसेच या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धमकी दिली, असे रिजिजू यांनी व्हिडिओ शेअर करत म्हटले आहे. लोकसभेत काही दिवसआधीच किरेन रिजीजू यांनी एक व्हीडीओ पोस्ट केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर उत्तराचे भाषण होणार होते. पण, काँग्रेसच्या महिला खासदार (पान २ वर)



# देशात 30 कोटी कामगारांचा एल्गार

## देशव्यापी संपाला मोठा प्रतिसाद

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारच्या कामगार आणि शेतकरी विरोधी धोरणांविरोधात ३० कोटी कामगारांनी देशव्यापी संप पुकारला आहे. वीज, बँकिंग, विमा आणि वाहतूक यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नवीन श्रम कायदे, वीज खासगीकरण आणि मनरेगाच्या मुद्यांवरून कामगार संघटनांनी सरकारला आव्हान दिले.

केंद्रीय ट्रेड युनियन्सच्या संयुक्त प्लॅटफार्मने आपल्या मागण्यांसाठी गुरूवार दि. १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संप केला. ट्रेड युनियन्सचे म्हणणे आहे की हा संप केंद्र सरकारच्या कामगार-विरोधी, शेतकरी-विरोधी आणि देश-विरोधी, कॉर्पोरेट समर्थक धोरणांच्या विरोधात आहे. या आंदोलनात बँकिंग, वीज, विमा, वाहतूक, आरोग्य आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांतील सुमारे ३० कोटी कामगार सहभागी झाले असून आझाद भारताच्या इतिहासातील हा सर्वात मोठा औद्योगिक संप असल्याचे मानले जात आहे.



**बँकिंग आणि विमा क्षेत्रावर मोठा परिणाम-** ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या सरचिटणीस अमरजीत कौर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संपामुळे देशातील बँकिंग आणि विमा सेवांना मोठा फटका बसला (पान २ वर)

# 'मी कायम त्यांना मिस करेन!

**मुंबई** -महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानं संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. २८ जानेवारी २०२६ रोजी मुंबईहून बारामतीला जाणारं चार्टर्ड लिअरजेट ४५ विमान धावपट्टीजवळ कोसळलं, त्यात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. आता ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी या दुःखद घटनेबद्दल शोक व्यक्त केला. त्याचबरोबर अजित पवार हे मला लहान भावासारखे होते, असं म्हणाले आहेत. नाना पाटेकर ANIला दिलेल्या मुलाखतीमध्ये म्हणाले की, 'अजित पवार १९ २० वर्षांचे होते तेव्हापासून माझी आणि त्यांची मैत्री होती. कार्यकर्ता म्हणून काम करत होते, तेव्हापासून मी त्यांना ओळखतो. जिथून त्यांनी सुरुवात केली आणि (पान २ वर)






# रशियाकडून इंधन खरेदी सुरूच

## ■ परराष्ट्र मंत्रालयाची माहिती ■ रशियाकडूनही खुलासा

**मास्को/वृत्तसंस्था :** रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लावरोव यांनी इंधन खरेदी बाबत मोठे वक्तव्य केले असून भारत हा रशियाकडून इंधन खरेदी बंद करणार या चर्चा केवळ अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेच करत असल्याचे ते म्हणाले. ट्रम्प यांच्याशिवाय असा दावा कोणीच करत नसल्याचे ते म्हणाले. लावरोव यांच्या मते, रशिया आणि भारत यांच्यादरम्यान इंधन आणि इतर करार पूर्णपणे सुरक्षित आहेत. गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी भारतासोबतचा व्यापारी कराराचा मसुदा जाहीर केला होता. त्यानंतर हा करार प्रत्यक्षात आला. त्यातही बदल करण्यात आला आहे. त्यावेळी ट्रम्प यांनी दावा केला की, भारताने रशियाकडून कच्चे तेल आयात थांबवण्यास मंजुरी दिली आहे. रशिया इंधन विक्री करून मोठी कमाई करतो आणि हा पैसा युक्रेनविरोधातील युद्धासाठी वापरल्या जात असल्याचा ट्रम्प यांचा आरोप आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये रशियाकडून इंधन खरेदी सुरूच ठेवल्याने अमेरिकेने भारतावर २५% अतिरिक्तटॅरिफ लावला होता.

त्यानंतर या महिन्यात हे टॅरिफ मागे घेतल्याची घोषणा करण्यात आली. पण भारताने पुन्हा जर रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवली तर मागे घेतलेले २५% टॅरिफ पुन्हा लावण्यात (पान २ वर)






# टेकऑफनंतर प्रवासी विमान बीचवर कोसळले

## 55 प्रवासी थोडक्यात बचावले

**मागोदिशू/वृत्तसंस्था :** सोमालियाची राजधानी मोगादिशू येथे स्टार स्काय एअरलाईन्सच्या एका प्रवासी विमानाचा भीषण अपघात झाला. सोमालियातील अदेन आदे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काही वेळातच स्टार स्काय एअरलाईन्सचे प्रवासी विमान तांत्रिक बिघाड झाल्याने हिंदी महासागराच्या किर्ना-यावर कोसळले. सुदैवाने या विमानात असलेल्या सर्व ५५ प्रवाशांना आणि कर्मचा-यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले. हे विमान गलगदुद प्रदेशातील गुरी-एल शहराच्या दिशेने झेपावले होते. प्राथमिक माहितीनुसार, विमानाने उड्डाण (पान २ वर)

## अहमदाबाद विमान अपघात

# खटला मागे घेण्यासाठी पीडित कुटुंबांना लाखोंची ऑफर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**गुजरातच्या अहमदाबादमध्ये १२ जून २०२५ रोजी दुपारी एअर इंडियाचे लंडनला जाणारे विमान अपघाताला बळी पडले होते. लंडनच्या द इंडिपेंडेंट वृत्तपत्रात एअर इंडियावर एक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यानुसार, एअर इंडियाने अपघातात प्राण गमावलेल्यांच्या कुटुंबीयांना अतिरिक्त नुकसानभरपाईच्या बदल्यात खटला दाखल करण्याचा अधिकार सोडण्याचा प्रस्ताव दिला आहे.एअरलाइन कुटुंबांना अतिरिक्त १० लाखांची अंतिम रक्कम देउन समझोता करण्याची ऑफर देत आहे. काही प्रकरणांमध्ये ही रक्कम २० लाख रुपयांपर्यंत आहे. कुटुंबांना ही अट मान्य करावी लागेल की ते भविष्यात अपघाताशी संबंधित कोणताही दावा करणार नाहीत आणि कंपनीला सर्व कायदेशीर जबाबदा-यांमधून मुक्तकरतील. ही सूट कोणत्याही देशात किंवा न्यायालयात लागू राहील. कायदेशीर पथकाने केला विरोध एअर इंडियाच्या या प्रस्तावाला १३० पीडितांच्या कुटुंबीयांच्या कायदेशीर पथकाने विरोध केला (पान २ वर)



# श्रीराम प्राथमिक शाळेत मातृ-पितृ पूजन सोहळा उत्साहात

**टाकरखेडा संभू-** श्रीराम प्राथमिक शाळा, टाकरखेडा संभू येथे आयोजित तीन दिवसीय स्नेहसंमेलन कार्यक्रमांतर्गत मातृ-पितृ पूजनाचा सोहळा उत्साहात व भावनिक वातावरणात पार पडला. बालसंस्कार समितीच्या वतीने विद्यार्थ्यांकडून आई-वडिलांचे पूजन करण्यात आले.या प्रसंगी महालसंस्कार समितीच्या राधा चौधरी यांनी अतिशय सुंदर व प्रभावी पद्धतीने विद्यार्थ्यांकडून आपल्या पालकांचे पूजन करून घेतले. विशेष म्हणजे या कार्यक्रमात मुस्लिम पालकांचाही उत्स्फूर्त सहभाग लाभला, ही बाब कौतुकास्पद ठरली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल खांदे यांनी केले. संकल्पना देशमुख, इंगळे, रविकिरण कांडलकर व वैभव निमकर यांनी मनोगत व्यक्त करत मातृ-पितृ सेवेचे महत्त्व अधोरेखित केले. विश्रामताईंनी आपल्या सासू-सासऱ्यांना आई-वडिलांप्रमाणे मान देण्याचा संदेश देत कुटुंबव्यवस्थेतील संस्कारांचे महत्त्व पटवून दिले.



अतुल खांदे यांनी देखील आपल्या आईचे पूजन करून उपस्थितांना भावूक केले.कार्यक्रमादरम्यान अनेक पालक व विद्यार्थी भावनांनी ओथंबून गेले. काही जणांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. कृतज्ञता, प्रेम आणि संस्कारांचा सुंदर संगम या सोहळ्यात अनुभवायला मिळाला.या कार्यक्रमाला प्रशांत देशमुख, रेखा कटाळे, प्रमोद विखे, प्रवीण पाटील, अश्विनी दिंडेलकर, गौरी जुनघरे, पद्मा सवयी, दिव्या विरूळकर, प्रणव विरुळकर, देवांश मस्कटे आदी मान्यवर व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुरवाडी खुर्द ग्रामपंचायत येथील कार्यकाळाचा सेवा गौरवाने समारोप

## शिक्षक व कर्मचारी वृंदांचा सन्मान सोहळा उत्साहात

**तिवसा/प्रतिनिधी-** ग्रामपंचायत कार्यालय सुरवाडी खुर्द च्या वतीने गावासाठी मौल्यवान व निष्काम योगदान देणाऱ्या शिक्षक व कर्मचारी वृंदांचा सन्मान सोहळा अत्यंत उत्साहात आणि कृतज्ञतेच्या भावनेत आयोजित करण्यात आला. ग्रामपंचायतच्या पाच वर्षाच्या कार्यकाळाच्या समारोपाचे औचित्य साधून हा कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ललिताताई बोराळकर या होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रदीप राऊत व अनिल महल्ले उपस्थित होते. तसेच तंटामुक्ती अध्यक्ष अतुल गवड, उपसरपंच योगेश भोंबे ,पोलीस पाटील राजेंद्र जाधव,सचिव सुरेंद्र चिकटे यांची मान्यवर उपस्थिती लाभली.या प्रसंगी जि.प. शाळा सुरवाडी खुर्द येथून आदर्श




शिक्षक दलवीर व्यास सर व शिक्षिका संध्या जामकर तसेच सुरवाडी बु. येथून आदर्श शिक्षिका प्रगती मेहेर, सविता कठाने मॅडम, शुभांगी झटाले, अल्का देशमुख तसेच ग्रामपंचायत सचिव सुरेंद्र चिकटे, सचिव पुष्पा भुयार अंगणवाडी सेविका ज्योती इंगोले, प्रतिक्षा चापरे, सुनिता ठाकरे, शीला काकु कोठे, शुभांगी बोंडे, ग्रामकर्मचारी नरेंद्र भोंबे , पाणीपुरवठा कर्मचारी योगेश भोंबे व संतोष घोरमाडे, रोजगार सेवक दिनेश भोंबे , विद्युत मित्र पवन कदम, संगणक चालक विलास मसलदी तसेच आशा सेविका मंजूताई ठाकरे व कीर्ती इंगळे यांचा सेवेबद्दल विशेष गौरव करण्यात आला.गावाच्या उन्नतीसाठी, शिक्षणासाठी आणि समाजाच्या विकासासाठी या सर्वांनी केलेली सेवा ही केवळ कर्तव्यपूर्ती नव्हती, तर ती एक समर्पित आणि निस्वार्थ भावनेतून केलेली जीवनसेवा होती. त्यांच्या कार्यामागे गावाविषयी असलेली आत्मीयता, विद्यार्थ्यांप्रती माया आणि समाजासाठी काहीतरी देण्याची तळमळ स्पष्टपणे जाणवत होती.ग्रामपंचायतचा पाच वर्षाचा कार्यकाळ हा केवळ पदभार सांभाळण्यापुरता मर्यादित नव्हता, तर गावाच्या समृद्धीचा, विकासाचा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा होता. या काळात ग्रामपंचायतीने सेवा, पारदर्शकता आणि जनसहभाग यांना प्राधान्य दिले.कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक प्रदीप राऊत यांनी प्रत्येक सन्मानार्थींच्या कार्याचा गौरव करताना समाजात अशा सेवाभावी व्यक्तींची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन केले.

# १ व १० वरिल उर्वरित

## दिल्ली स्फोटाची जबाबदारी

राष्ट्रांच्या यादीत समाविष्ट नाही. अहवालात सदस्य देशांच्या वेगवेगळ्या मूल्यांकनाचाही उल्लेख आहे. काही देशांनी असे मानले आहे की खीट दहशतवादी संघटना अजूनही दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देत आहे. तर काही देशांनी ती निष्क्रिय असल्याचे म्हटले आहे.

एनआयएला जैशशी संबंधित दुवे मिळाले

दिल्ली ब?म्बस्फोटानंतर एनआयएने तपास सुरू केला होता. एजन्सीला देखील जैश-ए-मोहम्मद आणि अंसार गजवात-उल-हिंदशी संबंधित दुवे मिळाले होते. या प्रकरणात आतापर्यंत ९ लोकांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये तीन ड?क्टरांचाही समावेश आहे. ते नेटवर्कला मदत करत होते.

## भाजप म्हणजे विषारी

केली. शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर त्यांनी इशारा दिला. कर्जमाफी मिळाली नाही तर महाराष्ट्रात रेल्वेचे चाक फिरू देणार नाही. आम्ही गनिमी कावा करू , असे ते म्हणाले. कामगारांच्या प्रश्नावर बोलताना न्यायालयीन प्रक्रियेतील विलंबावरही त्यांनी चिंता व्यक्तकेली. कामगाराला कामावरून कमी केल्यास न्यायालयात जा असे सांगितले जाते; पण निकाल लागायला वर्षानुवर्षे जातात. न्याय मिळेल की नाही, याचीही भीती वाटते, असे बच्चू कडू यांनी नमूद केले.

## लोकसभेत राडा

पंतप्रधानांच्या आसनाजवळ गेल्याने गोंधळ झाला होता. किरेन रिजिजू यांनी गुरु वारी १२ फेब्रु वारी आज नवीन व्हीडीओ शेअर करत खळबळ उडवून टाकली आहे. २० ते २५ क?ग्रेसचे खासदार लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या दालनात गेले आणि त्यांना शिवीगाळ केली. तसेच बेकायदेशीरपणे हा व्हीडीओ बनवला आहे. रिजिजू म्हणाले, प्रियंका गांधी, के.सी. वेणुगोपाल यांच्यासह काँग्रेसचे अनेक वरिष्ठ नेते लोकसभा अध्यक्षांच्या कार्यालयात उपस्थित होते. प्रियंका गांधी खासदारांना भांडण करण्यासाठी उकसवत होते. लोकसभा अध्यक्ष ही खूप भोळे आणि शांत आहेत. नाहीतर खूप मोठी कारवाई झाली असती असा आरोप त्यांनी केला.

## देशात ३० कोटी कामगारांचा

आहे. एआयबीईए आणि एआयबीओए सारख्या मोठ्या युनियन या संपात सामील झाल्या आहेत. विमा क्षेत्रातील कर्मचारी १०० टक्के थेट परदेशी गुंतवणुकीला विरोध करत असून, नवीन कामगार कायद्यांच्या विरोधात आपला संताप व्यक्तकरत आहेत.

२७ लाख वीज कर्मचा-यांचा सहभाग

वीज क्षेत्रातील खासगीकरण आणि विद्युत (सुधारणा) विधेयक २०२५ विरोधात देशातील २७ लाख वीज कर्मचारी आणि अभियंते या संपात उतरले आहेत. ऑल इंडिया पावर इंजिनिअर्स फेडरेशनचे अध्यक्ष शैलेंद्र दुबे यांनी स्पष्ट केले की, प्रस्तावित राष्ट्रीय वीज धोरण २०२६ हे सामान्य ग्राहकांच्या आणि लघुउद्योगांच्या हिताच्या विरोधात आहे. आउटसोर्सिंग बंद करून नियमित भरती सुरू करावी आणि जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

शेतकरी आणि ग्रामीण कामगारांची साथ

विशेष म्हणजे, यावेळी संयुक्त किसान मोर्चाने कामगारांच्या या संपाला पूर्ण पाठिंबा दिला आहे. मनरेगा योजना पुन्हा प्रभावीपणे सुरू करावी आणि विकसित भारत रोजगार आणि उपजीविका मिशन (ग्रामीण) अधिनियम २०२५ रद्द करावा, अशी मागणी ग्रामीण कामगारांकडून केली जात आहे. एआयपीईएफने चिंता व्यक्त केली आहे की वीज क्षेत्राचे खाजगीकरण गरीब ग्राहक, लहान उद्योग आणि सामान्य जनतेच्या हिताच्या विरोधात आहे. त्यामुळे त्यांनी वीज (सुधारणा) विधेयक २०२५ आणि प्रस्तावित राष्ट्रीय वीज धोरण २०२६ मागे घेण्याची मागणी केली आहे.

प्रमुख मागण्या

- चार कामगार संहिता आणि नियम पूर्णपणे रद्द करणे.
- विद्युत (सुधारणा) विधेयक २०२५ आणि नवीन राष्ट्रीय वीज धोरण मागे घेणे.
- वीज क्षेत्रात आउटसोर्सिंग बंद करून कंत्राटी कर्मचा-यांना कायम करणे.
- मनरेगा योजनेची पुनर्बहाली आणि नवीन ग्रामीण रोजगार मिशन रद्द करणे.
- विमा क्षेत्रात १०० टक्के एफडीआयला विरोध.

संपामध्ये सामील असलेल्या केंद्रीय ट्रेड युनियन्स

संयुक्त मंचामध्ये इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (आयएनटीयूसी), ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (एआयटीयूसी), हिंद मजदूर सभा (एचएमएस), सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सीआयटीयू), ऑल इंडिया युनायटेड ट्रेड युनियन सेंटर (एआययूटीयूसी), स्वयंरोजगार महिला संघ (सेवा), ऑल इंडिया सेंट्रल कौन्सिल ऑफ ट्रेड युनियन (एआयसीसीटीयू), लेबर प्रोग्रेसिव्ह फेडरेशन (एलपीएफ) आणि युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस (यूटीयूसी) यांचा समावेश आहे. कौर म्हणाल्या की, श्रम आयुक्तांनी वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये युनियन नेत्यांशी चर्चा केली आहे, परंतु संप फोरमची योजना आहे त्याप्रमाणेच संप झाला.

## 'मी कायम त्यांना मिस

ज्या पदापर्यंत झेप घेतली तो प्रवास कमालीचा होता. राजकारण सोडून द्या पण, मी कायम त्यांना मिस करेन. ते माझ्या छोट्या भावासारखे होते. अजित पवार माझे चांगले मित्र होते.' सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्री पदावर भाष्य करताना नाना पाटेकर म्हणाले की, 'सुनेत्रा पवार यांचं दुःख इतरांपेक्षा वेगळं आहे. ते त्यांनाच सहन करावं लागेल. पण, त्यांनी जो पदभार स्वीकारला आहे, त्याची जबाबदारी देखील सांभाळावी लागेल आणि ती जबाबदारी त्या सांभाळतील, पण वेळ तर लागेलच' त्याचबरोबर, रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबद्दल विचारलं असता नाना पाटेकर म्हणाले की, 'रोहित पवारांनी काकांना गमावले आहे. त्यांच्या मनात जे काही प्रश्न असतील ते त्यांनी उपस्थित केले.' नाना पाटेकर यांनी अपघातानंतर राज्यातील राजकारणात होणा-या संभाव्य बदलांवर आणि राष्ट्रवादीच्या गटांच्या भविष्याबद्दल सुरू असलेल्या चर्चांवर भाष्य करण्यास नकार दिला. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, हा निर्णय संबंधित राजकीय पक्षांचा आहे आणि ते या प्रकरणावर भाष्य करणार नाहीत.

अजित पवार यांच्या अपघाताबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यावर बोलताना नाना पाटेकर म्हणाले की, 'हा पवार कुटुंबाचा वैयक्तिक प्रश्न आहे, मी एक सामन्य माणूस आहे. त्यामुळे मी यावर काहीच बोलणार नाही'

## रशियाकडून इंधन खरेदी सुरूच

येईल असा इशारा अमेरिकेने दिला आहे. पण भारताने एकीकडे व्यापारी कराराबाबत अमेरिकेच्या भूमिकेचे कौतुक करतानाच रशियाकडून इंधन खरेदीच्या अटीवर भाष्य केले नव्हते. तर आता भारतीय परराष्ट्र विभागाने रशियाकडून तेल खरेदीबाबतचे करार जैसे थे असल्याचे स्पष्ट केले आहे.

गरजेनुसार खरेदी करीत राहू : मिस्त्री

लावरोवा यांच्या वक्तव्यापूर्वी भारताने या मुद्यावर खुलासा केला आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी याविषयी मोठे वक्तव्य केले. भारत आपल्या गरजेनुसार विविध देशांकडून इंधन खरेदी करेल असे ते म्हणाले. पुरवठा साखळी नियंत्रीत आणि स्थिर ठेवण्यासाठी भारत स्त्रोतांमध्ये विविधता आणेल असे ते म्हणाले. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्तेरणधीर जायसवाल यांनी सांगितले की १.४ अब्ज लोकांची उर्जा सुरक्षा ही सर्वात महत्त्वाची प्राथमिकता आहे. तर रशियासोबतचे यापूर्वीचे करार जैसे थे असल्याचे जायसवाल यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे ट्रम्प हे पुन्हा तोंडघशी पडल्याचे दिसून आले.

**लावरोव यांचा अमेरिकेवर मोठा आरोप**

लावरोव यांनी अमेरिकेवर आरोप केला आहे की भारत आणि ब्रिक्स देशांसोबत रशिया व्यापार, गुंतवणूक आणि लष्करी सहकार्य करत असल्याने ते थांबवण्याचा प्रयत्न होत आहे. अमेरिका टॅरिफ, प्रतिबंध, दबाव अशी पावले टाकून जगभरात दबदबा तयार करण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प सरकार आल्यापासून जगाला वेठीस धरण्याचा हा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही लावरोव यांनी केला आहे.

## टेकऑफनंतर प्रवासी विमान

केल्यावर अवघ्या काही मिनिटांतच इंजिनमध्ये बिघाड झाल्याचे वैमानिकाच्या लक्षात आले. विमानाचे नियंत्रण राखण्याचा प्रयत्न करत असतानाच पंखांचेही नुकसान झाले. त्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली. सोमाली नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाचे संचालक अहमद मोआलिम हसन यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे.

**सोमालियन एअरलाइनने वैमानिकांचे केले कौतुक**

सोमालियन एअरलाइन स्टारस्कायने त्यांच्या वैमानिकांचे विशेष कौतुक केले. प्रसंगावधान राखत आणि जलद निर्णयक्षमता दाखवत त्यांनी विमानाचे यशस्वी क्रॅश लँडिंग केले. या धाडसी आणि तत्पर कृतीमुळे विमानातील सुमारे ५० प्रवाशांचे प्राण वाचले. अपघातानंतर समोर आलेल्या दृश्यांमध्ये विमानाचे पंख तुटलेले तसेच पुढील भागाचे मोठे नुकसान झाल्याचे दिसून आले. अपघाताची तीव्रता लक्षात घेता परिस्थिती अत्यंत भीषण होती. या गंभीर स्वरूपाच्या दुर्घटनेनंतरही विमानातील सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित बचावले. वैमानिकांच्या धैर्य आणि कुशलतेमुळे संभाव्य मोठी जीवितहानी टळल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## खटला मागे घेण्यासाठी पीडित

आहे. त्यांचे म्हणणे आहे की, चौकशी पूर्ण झालेली नाही. जबाबदारी निश्चित झालेली नाही. अशा परिस्थितीत खटल्याचा अधिकार सोडण्यास सांगणे अयोग्य आहे. काही जखमी कुटुंबांवर अजूनही उपचार सुरू आहेत. या प्रकरणी एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, एअर इंडिया या कठीण प्रक्रियेतून जात असलेल्या प्रत्येक बाधित कुटुंबाला मदत करण्यासाठी कटिबद्ध आहे. सुरु वातीची अंतरिम रक्कम दिल्यानंतर, आम्ही हे निश्चित केले आहे की प्रत्येक कुटुंबाला दिली जाणारी अंतिम रक्कम योग्य आणि कायद्यानुसार असावी.

सर्वोच्च न्यायालयाने ३ आठवड्यांत अहवाल मागवला

सर्वोच्च न्यायालयाने ११ फेब्रु वारी रोजी केंद्राला विमान अपघाताच्या तपासाच्या प्रक्रियात्मक प्रोटोकॉलचा अहवाल देण्यास सांगितले आहे. सरकारने सांगितले की एएआयबीचा तपास अंतिम टप्प्यात आहे. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर एनजीओ सेफ टी मॅटर्सच्या वतीने वकील प्रशांत भूषण यांनी सांगितले की, गंभीर अपघातांसाठी कोर्ट ऑफ इन्क्वायरीची गरज असते, एअरक्राफ ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन बोर्डच्या तपासाची नाही.

## पैशासाठी युवकाची हत्या करून

अनोळखी प्रेत बाबत विचारपूस केली असता कोणीही ओळखले नाही. अज्ञात आरोपींनी दुसऱ्या ठिकाणी जीवनाशी ठार मारून प्रेताची ओळख पटू नये म्हणून चार चाकी वाहनाने पुरावा नष्ट करण्याचे उद्देशने जहानपूर शेत शिवारातील धरणाचे कैनल मध्ये प्रेत जाळून फेकले होते. पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक यांनी गुन्हा उघडकीस आणण्यासाठी विशेष सूचना दिल्या. एसडीपीओ मनीष ठाकरे यांनी पथरोट,रहिमापूर, अंजनगाव सुर्जी येथील गुन्हे प्रगटीकरण पथक गठीत केले. गुन्ह्याचा तपास करीत असताना पथकाला माहिती मिळाली की, कोणी तरी बुधवारी रात्री पद्मश्री हॉटेलचे मालक शुभम राय हा त्याच्या पांढऱ्या रंगाच्या गाडीने हॉटेल वरील काम करणाऱ्या नोक?ा सोबत रात्री खोडगाव रोडने दोन तीन वेळा येता जातांना दिसला. शुभम राय यास विचारपूस केली असता त्याने आधी उडवा उडवीचे उत्तरे दिली. त्यानंतर अधिक विचारपूस केली असता गुन्ह्याची कबूली दिली. त्यांनी सांगितले की आर्वी येथील राहणारा मामेभाऊ टिकेश महाजन व त्याचे वडील प्रशांत महाजन याला शेख शाहरुख शेख राऊत याने पैशाचे कारणावरून शिवीगाळ करून मारहाण केली होती. तेव्हापासून महाजन पिता पुत्र त्याच्यावर खुन्नस खाऊन होते. त्यांनी शाहरुखला संपवण्याचा कट केला. महाजनचे मित्र अली अजगर याने शाहरुखला पैशाचे आमिष देऊन प्रकरण आपसात मिटवण्यासाठी गावाबाहेर बोलवले. त्याचवेळी महाजन व त्याच्या मित्रांनी शाहरुखला मारहाण करून जीवनाशी ठार मारले. शाहरुखचे प्रेत आर्वी येथून लेहगाव येथे आणले आणि शुभम राय यांच्या गाडीत टाकले आणि प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी सांगितले. शुभम राय यांनी लेहगाव येथून स्वतःचे महेंद्र एक्सयूव्ही वाहनात घेतले आणि हॉटेलवर काम करणाऱ्या तीन नोकऱ्यांच्या मदतीने शाहरुखचे प्रेत धरणाचे कालव्यात जाळून तेथून निघून गेले. पोलिसांनी आरोपींना जेरबंद केले. गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची महिंद्रा एक्स यु व्ही तसेच ७ मोबाईल असा एकूण ५ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना पथरोट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, एएसपी पंकज कुमावत, एसडीपोओ मनीष ठाकरे, गुन्हे शाखेचे किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात सुरज बोंडे यांच्या नेतृत्वात अनंत वडतकर ,अभय चौथंनकर ,सचिन पवार ,सागर हटवार, नितीन इंगोले यांच्या टीमने केली.

## मेळघाटच्या विकासासाठी आरोग्य

बदलत्या जीवनशैलीत नागरिकांना मिलेट्सचे महत्त्व कळावे यासाठी जनजागृती करावी. याअनुषंगाने मिलेट्स फुडच्या लागवडीखाली क्षेत्र वाढविण्या साठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात. हॉटेल्स तसेच दैनंदिन जीवनात नागरिकांचा मशरूम खाद्यान्नांचा वापर वाढला आहे. मशरूमची वाढती मागणी लक्षात घेता मशरूम ट्रेनिंग प्रोग्राम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्हा कृषी अधीक्षक राहुल सातपुते यांना यावेळी दिले. मराठवाडा दुग्ध प्रकल्पासंदर्भात यावेळी चर्चा करण्यात आली. या प्रकल्पातील लाभार्थ्यांना वैरण विकास चमूमार्फत सहकार्य पुरविण्यात यावे. तसेच या पूरक व्यवसायाकडे शेतकऱ्यांनी आकृष्ट व्हावे, यासाठी जनजागृती करण्याचेही निर्देश सातपुते यांना दिले. प्राथमिक कृषी सहकारी संस्था ही ग्रामीण स्तरावरील तळागाळातील सहकारी पतपुरवठा संस्था आहे. थेट शेतकऱ्यांशी निगडित ही संस्था खते, बियाणे, कीटकनाशके पुरवणे, अल्प मुदतीचे कर्ज देणे आणि शेतमाल साठवणूक, विक्री यांसारख्या बहुउद्देशीय सेवा पुरविते. या सहकारी संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देत असल्यामुळे येथील दोन-तीन गावातील महिलांना एकत्रित करून त्यांच्या आर्थिकस्तर उंचावण्यासाठी विशेष उपक्रम राबवून या महिलांना सहकार्य करण्याचे निर्देश महिला आर्थिक विकास महामंडळ तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना यावेळी देण्यात आले.

मोह फुलाचा हंगाम सुरू होत असून उत्तम प्रतीची मोहफुले गोळा करण्यासाठी आवश्यक नेट सामग्री येथील स्थानिकांना उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी येरेकर यांनी संबंधितांना निर्देश दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी महापात्र यांनी मेळघाट येथील आरोग्य समस्यावर सर्व विभागांनी एकत्रित येऊन समन्वयाने कार्यप्रणाली राबविण्याचे निर्देश दिले. येथील गर्भवती महिलांच्या तपासणीसाठी लवकरच मोबाईल एक्स-रे मशीन घेण्यात येईल. जेणेकरून अती जोखमीच्या गर्भवती महिलांची तपासणी करणे सोयीचे होईल. तसेच आशाकिट मध्ये बीपी मशीन देण्यासाठी त्यांनी सकारात्मकता दर्शविली.

माजी प्राचार्य डॉ. विभावरी गाणी यांनी मेळघाट येथील आरोग्यविषयक विविध उपक्रम, जनजागृती कार्यक्रमायाबाबत माहिती दिली. मेळघाटमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असून व्यसनाधिनता अधिक असल्यामुळे जनजागृती करण्यास अडचण निर्माण होते. यामुळे येथील नागरिकांना तंबाखू, दारू अशा विविध व्यसनाच्या विळख्यातून मुक्त करणे सर्वप्रथम गरजेचे असल्याचे यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी यावेळी मेळघाट क्षेत्रातील विद्युत पुरवठ्याबाबत आढावा घेतला. येथील विद्युत पुरवठा अखंडितपणे सुरू राहण्यासाठी संबंधितांना निर्देश दिले.

## अमरावतीत आधुनिक फिशरीज

मासेमारी करणाऱ्या सहकारी संस्था व संघटनांची संख्या, तसेच बाजारपेठेतील मागणी यांचा आढावा घेण्यात आला. फिशरीज हब प्रकल्पामुळे मत्स्य साठवण, प्रक्रिया, पॅकिंग व विक्री व्यवस्थेत सुसूत्रता येऊन मत्स्य व्यवसायाला चालना मिळणार असल्याचे नमूद करण्यात आले.

प्रकल्पाच्या प्रभावी संचालनासाठी मासेमारी संघटना, सहकारी संस्था व व्यापारी प्रतिनिधी यांचा समन्वय आवश्यक असून, त्यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती व नियोजन आराखडा तयार करण्याबाबत चर्चा झाली. शुक्रवार बाजार येथील मार्केट परिसरात मासेमारी संघटना/संस्था यांचे शिस्तबद्ध व नियोजनबद्ध व्यवस्थापन कसे करावे, वाहतूक व स्वच्छता व्यवस्थापन कसे सक्षम करावे, यासंदर्भातही सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

फिशरीज हब प्रकल्पासाठी दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या पाण्याचे नियोजन, साठवण व्यवस्था, स्वच्छता मानके व आरोग्यविषयक नियमांचे पालन याबाबत विशेष चर्चा करण्यात आली. मत्स्य उत्पादनाच्या गुणवत्तेचे जतन व ग्राहकांना स्वच्छ व दर्जेदार उत्पादने उपलब्ध करून देणे हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

या पाहणी दौऱ्यास व बैठकीस अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, शहर अभियंता रविंद्र पवार, कार्यशाळा विभाग प्रमुख, हिम्?मत फिश मर्चेंट अँड यवतमाळ यांचे प्रतिनिधी, न.या. पिंगलवार (स.म.वि.अ., यवतमाळ), उत्कर्ष सुरेंद्र चाचरकर (म.वि.अ., बुलढाणा), विक्रम कच्छवे (सहाय्यक आयुक्त मत्स्य, बुलढाणा), एम.एम. मेश्राम (सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, अमरावती), प्रियंका झाडे (सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय, वाशीम), सु. वा. जांभुळे (प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, अमरावती), डॉ. सचिन बोंद्रे (नोडल अधिकारी, फिशरीज हब, महानगरपालिका), वाघमोडे धों. म. (प्रादेशिक उपायुक्त मत्स्य, अमरावती), डॉ. भूषण सानप (सहाय्यक मत्स्य विकास अधिकारी) तसेच इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बॉक्स:

फिशरीज हब प्रकल्पाच्या माध्यमातून अमरावती व परिसरातील मत्स्य व्यवसायाला आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध होणार असून, मत्स्य उत्पादन वाढ, रोजगारनिर्मिती, स्थानिक बाजारपेठेचा विकास व अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मोठी मदत होणार आहे. प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक ती कार्यवाही गतीमान करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

## भरधाव ट्रकच्या धडकेत २४

क्रमांक एमएच-२७/ टी-२४६६ वरून कामानिमित्त जात होता. जमील कॉलनी परिसरात मागून वेगात येणाऱ्या ट्रकने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की जिशान गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. अपघाताची माहिती मिळताच नागपुरीगेट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला. काही काळ वाहतूक ठप्प झाली होती, ती पोलिसांनी सुरळीत केली.

## कोणार्क कंपनीला कचरा उचलण्याचे

मदतीने मेन रोडवरील सर्विस लाईन व नाल्यांची सखोल साफसफाई करण्यात आली. या मोहिमेतून मोठ्या प्रमाणात निघालेला केरकचरा कोणार्क कंपनीमार्फत ट्रक व ट्रॅक्टरद्वारे उचलण्यात आला. उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी कोणार्क कंपनीच्या प्रतिनिधींना सूचना व आदेश देण्यात आले आहेत.

नाल्यांमधील रपट्यांमध्ये अडकलेला कचरा जेट मशीनच्या सहाय्याने साफ करण्यात आला. तसेच १२ फेब्रुवारी २०२६ रोजी वैद्यकीय अधिकारी व ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक श्रीकांत डवरे यांनी परिसराची पाहणी करून कोणार्क कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. साफसफाईनंतर साचलेल्या ढिगाऱ्यांची तात्काळ उचल करण्याचे आदेश देण्यात आले.

सध्या सदर परिसरात स्वच्छता काम सुरू असून लवकरच संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## स्पीड ब्रेकरवरून सुरू झालेला

महादेव खो?ी, अमरावती) यांनी संतापाच्या भरात चाकू काढत गौरववर सपासप वार केले. भावाला वाचविण्यासाठी धावलेल्या सौरभलाही मारहाण करण्यात आली. गंभीर जखमी अवस्थेत गौरवचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच नांदगावपेठ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपींना अटक केली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून जखमी सौरभवर उपचार सुरू आहेत. किरकोळ वादातून घडलेल्या या हत्येने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पुढील तपास नांदगावपेठ पोलीस करत आहेत.

## संयुक्त कामगार संघटनेचा

चौकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मोर्चाची सुरुवात झाली. कामगार विरोधी श्रमसंहितेच्या निषेधार्थ आक्रोश प्रगट करण्यात आला. प्रधानमंत्री यांना दिलेल्या निवेदनात चार श्रम संहिता रद्द करा, जी रामजी विधेयक रद्द करण्यात यावे, कंत्राटी पद्धत बंद करा, कामगारांना किमान वेतन २६ हजार व दहा हजार रुपये पेन्शन लागू करा, श्रम संहितेमुळे कामगारांच्या कामाचे तास किमान वेतन सामाजिक सुरक्षा स्वातंत्र्य व सामूहिक वाटाघाटीचा हक्क धोक्यात येणार आहे. कंत्राटीकरण बंद करून सर्व कामगारांना कायम करा, जुनी पेन्शन योजना लागू करा, मनरेगा अंतर्गत २०० दिवस रोजगार देण्यात यावे, मागासवर्गीयांचा बॅकलॉग ताबडतोब भरा, वाढत्या महागाईवर आळा घाळा, सार्वजनिक वितरण व्यवस्था मजबूत करा सह इतर मागण्या करण्यात आल्या आहेत. मोर्चामध्ये चंदू बानूवाकोडे, डी एस पवार, सुभाष पांडे, पी बी उके, तुकाराम भस्मे, सुनील देशमुख, एच.बी.घोम, कमलाकर वनवे, प्रशांत धर्माळे, पंकज गावंडे, मयूर सोनवाल, विजय भुयार, अशोक सोनारकर, देविदास राऊत, ओमप्रकाश कुटेमाटे, महादेव गारपवार, विनोद जोशी सह कामगार मोठ्या संख्येमध्ये सहभागी झाले.

## वाढीव वेतनाचा हप्ता तत्काळ

वातावरण आहे. पदाधिकाऱ्यांनी यापूर्वीच परिवहन मंत्री यांच्याशी संपर्क साधला होता.१२० कोटींच्या थकबाकीची फाईल मंत्रालयात सादर करण्यात आल्याची माहिती त्यांना मिळाली. मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी घेऊन तातडीने फरकाची रक्कम वितरित करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, परंतु शासनाने आश्वासन पूर्ण केले नाही. आश्वासनाची तत्काळ पुरतता करावी व वेतना सोबत हप्ता नियमित अदा करावा. अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी शेख मकसूद, मोहित देशमुख, अजय चव्हाण, श्याम इसळ, सुरेंद्र अस्वार, मारुती राठोड, नंदू ,नौशाद बेग, जय इंगळे, अनिल भालचंद्र, समीर देशमुख, शेख कलीम इमरान सह अनेक कर्मचारी उपस्थित होते.

## चपराशीपुरा परिसरात स्वच्छता

व्यवस्थापनाबाबत विशेष लक्ष देण्यात आले. एकूण १६ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये हॉटेल, कॅन्टीन, बार, मेस, डेअरी व रेस्टॉरंटचा समावेश होता. बहुतांश आस्थापनधारकांकडून डस्टबिनचा योग्य वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले.

तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी कापडी व कागदी पिशव्या तसेच ५१ मायक्रोनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे आढळले.

मात्र तीन आस्थापनांमध्ये डस्टबिनचा वापर न करता इतरत्र कचरा टाकण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांवर कारवाई करण्यात आली. जावेद खान, कॅम्प कॉर्नर आणि सुधाकर नागाशे यांना प्रत्येकी ?१,००० प्रमाणे एकूण ?३,००० दंड वसूल करण्यात आला.

या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी विनोद टांक, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, प्रसाद कुलकर्णी, मनीष नकवाल, मोहित जाधव, निलेश तंबोले आणि संजय माहुरकर उपस्थित होते

## स्काय टॉवर अपार्टमेंटमध्ये

यांनी अग्निशमन विभागाला दिली. माहिती मिळताच पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाची पहाणी करून डोअर सेंसर लॉक खराब असल्यामुळे ती अंदर फसल्याची माहिती मिळाली. देवीशा आत मध्ये घाबरली होती. त्यामुळे पथकाच्या जवानांनी तात्काळ एक्सटेन्शन ?ल्युमिनियम लेडरचा वापर करून रेस्क्यू करण्यास सुरुवात केली. गॅलरीच्या खिडकीमधून प्रवेश करून जवळपास दहा मिनिटांच्या अथक प्रयत्नानंतर अल्पवयीन देवीशाला सुखरूप बाहेर काढले आणि तिची आई जयश्री जयस्वाल यांच्या स्वाधीन केले. याकरिता जयस्वाल कुटुंबीयांनी अग्निशमन विभागाचे अभिनंदन केले. केंद्रप्रमुख सोनकांबळे, पाळी प्रमुख सुनील काकडे यांच्या आदेशानुसार चालक नितीन इंगोले, सुनील झोंबाडे, निखिल बाठे, राजेश गजबे, विकी हिवराळे, श्याम भोपळे यांनी कारवाई केली.

जनमाध्यम
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
एक प्रतिष्ठित सवय
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# राज्यात बियाणे नियंत्रणासाठी नवे धोरण
## खरीपासाठी खतसाठा नियोजनावर भर

● मंत्रालयात कृषी मंत्र्यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक
● आमदार रणधीर सावरकर यांच्या अभ्यासपूर्ण सूचना

■ प्रतिनिधी | अकोला ■

**शेतकऱ्यांचे हितसंवर्धन आणि बियाणे फसवणुकीला आळा घालण्यासाठी राज्यात सक्षम व निर्णायक बियाणे नियंत्रण धोरण आखण्यात येणार असल्याचे संकेत मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मिळाले. दि. १० फेब्रुवारी रोजी कृषी मंत्री मा. ना. दत्तात्रय भरणे यांच्या मंत्रालयीन दालनात कृषी राज्य मंत्री मा. ना. आशिष जयस्वाल, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे सहअध्यक्ष आमदार रणधीर सावरकर, प्रधान सचिव (कृषी), कृषी आयुक्त, पोकरा प्रकल्प संचालक तसेच वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.**



बियाणे तपासणीच्या उत्तरदायित्वाच्या कार्यपद्धतीत बदल करून नवीन स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर (SOP) तयार करण्यासाठी शासन निर्णयाद्वारे स्थापन समितीची बैठक यावेळी झाली. निकृष्ट निविष्ठा पुरवठ्यावर कठोर कारवाई, इतर राज्यांतील कायदेशीर तरतुदींचा अभ्यास, तसेच तपासणीतील पारदर्शकता वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी आमदार रणधीर सावरकर यांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. प्रचलित बियाणे तक्रार निवारण समितीची पुनर्रचना करून तालुका कृषी अधिकाऱ्यांना समिती प्रमुख करावे व त्यांना बियाणे निरीक्षकाचे अधिकार द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. सत्यप्रत बियाण्यांचे कायद्याद्वारे नियंत्रण, लॉटनिहाय क्षेत्रीय तपासणी सक्तीची करणे, 'साथी' पोर्टलद्वारे बियाणे विक्री अनिवार्य करणे, नमुना संकलनासाठी बारकोड पद्धत व ॲप विकसित करणे, बियाणे निरीक्षकांची संख्या वाढविणे तसेच प्रयोगशाळांची तपासणी क्षमता वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अप्रमाणित बियाणे उत्पादक कंपन्यांवर मोठा दंड व कडक शिक्षेची तरतूद असावी, संशोधित वाणांवर शासनाचे नियंत्रण असावे, पिकनिहाय, वाणनिहाय व लॉटनिहाय नमुने घेण्याचे धोरण ठरवावे तसेच नमुने प्रयोगशाळेत ठरावीक कालावधीत पोहोचावेत, यासाठी स्पष्ट नियमावली तयार करावी, अशी मागणीही त्यांनी केली. भाजीपाला बियाण्यांच्या नमुन्यांबाबतही पुनर्विचाराची सूचना करण्यात आली.

दरम्यान, दि. ११ फेब्रुवारी रोजी खरीप हंगाम २०२५-२६ साठी रासायनिक खतांच्या साठा व वितरण नियोजनाबाबत बैठक झाली. खतांचे नियोजन करताना केवळ विद्यापीठ वा शासन शिफारसींवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष शेतकरी वापर, पिक पद्धतीतील बदल व क्षेत्रनिहाय गरजांचा अभ्यास करून मागणी निश्चित करावी, असे सावरकर यांनी सांगितले.

बाजारात कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये यासाठी वाहतूक व्यवस्थेतील अडचणी दूर करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. खतांच्या रॅक्स वेळेवर उपलब्ध न होणे, रेल्वेकडून सिमेंट व लोखंडास प्राधान्य दिल्याने खत वाहतुकीत होणारा विलंब, स्टेशनवर रॅक्स अडकून पडणे या बाबी गांभीर्याने घेऊन राज्य सरकारने रेल्वे मंत्रालयासोबत स्वतंत्र बैठक घ्यावी, अशी सूचना सावरकर यांनी केली. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व पुरेसा खतसाठा वेळेत उपलब्ध व्हावा, यासाठी शासन स्तरावर लवकरच ठोस निर्णय अपेक्षित असल्याचे बैठकीतून स्पष्ट झाले.

# घरकुलांचे रखडलेले हप्ते तात्काळ द्या; अन्यथा आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

राष्ट्रवादी काँग्रेसचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन



तालुक्यातील घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचे रखडलेले हप्ते तात्काळ अदा करावेत, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मालेगाव पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मालेगाव तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांचे घरकुल योजनेतील हप्ते दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. परिणामी संबंधित कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून अनेकांची घरबांधणीची कामे अपूर्ण अवस्थेत थांबली आहेत. वाढत्या बांधकाम खर्चामुळे नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक ताण पडत असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

गरीब व गरजू कुटुंबांना दिलासा मिळावा तसेच त्यांच्या घरकुलांचे बांधकाम वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी रखडलेले सर्व हप्ते तातडीने त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन पुढील आठ दिवसांत ठोस कार्यवाही करावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, निर्धारित कालावधीत सकारात्मक निर्णय न झाल्यास लाभार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) मालेगाव तालुकाध्यक्ष सतीश पाटील जाधव, ज्ञानेश्वर पाटील सावले, बंडू नवघरे, कार्याध्यक्ष उमेश आंधळे, शेषराव वाझुळकर, राजू कुटे, विजय घोडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री मालनेश्वर संस्थान येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**मालेगांव :** समाजोपयोगी उपक्रमाच्या माध्यमातून मानवी सेवेला प्राधान्य देत श्री मालनेश्वर संस्थान, शिव चौक मालेगांव यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबिर शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत ठेवण्यात आले आहे. या उपक्रमाचे आयोजन श्री मालनेश्वर संस्थान मालेगांव यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, समस्त गणेशोत्सव मंडळ मालेगांव यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. रक्त संकलनाची जबाबदारी शासकीय रक्तपेठी, जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम यांच्या मार्फत पार पडणार आहे. सदर रक्तदान शिबिराचे ठिकाण श्री मालनेश्वर संस्थान, शिव चौक मालेगांव येथे आयोजित करण्यात आले.

# माता रमाबाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वंचित बहुजन आघाडी, वाशिम जिल्ह्याच्या वतीने माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती दि.७ फेब्रुवारी रोजी सर्किट हाऊस, वाशिम येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमात माता रमाबाई आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव संतोष सरकटे हे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्यासह समाधानजी मोरे, प्रमोद कंकाळ, बबलू वैद्य, पंकज ढाले, गोविंद वर्मा, अमोल पखाले तसेच पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी माता रमाबाई आंबेडकर यांच्या त्यागमय जीवनाचा व समाजासाठी दिलेल्या प्रेरणादायी योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. कार्यक्रम शांततेत व उत्साहात पार पडला.

# पं. दीनदयाल उपाध्याय यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

**कारंजा :** भारतीय जनता पार्टी कारंजा शहर व ग्रामीणच्या वतीने भारतीय जनसंघाचे आधारस्तंभ, अंत्योदय व एकात्म मानवतावादाचे प्रणेते पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'समर्पण दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कारंजा-मानोरा मतदारसंघाच्या आमदार सौ. सई डहाके, वाशिम जिल्हा सरचिटणीस डॉ. राजीव काळे, ज्येष्ठ नेते निरंजन करडे, कारंजा तालुका अध्यक्ष अमोल ठाकरे, कामरगाव ग्रामीण अध्यक्ष संजय लाहे, कारंजा शहराध्यक्ष अमित संगेवार तसेच कारंजा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष दिनेश राठोड यांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी आमदार सई डहाके, ज्येष्ठ नेते निरंजन करडे व डॉ. राजीव काळे यांनी पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या अंत्योदयाच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित केली. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याचा संदेश कार्यकर्त्यांनी आत्मसात करावा, असे आवाहन मान्यवरांनी केले.

कार्यक्रमाला महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस सविता काळे, नगरसेविका सौ. कुसुम अघम, नितीन गढवाले, चंदाताई कोळकर, वैशाली गुल्हाने, सागर अंभोरे, अतुल चिमेगावे, कामरगाव ग्रामीण तालुका सरचिटणीस मयूर लळे, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस व वाशिम जिल्हा सोशल मीडिया संयोजक जिग्नेश लोडाया यांच्यासह सविज जगताप, प्रशांत ठाकरे, संदीप कुऱ्हे, अमित भागवत, विक्की कोळकर, श्रेयश कदम, देवा गोलाम, संतोष धौगडे, शुभम यंदे, शुभांगी रावळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृतीगर्भ जगण्याचा सौंदर्यप्रकल्प म्हणजे कविता - महेंद्र ताजणे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

कविता ही केवळ लिहिण्याची गोष्ट नाही तर ती स्वतःला मूल्यांच्या पातळीवर रचत जाण्याची जीवनप्रक्रिया आहे.माणसाला माणूस म्हणून सिद्ध केल्याशिवाय आणि माणसाचं माणूसपण जपल्याशिवाय खरी कविता उगवून येत नाही.ज्यांना कविता लिहायची त्यांना इतरांसाठी स्वतःला उद्ध्वस्त करता आलं पाहिजे.कृतीगर्भ जगण्याचा सौंदर्यप्रकल्प म्हणजे कविता असे संवादभाष्य राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष श्रम संस्कार शिबीरादरम्यान घेण्यात आलेल्या कविसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून ज्येष्ठ कवी, समीक्षक, महेंद्र ताजणे यांनी आपले काव्यचिंतनीय भाष्य नोंदवले.

स्थानिक वाशीम तालुक्यातील ग्राम पंचाळा येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नीत,प्रभु रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगाव द्वारा संचालित मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशीमच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आठदिवसीय, विशेष श्रम संस्कार शिबीर दि.७/२/२०२६रोजी महेंद्र ताजणे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. कविसंमेलनात मधुराणी बनसोड, सुनिता अवचार, फारुख जमन, भाऊराव तनपुरे, फिरोज खान, सुरेश खरावन,उमेश बोरचाटे, देशमुख,मुस्कान भवानीवाले आदिंनी आपला सहभाग नोंदवला. कविसंमेलनाचे प्रास्ताविक, दिलीप लांजेवार, सूत्रसंचालन,चाफेश्वर गांगवे आणि विजय काळे यांनी केले.

# ओंकारगीर बाबाचा प्रकटदिन उत्साहात सुरू

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील शेलगाव बोदांडे येथे सन १९९६ मध्ये परमपूज्य ओंकारगीर बाबा चा प्राण प्रतिष्ठान झाली होती तेव्हापासून येथे दरवर्षीप्रमाणे बाबांचा प्रगट दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे.

गावातील सर्व मंडळी एकत्र येऊन ओंकारगीर बाबांची जन्म भूमी शेलगाव ओंकारगीर व कर्मभूमी शिरपूर जैन आहे, शेलगाव येथे प्रगट दिनानिमित्त सात दिवस सप्ताह चालू असताना दररोज संपूर्ण गाव चुलबंद जेवणासाठी मंदिरात असतात व दररोजचे साप्ताहिक कार्यक्रम काकडा भजन व हरिपाठ नव्हते अकरा व रात्री कीर्तन होतात शेवटच्या दिवशी १४ फेब्रुवारीला ३१ क्विंटलाचा महाप्रसाद वाटप असतो, गावकऱ्यांच्या वतीने आयोजित ७ सात फेब्रुवारीला श्री समर्थ जानगीर महाराज संस्थान तीर्थक्षेत्र शिरपूर द्वारा संचालित प पू ओंकारगीर बाबा संस्थान शेलगाव ओंकारगीर येथे प्रगट दिन महोत्सवाला सुरुवात झाली असून १४ फेब्रुवारीला कार्यक्रमाची सांगता व भव्य दिव्य महाप्रसादाचा वाटप होणार आहे, चालू असलेल्या सप्ताह मध्ये कथेचे वाचन ह भ प गजानन महाराज वाझुळकर यांच्या वाणीतून होत असून, रोज रात्रीला महाराष्ट्रातील प्रसिद्ध ह भ प कीर्तनकाराचे कीर्तनाचा कार्यक्रम होत असून या कार्यक्रमाचा लाभ भाविक उपस्थित राहतात , १४ फेब्रुवारीला असलेल्या महाप्रसादाच्या कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा.

# वाशिम येथे पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■



भारतीय जनसंघाचे प्रखर राष्ट्रवादी विचारवंत व 'एकात्म मानववाद' या तत्त्वज्ञानाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी मनिष मंत्री, शहराध्यक्ष यांच्या जनसेवा कार्यालय, मंत्री आर्केड, मंत्री पार्क, वाशिम येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष अनिल केंदळे, भाजपा गटनेते संतोष मुरकुटे, बांधकाम सभापती राहुल तुपसांडे, नगरसेवक अनिल ताजने, नितेश राठी, कुणाल हेडा, बापू ठाकूर, गणेश खंडाळकर, नगरसेविका जयश्री कपिल सारडा, जयश्री संतोष वानखेडे, माया रुपेश विसपुते उपस्थित होते.

तसेच मनिष मंत्री (वाशिम शहराध्यक्ष), एकनाथ कड पाटील (वाशिम तालुका अध्यक्ष), रामा इंगळे (कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष), राजू कालवार (उत्तर भारतीय प्रकोष्ठ जिल्हाध्यक्ष), रामू ठेंगडे (ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष), हेमलता विसपुते (महिला मोर्चा शहराध्यक्ष), स्वप्निल जाधव (युवा मोर्चा शहराध्यक्ष), देवेंद्र बागरेचा (अल्पसंख्यांक मोर्चा शहराध्यक्ष), अमोल जाधव (ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष), प्रमोद इंगोले (ओबीसी मोर्चा ग्रामीण अध्यक्ष) तसेच विविध आघाड्यांचे अध्यक्ष, महिला-पुरुष पदाधिकारी व शहर व ग्रामीण भागातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान जिल्हा सरचिटणीस व नगरसेवक गणेश खंडाळकर यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत विचारांचे महत्त्व स्पष्ट केले.

# एक गाव एक संघ, एक दिवशाचे कबड्डी सामने

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील अमानी येथे एक गाव एक संघ यांचे एक दिवशासाचे कबड्डीचे दणदणीत सामने दिनांक १४ फेब्रुवारी शनिवारी रोजी आयोजित करण्यात आले आहेत.

५२ किलो वजनाचे आतील खेळाडू साठी ठेवण्यात आलेले असून प्रथम बक्षीस १५०००१/- पंधरा हजार रुपयेचे कृष्णा देशमुख, सरपंच वाघळुद, द्वितीय बक्षीस ११०००१/- अकरा हजार रुपये गणेश उंडाळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मालेगाव, तृतीय बक्षीस ७००१/- हजार रुपये उद्धव शेळके अमानी, चतुर्थ बक्षीस ५०००१/- पाच हजार रुपये महादेव गिरे यांच्या तर्फे पाचवे बक्षीस३००१/- तीन हजार रुपये स्व. गजानन लक्ष्मण खडसे यांच्या स्मृतीतील सागर गजानन खडसे यांच्यातर्फे व सहावे २००१/- सहावे बक्षीस दोन हजार रुपये श्रीराम सुपर शॉपी , मालेगाव यांच्या वतीने असे एकूण सहा बक्षीस असून प्रवेश फी ५०१ रुपये ७०१ रुपये आणि तक्रार पी ८०१ रुपये ठेवण्यात आल्याचे आयोजक ओलांडेश्वर क्रीडा मंडळ आमानी यांच्यावतीने कळविण्यात आले आहे. हे कबड्डीचे सामने परमहंस संत मुंगसाजी महाराज संस्थान आमनी येथे ठेवण्यात आले आहेत.

# रस्त्याच्या कामात अवैध गौण खनिजांचा वापर?

## 'जनमाध्यम'च्या वृत्तानंतर महसूल विभाग जागा; झरंडी तलाठ्यांना पंचनाम्याचे आदेश

IMPACT जनमाध्यम IMPACT

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम झरंडी परिसरात स्मशानभूमी व पुलाजवळील भागातून मुरूम व मातीसारख्या गौण खनिजांचे अवैध उत्खनन करून त्याचा थेट रस्त्याच्या कामात वापर करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या संदर्भातील वृत्त दैनिक जनमाध्यमने १२ फेब्रुवारीच्या अंकात प्रकाशित करताच महसूल विभागात खळबळ उडाली असून तहसीलदार राहुल वानखेडे यांनी तत्काळ दखल घेत झरंडीच्या तलाठ्यांना पंचनामा करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.




झरंडी परिसरातील स्मशानभूमी व पुलालगतच्या दोन ठिकाणांहून जेसीबी मशीनच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात मुरूम व मातीचे उत्खनन करण्यात आल्याचे उघड झाले आहे. या गौण खनिजांची बेकायदेशीर वाहतूक करून त्याचा वापर स्थानिक रस्त्याच्या कामासाठी करण्यात आल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे हा परिसर अतिदुर्गम असल्याने महसूल विभागाचे अधिकारी नियमितपणे फिरकत नसल्याची चर्चा आहे. याचाच फायदा घेत गौण खनिज माफियांनी सर्रास उत्खनन केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

वृत्त प्रसिद्ध होताच तहसीलदारांनी तातडीने कारवाईचे आदेश देत पंचनामा करून वस्तुस्थितीचा अहवाल मागविला आहे. आता या प्रकरणात संबंधितांवर नेमकी कोणती कारवाई होते, याकडे झरंडी परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. अवैध उत्खननाला पाठीशी घालणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

### रस्त्याच्या कामात गौण खनिजांचा वापर करणारा कोण?

झरंडी परिसरातील स्मशानभूमी व पुलाजवळील दोन ठिकाणांहून मुरूम व मातीचे उत्खनन करून ते रस्त्याच्या कामासाठी नेमके कुणी वापरले, याबाबत संभ्रम कायम आहे. संबंधित कंत्राटदार, स्थानिक यंत्रणा किंवा इतर कोणाचा यात सहभाग आहे का, याचा शोध महसूल विभाग घेत आहे. पंचनामा अहवालानंतरच या प्रकरणातील जबाबदारांवर कारवाई होणार असल्याचे संकेत आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ७९ ■ शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# वादाच्या ठिणगीने पेटली सूडाची ज्वाला; तरुणाची हत्या करून मृतदेह कालव्यात जाळला

## -नियोजनबद्ध कट उघड; सहा आरोपी जेरबंद, आर्वीत संतापाची लाट

**आर्वी (वर्धा) । जनमाध्यम :** आर्वी शहराला हादरवून सोडणाऱ्या थरारक घटनेत जुन्या वादातून तरुणाची निर्घृण हत्या करून त्याचा मृतदेह अमरावती जिल्ह्यात नेऊन जाळल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. या प्रकरणी अमरावती जिल्ह्यातील पथ्रोट पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. एका अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेण्यात आले आहे.

मृतक शेख शाहरुख शेख रऊफ (रा. आर्वी) याचा काही दिवसांपूर्वी आर्वीतील प्रशांत महाजन यांच्याशी वाद झाला होता. या वादातून सूडाची ठिणगी पेटल्याचे समोर आले आहे.

पोलिस तपासानुसार प्रशांत महाजन यांचा मुलगा टिंकेश महाजन आणि त्याचा आतेभाऊ शुभम मोहनलाल रॉय यांनी शाहरुखला संपविण्याचा कट रचला. अली अजगर सब्दर हुसेन याने पैशाचे आमिष दाखवत 'प्रकरण मिटवू' असे सांगून शाहरुखला गावाबाहेर बोलावले.



तेथे टिंकेश व अली अजगर यांनी त्याच्यावर प्राणघातक हल्ला केला.

हत्या केल्यानंतर आरोपींनी मृतदेह चारचाकी वाहनात टाकून अमरावती जिल्ह्यातील लेहगाव गाठले. शहानूर धरणाच्या कालव्यात मृतदेह जाळून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र पथ्रोट पोलिसांना अर्धवट जळालेला मृतदेह आढळल्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरली आणि कटाचा पर्दाफाश झाला.

या प्रकरणी टिंकेश महाजन, प्रशांत महाजन, अली अजगर सब्दर हुसेन, हर्षीत प्रकाश गौर (रा. अंजनगाव सुर्जी), निखील दीपचंद गौर (रा. अंजनगाव सुर्जी) यांच्यासह एका अल्पवयीन आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून एक कार आणि सात मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

दरम्यान, शेख शाहरुख बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या कुटुंबीयांनी ११ फेब्रुवारी रोजी आर्वी पोलिस ठाण्यात दाखल केली होती. घटनेची माहिती शहरात पसरताच संतप्त नातेवाईकांनी आर्वी पोलिस ठाण्यावर धडक देत आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. काही काळ पोलिस ठाण्याच्या परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलिसांच्या माहितीनुसार मृतकावर यापूर्वी हत्या, चोरी आणि जुगार कायद्यान्वये गुन्हे दाखल होते. तरीही या अमानुष हत्येमुळे आर्वी शहरात भीतीचे सावट पसरले असून पुढील तपास सुरू आहे.

'देशव्यापी कामगार संप'

# आयटकचा वर्ध्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## -हक्कांवर गदा, पोटावर लाथ : चार श्रमसंहितांविरोधात वर्ध्यात कामगारांचा ज्वालामुखी उसळला

**वर्धा जनमाध्यम :** संघर्षाच्या ज्वालेतून घडलेले ४४ कामगार कायदे रद्द करून केंद्र सरकारने आणलेल्या चार श्रमसंहितांविरोधात गुरुवार १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संप पुकारण्यात आला. वर्ध्यात आयटकच्या नेतृत्वाखाली दयालनगर रेल्वे स्टेशनपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत निघालेल्या मोर्चाने प्रशासनाचे लक्ष वेधले. हातात फलक, ओठांवर घोषणा आणि डोळ्यांत संताप अशा वातावरणात कामगार, शेतकरी आणि शेतमजूर रस्त्यावर उतरले.




२१ नोव्हेंबर रोजी काढण्यात आलेल्या अधिसूचनेमुळे या श्रमसंहितांची अंमलबजावणी मार्गी लागली आहे. यामुळे ग्रॅज्युटी, भविष्यनिर्वाह निधी, सामाजिक सुरक्षा, पेन्शन यांसारख्या हक्कांवर गदा येणार असल्याची भीती संघटनांनी व्यक्त केली. खाजगीकरणाला मोकळा रस्ता आणि कामगारांच्या हक्कांना कुलूप, असा आरोप यावेळी करण्यात आला. अंगणवाडी, आशा, गटप्रवर्तक, अंशकालीन स्त्री परिचर, शालेय पोषण आहार कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी यांच्या मानधनवाढीबाबत बजेटमध्ये कोणतीही ठोस तरतूद नसल्याने नाराजी उसळली. योजना कामगारांच्या तोंडाला पाने पुसली, असा संतप्त सूर सभेत उमटला.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांनाही या संपात ठळक स्थान होते. स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी, शेतमालाला हमीभाव आणि कर्जमुक्तीच्या मागण्यांकडे केंद्र सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला. आयटक राज्य सचिव दिलीप उटाणे यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या या मोर्चात संयुक्त कामगार संघटना कृती समितीचे अध्यक्ष गुणवंत डकरे, मनोहर पचारे, नंदकुमार वानखेडे, वंदना कोळणकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि हजारो योजना कामगार सहभागी झाले. राष्ट्रपतींच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांना तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन देण्यात आले.

**मुख्य मागण्या:**

चार श्रमसंहिता रद्द कराव्यात, योजना कामगारांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन वेतन लागू करावे, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ग्रॅज्युटी लागू करावी, सामाजिक सुरक्षा व दरमहा पेन्शन द्यावी, सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण थांबवावे आणि शेतमालाला हमीभाव द्यावा. कामगारांच्या घोषणा संपल्या असल्या, तरी त्यांच्या हक्कांची लढाई अजून थांबलेली नाही, हेच या संपातून अधोरेखित झाले.

# देशव्यापी संपाला वर्ध्यात प्रतिसाद; रेल्वे स्थानकावर कामगारांचा निर्धारयुक्त एल्गार



**वर्धा जनमाध्यम :** केंद्रीय ट्रेड युनियनच्या आवाहनावरून बुधवारी (१२ फेब्रुवारी) झालेल्या अखिल भारतीय संपाला वर्ध्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपाला नैतिक पाठिंबा दर्शवत वर्धा शाखेच्या वतीने रेल्वे स्थानक परिसरात निदर्शने करण्यात आली. कामगार एकतेचे नारे आणि घोषणांनी परिसर काही काळ दणाणून गेला.

या आंदोलनाचे नेतृत्व सहायक महामंत्री (मुख्यालय) एस. के. झा यांनी केले. शाखाध्यक्ष मुहम्मद जाहिद यांनी अध्यक्षस्थान भूषविले, तर शाखासचिव चंद्रेश्वर पांडेय यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविकात संपामागील भूमिका स्पष्ट करताना कामगारांच्या हक्कांवर गदा आणणारे निर्णय मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

रक्षित अश्वघोष, रोहित काटे, रविंद सिंह आणि राकेश कुमार यांनी आपल्या भाषणात कामगारांच्या एकजुटीची गरज अधोरेखित केली. श्रमिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन आणखी तीव्र केले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

निदर्शनात चंदन कुमार, अभिषेक थूल, गणेश कुमार, रौशन लांडगे, राहुल कुमार, प्रशांत गाडलिंग, ओंकार मिश्रा, अतुल पाटील, विजय मीनोटे, चेतन गवांडे, अविनाश मेंढे, प्रशांत मेंढे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

शांततेत पार पडलेल्या या आंदोलनामुळे रेल्वे स्थानक परिसरात काही काळ उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले होते.

# पेठ अहमदपूरात अल्पभूधारक शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील पेठ अहमदपूर येथे कर्जाच्या विवंचनेने ग्रासलेल्या शेतकऱ्याने गळफास घेऊन जीवन संपविल्याची हृदयद्रावक घटना दि. १२ फेब्रुवारी रोजी पहाटे उघडकीस आली. विनोद सीताराम मेहतकर (वय ५०) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून त्यांच्या निधनाने संपूर्ण गाव शोकमग्न झाले आहे. अल्पभूधारक असलेल्या मेहतकर यांनी बँकेकडून कर्ज घेऊन शेतीत पेरणी केली होती. मात्र सततचा अवेळी पाऊस, पिकाला न मिळालेला हमीभाव आणि खाजगी देणेकऱ्यांचा तगादा यामुळे ते मागील काही दिवसांपासून चिंतेत होते. कर्जाची परतफेड कशी करायची, मुलांचे भविष्य कसे घडवायचे, या विचारांनी ते अस्वस्थ राहत असल्याचे नातेवाईकांनी सांगितले. दि. ११ रोजी रात्री आठच्या सुमारास जेवण करून ते टेकडीवाले बाबा यात्रेस गेले होते. रात्री उशिरा घरी परतल्यानंतर पहाटेच्या सुमारास त्यांनी टोकाचा निर्णय घेतल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. दि. १२ रोजी पहाटे पाच वाजता घरातील एका महिलेला ते घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले. क्षणात गावात खळबळ उडाली. माहिती मिळताच आष्टी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आष्टी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. कुटुंबाच्या आक्रोशाने परिसरातील वातावरण हेलावून गेले.

# पंचायत समितीच्या आवारातच विषप्राशन; आर्वीत खळबळ

## -वाई (रोहणा) येथील आशिष मसराम यांची प्रकृती चिंताजनक; कारण अद्याप अस्पष्ट

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी पंचायत समितीच्या आवारातच एका व्यक्तीने कीटकनाशक प्राशन केल्याची धक्कादायक घटना गुरुवार, १२ फेब्रुवारी रोजी घडली. या प्रकारामुळे पंचायत समिती परिसरात एकच खळबळ उडाली. आशिष मसराम (रा. वाई, ता. आर्वी) असे विष प्राशन करणाऱ्या व्यक्तीचे नाव असून त्यांच्यावर सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



माहितीनुसार, आशिष मसराम गुरुवारी दुपारच्या सुमारास आर्वी पंचायत समिती कार्यालयात आले. त्यांच्या हातात थोर पुरुषांचे फोटो होते. घोषणाबाजी करीत त्यांनी पंचायत समितीच्या आवारातच कीटकनाशक गिळले. हा प्रकार लक्षात येताच परिसरात उपस्थित कर्मचाऱ्यांमध्ये व नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला.


घटनेची माहिती मिळताच विस्तार अधिकारी (सामान्य) पवन भोपळे यांनी तातडीने गटविकास अधिकाऱ्यांना कळविले. परिसरातील नागरिकांच्या मदतीने आशिष यांना तत्काळ आर्वी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात हलविण्यात आले.

या घटनेची नोंद आर्वी पोलिसांनी घेतली असून, आशिष मसराम यांनी नेमक्या कोणत्या कारणास्तव पंचायत समितीच्या आवारात विषप्राशन केले, हे वृत्त लिहिस्तोवर स्पष्ट होऊ शकले नव्हते. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# शेत रस्त्याच्या वादातून तुरीचे ढिगारे जळाले

## -कोलगाव येथे ३० क्विंटल तूर खाक; २.४० लाखांचे नुकसान

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील कोलगाव शिवारात शेत रस्त्याच्या जुन्या वादातून तुरीचे ढिगारे जाळल्याची घटना घडली आहे. या आगीत सुमारे ३० क्विंटल तूर जळून खाक झाली असून अंदाजे २ लाख ४० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे, याप्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मयूर अनिल काळबांडे (रा. सेलू) यांचे कोलगाव शिवारात सर्व्हे क्रमांक १४/२ व ४०/१ मध्ये शेत आहे. शेजारील शेतकरी वामन शालीक चौधरी यांच्याशी शेत रस्त्याच्या कारणावरून काही काळापासून वाद सुरू आहे. हे प्रकरण सध्या अपर जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या न्यायालयात प्रलंबित आहे.

११ फेब्रुवारी रोजी काळबांडे यांनी शेतातील तुरीची खांड काढून ढिगारे रचून ठेवले होते. १२ फेब्रुवारीच्या सकाळी शेजारील शेतकरी दिलीप काटोले यांनी मोबाईलवरून तुरीचे ढिगारे पेटल्याची माहिती दिली. घटनास्थळी पोहोचल्यावर संपूर्ण ढिगारे जळाल्याचे दिसून आले.

प्राथमिक अंदाजानुसार ३० क्विंटल तूर जळाली आहे. सध्याचा बाजारभाव सुमारे ८ हजार रुपये प्रति क्विंटल असल्याने एकूण नुकसान २ लाख ४० हजार रुपयांपर्यंत पोहोचते. शेत रस्त्याच्या वादातून आग लावण्यात आल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला असून संबंधितांविरुद्ध तक्रार नोंदविण्यात आली आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. हंगामाच्या तोंडावर शेतमालाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. प्रशासनाने तत्काळ पंचनाम्यानुसार मदत जाहीर करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# वर्ध्यात १२१ रुग्णवाहिका विना फिटनेस; आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

## शासकीय ॲम्बुलन्सलाही चलाण; आरटीओची कारवाई, नोटिसांचा वर्षाव

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील रुग्णवाहिका व्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. एकूण २०१ नोंदणीकृत रुग्णवाहिकांपैकी तब्बल १२१ रुग्णवाहिकांचे योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस) मुदतबाह्य असल्याचे उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या तपासणीत उघड झाले. या पार्श्वभूमीवर संबंधित वाहनधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या असून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, फिटनेस नसल्यामुळे एका शासकीय रुग्णवाहिकेलाही चलाण देण्यात आले आहे.

जिल्ह्यात ८६ शासकीय आणि उर्वरित खासगी अशा एकूण २०१ रुग्णवाहिका कार्यरत आहेत.

रस्ता सुरक्षा सप्ताहादरम्यान करण्यात आलेल्या तपासणीत अनेक वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र कालबाह्य झाल्याचे स्पष्ट झाले. तांत्रिकदृष्ट्या अपात्र वाहनांचा वापर रुग्णसेवेसाठी होत असल्याचे निदर्शनास आल्याने प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. एमएच ३२ एजे ३४३३ क्रमांकाच्या शासकीय रुग्णवाहिकेला फिटनेस नसल्याच्या कारणावरून चलाण देण्यात आले. सध्या हे वाहन जिल्हा परिषद आवारात उभे आहे. शासकीय वाहनावर कारवाई झाल्याने प्रशासनात चर्चेला उधाण आले आहे.



**देणगीत मिळालेली रुग्णवाहिका-** चलाण झालेली रुग्णवाहिका आरोग्य विभागाला बजाज फाऊंडेशनने देणगी म्हणून दिली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. देणगीत मिळालेल्या वाहनालाही नियमानुसार फिटनेस प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.आरोग्यसेवेत रुग्णवाहिका ही अत्यावश्यक कडी मानली जाते. अशा परिस्थितीत तांत्रिक निकषांचे पालन न झाल्याचे उघड झाल्याने सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त होत आहे. संबंधित विभागांनी वेळेत प्रमाणपत्रे नूतनीकरण करून सेवा सुरळीत ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**डॉ. स्वप्नील बेले, जिल्हा आरोग्य अधिकारी, म्हणाले,**

सदर रुग्णवाहिका रुग्णांच्या वाहतुकीसाठी वापरली जात नव्हती. औषध भंडारातून विविध शासकीय रुग्णालयात औषधे पोहोचवण्यासाठी तिचा वापर होत होता. चलाणाबाबत वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

# संजय आकरे यांचे दीर्घ आजाराने निधन

**वर्धा -** हरिहरनगर अवधूतवाडी, आकरे ले-आउट येथील रहिवासी संजय विठ्ठलराव आकरे यांचे वयाच्या ५७ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान १२ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.०० वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा,एक मुलगी भाऊ, बहिणी,जावई व बराच मोठा आप्तपरिवार आहे. ते हॉटेल व्यवसायिक बाबाराव आकरे यांचे लहान बंधू होतं. आज दिनांक १३ फेब्रुवारी रोजी अवधूतवाडी येथील निवासस्थानावरून सकाळी ११.०० वाजता त्यांची अंत्ययात्रा निघणार आहे.



# श्रीधर निनावे यांचे निधन

**हिंगणघाट :** येथील मारुती वार्ड निवासी श्रीधरराव बाजीराव निनावे यांचे गुरुवार १२ फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजताच्या सुमारास दुःखद निधन झाले, ते ९४ वर्षाचे होते, त्यांच्या पश्चात पत्नी पाच मुले, स्नुषा, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर वना येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



ग्रामीण भागात बँकिंगचा नवा श्वास

# वर्ध्यात राष्ट्रीयकृत बँकेच्या सहा शाखांसाठी खासदार अमर काळे यांचा पाठपुरावा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण नागरिकांच्या बँकिंग अडचणी लक्षात घेता खासदार अमर काळे यांनी राष्ट्रीयकृत बँकेच्या सहा नव्या शाखा सुरू करण्यासाठी केंद्र सरकारकडे ठोस आणि आक्रमक पाठपुरावा सुरू केला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन तसेच संबंधित बँकांच्या प्रबंध निदेशकांना पत्र देत त्यांनी तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या सुमारे १३ लाख होती. मात्र गेल्या दीड दशकात ती मोठ्या प्रमाणात वाढून सुमारे २८ लाखांच्या घरात पोहोचल्याचा अंदाज आहे. वाढती लोकसंख्या, शासनाच्या विविध योजना, थेट लाभ हस्तांतरण (DBT) आणि डिजिटल व्यवहारांमुळे ग्रामीण भागात बँकिंग सेवांची गरज प्रचंड वाढली आहे.



सध्या जिल्ह्यात राष्ट्रीयकृत बँकांच्या ११५ शाखा आणि ग्रामीण बँकेच्या केवळ सहा शाखा आहेत. विशेष म्हणजे, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ४८ शाखा मागील १५ वर्षांपासून बंद आहेत. या शाखा प्रामुख्याने ग्रामीण भागात होत्या. परिणामी शेतकरी, महिला बचतगट, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना व्यवहारांसाठी तालुक्याच्या ठिकाणी धाव घ्यावी लागत आहे. तळेगाव टालाटुले (ता. वर्धा), दहेगाव गोसावी (ता. सेलू), रसुलाबाद (ता. आर्वी), नारा (ता. कारंजा), वेळा (ता. हिंगणघाट) आणि सेवाग्राम (ता. वर्धा) या ठिकाणी शाखा सुरू करण्याचा प्रस्ताव खासदार काळे यांनी मांडला आहे. संबंधित गावांची लोकसंख्या २०११ मध्ये ५ हजारांपेक्षा कमी असली तरी २०२६ पर्यंत ती निश्चितच वाढल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सिंदीतील वाढता ड्रायफ्रूट व्यवसाय, सेवाग्राम औद्योगिक क्षेत्र आणि विविध शासकीय योजनांच्या पार्श्वभूमीवर या शाखा सुरू झाल्यास ग्रामीण अर्थचक्राला बळ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. खासदार काळे यांच्या पाठपुराव्यामुळे आता केंद्र सरकार काय निर्णय घेते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# अंघोळीला गेले आणि परतलाच नाहीत

## समृद्धीवर काम करणाऱ्या कामगाराचा तलावात दुर्दैवी अंत

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी घरापासून दूर समृद्धी महामार्गावर काम करणाऱ्या ५४ वर्षीय कामगाराचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची हृदय पिळवटून टाकणारी घटना गुरुवारी उघडकीस आली. परशराम सीताराम कुऱ्हाडे (रा. पोहा, ता. कारंजा (ला.), जि. वाशिम) असे मृताचे नाव आहे.

सिंदी येथील टोल नाक्याजवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी परशराम कुऱ्हाडे हे सहकाऱ्यांसह येथे आले होते. गुरुवारी पहाटे अंघोळीसाठी ते टोल नाक्यालगत असलेल्या तलावावर गेले. सकाळी साडेसहाच्या सुमारास तलावात एका व्यक्तीचा मृतदेह तरंगताना दिसताच परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच सिंदी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. टोल नाक्यावरील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर परशराम हे अंघोळीसाठी तलावात उतरल्याचे स्पष्ट झाले. त्यांना मिर्गीचा आजार असल्याची माहिती समोर आली असून पाण्यात उतरल्यावर झटका आल्याने तोल जाऊन बुडून मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. परशराम यांच्या अचानक झालेल्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे होणार वेगाने परिवर्तन-मुख्यमंत्री



● टाटा ट्रस्ट व नाम फाऊंडेशन सोबतच्या करारांमुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास महाराष्ट्रभर पोहोचविणार

● टाटा ट्रस्ट सोबत 12 व नाम फाऊंडेशन सोबत एक सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवीत आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल,असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाऊंडेशन सोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्तकेला. टाटा ट्रस्ट व नाम फाऊंडेशन सोबत झालेल्या करारामळे वेगवेगळया क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे उपस्थित होत्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणे याला शासनाचे प्राधान्य आहे. या भागीदारींमुळे विविध कल्याणकारी शासकीय योजना अधिक लोकोपयोगी होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत आहे. टाटा ट्रस्टचे सहकार्याने विविध विभागांच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव पाडण्यात यशस्वी होउ. समाजातील सर्व घटकात उत्पन्न वाढून जगण्याचा स्तर उंचावण्यास यामुळे निश्चितच मदत होईल. दुर्धर आजारांवर महागड्या उपचार पद्धतीमुळे सामान्य नागरिकांना मर्यादा येतात मात्र राज्यात यापुढे उपचाराविना कुणीही मृत्यू पावणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात येत आहे. टाटांची मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मोठी मदत असून यामुळे आपण गरजू रुग्णांना निश्चित स्वरूपाची मदत देउ शकतो.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षापासून टाटा ट्रस्ट सोबत शासन काम करीत आहे. केवळ निधी देउन भागीदारी होत नाही, तर काम करून समाजात सकारात्मक प्रभाव पाडणारी भागीदारी टाटा करत असते. हे बहु-आयामी करार माता, नवजात बालक, बाल आणि किशोरवयीन घटकांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे, खुंटलेली वाढ रोखून कुपोषणावर उपाय शोधण्यासाठी मदतगार ठरतील. या सोबतच पोषणासाठी आहारात वैविध्य आणणे, जलस्रोतांचे अधिक शाश्वतपणे जतन आणि व्यवस्थापन, ग्रामीण महाराष्ट्रात हवामान आधारित कृषी आणि पशुधन विकासाला चालना देण्याची क्षमता या भागीदारीत आहे.नाम फाऊंडेशन राज्यात जलसंधारणामध्ये मोठे काम करीत आहे. मागील काळात जल स्त्रोतांमधील गाळ काढणे , नाला,नदी खोलीकरण व रुंदीकरण आदी कामे करण्यात आली आहेत. राज्यात जलयुक्तशिवार योजना यशस्वीपणे राबविण्यात आली. ही योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत जनतेची योजना झाली. नाम फाऊंडेशनच्या सहभागाने विदर्भ व मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेल्या भागात जलसंधारणाचे मोठे काम झाले. यासाठी टाटा मोटर्सचीही मदत झाली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा म्हणाले, महाराष्ट्र शासनाशी भागीदारी करून आरोग्य, शिक्षण, पोषण, उपजीविका, पाणी आणि स्वच्छता कार्यक्रमांमध्ये सुसूत्रता आणणार आहे. सर्व सामन्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न राहणार आहे. शासनाचे विविध विभाग आणि समुदायांसोबत सकारात्मक परिणाम आणण्याचा हेतू असणार आहे. शासन आणि टाटा ट्रस्ट्स यांनी आज राज्याच्या एकात्मिक विकासाला पाठबळ देण्यासाठी सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करून धोरणात्मक भागीदारी अधिकृत केली आहे. नाम फाऊंडेशनचे नाना पाटेकर यांनीही शासनासोबत जलसंधारण क्षेत्रात काम करण्यास मदत मिळत असल्याबाबत समाधान व्यक्त केले. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव (आरोग्य) डा. निपुण विनायक, सचिव (महिला व बालविकास) अनुपकुमार यादव, टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा, नाम फाऊंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, टाटा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धार्थ शर्मा आदींसह टाटा ट्रस्ट व नाम फाऊंडेशन च पदाधिकारी उपस्थित होते.

**कराराचा उद्देश-**सामंजस्य करार तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी' याद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना पाठबळ देणे, समुदायांपर्यंत प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत केलेल्या करारांद्वारे, गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत दुर्धर गंभीर आजारांमध्ये सुलभ व कमी खर्चाचे उपचार उपलब्ध करून देणे आहे.

**सामंजस्य करारांची व्याप्ती-**माता, नवजात बालक, बालक आणि किशोरवयीन मुलांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे; टेलिमेडिसिनसह इतर माध्यमांतून उपचार सहज देणे, शहरी आणि दुर्गम भागातील सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा वाढवणे, एकात्मिक आपत्कालीन व्यवस्थापन सेवाद्वारे उत्तम आपत्कालीन प्रतिसादास पाठबळ देणे. दोन वर्षांखालील मुलांमधील खुंटलेली वाढ, कमी वजन आणि कुपोषण रोखण्यास मदत करणे, किशोरवयीन कुपोषण आणि रक्तक्षय दूर करणे, गडचिरोली सारख्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून 'टेक-होम रेशन' सारख्या योजनांचे वितरण मजबूत करणे, तलावांचे पुनरुज्जीवन, जलकुंभ आणि नद्यांमधील गाळ काढणे, भूजल पुनर्भरण सुधारणे, मराठवाडा आणि विदर्भासह पाणीटंचाईग्रस्त भागांवर विशेष भर देउन मृद व जलसंधारण योजनांची अंमलबजावणी करणे, हवामान बदलांचा अभ्यास करून शेतीला प्रोत्साहन देणे, वन-आधारित आणि ग्रामीण बिगर-शेती उपजीविकेला पाठबळ देणे, आरोग्य, शिक्षण, पोषण, पाणी, स्वच्छता आणि उपजीविका या सर्वांना एकत्र आणणारा एकात्मिक ग्राम विकास साधणे.

**असे आहेत करार-** टाटा ट्रस्टच्या सोबत शासनाने एकूण १२ करार केलेले आहेत. यामध्ये ग्रामविकास, जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, गडचिरोली जिल्हा प्रशासन, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, नागपूर येथील राष्ट्रीय कर्करोग संस्था, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, मध्य भारत आयुर्विज्ञान संस्था, केअर हास्पिटल, स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन, मिदास मल्टी स्पेशालिटी हास्पिटल सोबत सामंजस्य करारांचा समावेश आहे. तसेच नाम फाऊंडेशन, टाटा मोटर्स यांचा जलसंधारण विभागासोबत करार करण्यात आला आहे.

# भारतातील पहिल्या संगीतमय रस्त्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्घाटन



**थोडक्यात संगीतमय रस्ता**

- भारतातला पहिलावहिला संगीतमय रस्ता
- दक्षिणेकडून उत्तरेकडे जाताना मरीन ड्राइव्हवरील बोगदा संपल्यावर संगीतमय रस्त्याचा प्रारंभ
- पहिल्या मार्गिकेवर पहिल्या टप्प्यात 500 मीटर पर्यंत विशेष पट्ट्या.
- रस्त्यावरील विशेष पट्ट्या आणि 60 ते 70 च्या गतीने जाणा-या वाहनाच्या चाकांच्या घर्षणातून स्वरांची निर्मिती.
- वाहनातील प्रवाशांना कोणत्याही वेगळ्या उपकरणाशिवाय वाहनात ऐकू येतोय स्लमडॉग मिलेनियर चित्रपटातील 'जय हो' गाण्याचे संगीत.

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणा-या धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारी रस्त्याला (कोस्टल रोड) आता नवी ओळख मिळाली आहे. मुंबईच्या वाहतुकीत महत्त्वाची भूमिका बजावणारा हा मार्ग आता देशातला सर्वांत पहिला संगीतमय रस्ता म्हणून ओळखला जाणार आहे. या रस्त्याचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अमरसन्स गार्डन जवळ करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वाहन या संगीतमय पट्ट्यांवरून धावत स्लमडॉग मिलेनियर या चित्रपटातील लोकप्रिय ' जय हो' गाण्याच्या संगीताचा आवाज ऐकू आल्यावर त्यांच्या समवेत वाहनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी खासदार राहुल शेवाळे , मुंबई महापालिकेचे अतिरिक्तआयुक्तअविनाश ढाकणे, हंगेरी देशाचे कौन्सिल जनरल फ्रेंक जारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना म्हणाले, धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारी मार्गावरून उत्तरेकडील मार्गिकेवर प्रवास करताना संगीतमय रस्त्याचा अनुभव येणार आहे. ही अभिनव संकल्पना आहे. वाहनचालकांना अद्ययावत हंगेरियन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जय हो या स्लमडाग मिलेनियर या चित्रपटातील जगप्रसिद्ध गाण्याची धून ऐकण्याची पर्वणी मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात या रस्त्यावर ५०० मीटर लांब विशेष संगीतमय रिब्स (पट्ट्या) बसविण्यात आल्या आहेत. या पट्ट्यांमधील विशिष्ट अंतर आणि त्यावरून ताशी ६० ते ७० किलोमीटर प्रति वेगाने जाणा-या वाहनाच्या चाकाचे होणारे घर्षण यामुळे स्वरांची निर्मिती होते. हे स्वर त्या वाहनातील प्रवाशांना ऐकू येतील. आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्ययावत तंत्रज्ञान, भारतीय संस्कृती आणि संगीताचा सुंदर मिलाफ म्हणून संगीतमय रस्ता देशभरात कुतूहलाचा विषय ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

# अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील 5012 सहायक प्राध्यापक पद भरतीस मान्यता



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाउल उचलले आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील ५ हजार १२ रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे.अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. मंत्री चंद्रकांत दादा पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) निर्देशानुसार प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे अनिवार्य होते. याच पार्श्वभूमीवर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

**भरती प्रक्रियेच्या प्रमुख अटी व शर्ती-**विद्यार्थी संख्येवर आधारित पदे दि.१ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार निश्चित झालेल्या कार्यभाराच्या आधारे ही ५,०१२ पदे भरली जातील. ही भरती प्रक्रिया विहित कालमर्यादेत आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालक (पुणे) आणि विभागीय सहसंचालकांची असेल. ज्या शैक्षणिक संस्थांकडे 'नॅक' (NAAC) मान्यता आहे, त्यांनाच नवीन पदनिर्मितीचा लाभ मिळेल. मात्र, ज्यांचे मूल्यांकन कमी आहे, त्यांना सुधारणेसाठी ३ वर्षांचा सवलतीचा कालावधी (Grace Period) देण्याबाबत शासन स्वतंत्र धोरण आखणार आहे.

**आचारसंहितेचे पालन-** भरती प्रक्रियेदरम्यान राज्यात आचारसंहिता लागू असल्यास, निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.सूचनांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी संचालक,उच्च शिक्षण पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदांचा सुधारित आराखडा (आकृतीबंध) निश्चित करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या स्तरावर एक समिती नियुक्तकेली जाणार आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध आहे.

# अपात्र ठरलेल्या 900 संस्थांवर विभागाची कारवाई

## दिव्यांग क्षेत्रातील संस्थांसाठी नोंदणी बंधनकारक-सचिव तुकाराम मुंढे

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात दिव्यांग व्यक्ती अधिनियम अंतर्गत दिव्यांगासाठी कार्यरत संस्थांना दिव्यांग कल्याण आयुक्तयांच्याकडे नोंदणी असणे अनिवार्य आहे. राज्यात साधारणतः दोन हजारांहून अधिक संस्था दिव्यांगांच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. यापैकी सुमारे ९०० संस्था विविध कारणांमुळे अपात्र ठरल्याने त्यांच्यावर विभागाने कारवाई करून त्यांची नोंदणी रद्द केली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले. विशेष म्हणजे सन २०२५ या वर्षातच ३६३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. नोंदणी रद्द केलेल्या संस्थांमध्ये कोकण ५२, नाशिक ४९, पुणे ६०, नागपूर ४९, अमरावती ५० आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील १०३ संस्थांचा समावेश आहे. सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, संस्था सोसायटी नोंदणी कायदा १८६०, बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा,१९५० किंवा कंपनी कायदा (कलम ८) अंतर्गत नोंदणीकृत असल्यानंतरसुद्धा दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५० अंतर्गत नोंदणी बंधनकारक आहे. विभागाने केलेल्या कारवाईमुळे शासनाचा निधी योग्य संस्थांवर खर्च होईल. ज्या संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्यरत आहेत किंवा कार्य करू इच्छितात त्यांनी दिव्यांग कल्याण आयुक्तलयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. अशा सर्व संस्थांनी २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत https://divyangkalyan. maharashtra. gov.in/ या संकेतस्थळावर नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास संबंधित संस्थांवर अधिनियमातील कलम ९१ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे.

# ठप्प, शुकशुकाट, विस्कळीत, विलंब!

## भारत बंदचा महाराष्ट्रावर परिणाम एसटी बस, बँकिंग सेवा विस्कळीत अनेक सेवा खोळंबल्या

**मुंबई/पुणे/नाशिक :** केंद्र सरकारच्या नव्या कामगार कायद्याच्या विरोधात देशातील १० प्रमुख कामगार संघटना आणि शेतकरी संघटकांनी आज देशव्यापी भारत बंदची हाक दिली होती. याला महाराष्ट्रातील काही संघटनांनीही पाठिंबा दिला होता. भारत बंदचा महाराष्ट्रातही मोठ्या प्रमाणात परिणाम दिसून आला असून अनेक जिल्ह्यांत एसटी बसेच्या सेवांवर परिणाम झाला होता. तर बँकिंगची सेवाही विस्कळीत झाली होती. राज्यातील अनेक बाजारपेठात शुकशुकाट होता. भारत बंदचा फटका महाराष्ट्रात सर्वाधिक बँकिंग क्षेत्राला बसणार आहे. ऑल इंडिया बँक एम्प्लाईज असोसिएशनसह अनेक संघटनांनी आजच्या संपात सहभाग घेतला. त्यामुळे सरकारी बँकांमधील कामकाज, चेक क्लिअरन्स आणि रोख व्यवहार विस्कळीत झाले. वढक, नेट बँकिंग आणि अळट सेवा सुरळीत असल्यामुळे थोडा दिलासा मिळाला.



**एसटी बसेसवर परिणाम-**भारत बंदला महाराष्ट्रातील संयुक्तकृती समितीने पाठिंबा दिला होता. त्याचा फटका एसटी बसेसच्या सेवांवर झाला. काही जिल्ह्यांत एसटी बसच्या फे-या कमी झाल्याचे दिसले. तर मायानगर मुंबईतील बेस्ट आणि पुण्यात पीएमपीएल सेवा अंशतः सुरू आहेत. लोकल ट्रेन्स आणि मेट्रो सेवांवर जास्त परिणाम झालेला नाही. पण लोकल उशीराने धावत आहेत.

**मार्केटमधील आवक मंदावली-**नवी मुंबईतील वाशी एपीएमसी मार्केटमधील कामगारांनी आजच्या भारत बंदमध्ये सहभाग घेतला होता. त्याचा परिणाम झाल्याचे दिसतेय. कामगारांच्या सहभागामुळे एपीएमसी मार्केटमध्ये आवक काही प्रमाणात मंदावल्याचे चित्र होते. रुग्णालय, रुग्णवाहिका, औषध दुकाने, दूध पुरवठा आणि अग्निशमन दल यांसारख्या अत्यावश्यक सेवा सुरळीत सुरू होत्या.

**हजारो कामगार उतरले रस्त्यावर-** विविध मागण्यांसाठी अमरावती जिल्ह्यातील हजारो कामगार उतरले रस्त्यावर उतरले होते. इर्विन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हजारो लोक रस्त्यावर उतरले होते. मोर्चात जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, आशा सेविकाही सहभागी झाल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर हा मोठा मोर्चा अमरावतीत निघाला होता. यावेळी कामगारांकडून विविध मागण्यांसाठी जोरदार घोषणा देण्यात आल्या. पीएफआरडी कायदा रद्द करून जुनी पेंन्शन योजना लागू करा. तथा फंड मॅनेजरकडे संचित झालेली रक्कम संबंधित राज्य सरकारला परत करण्यात यावी, यासारख्या मागण्यांसाठी कर्मचा-यांकडून संप पुकारण्यात आला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 12 किल्ल्यांचे जागतिक वारसा प्रमाणपत्र यूनेस्कोकडून मंत्री शेलार यांनी स्वीकारले

## युनेस्को मुख्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाउन स्वीकारले. यूनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळयास मंत्री ॲड.शेलार यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी ११ जुलै २०२५ रोजी, यूनेस्कोच्या ४७व्या अधिवेशनात, मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पॅरिस येथे स्वीकारले.छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणाशी लढून उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याण, यासाठी साकारलेली गड-किल्ल्यांची साखळी हा भारतीय इतिहासातील अद्वितीय लष्करी व राज्यकारभाराचा नमुना मानला जातो.

रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा १२ किल्ल्यांचा समूह जागतिक वारसा स्थळ म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी २०२५ मध्ये मंत्री . शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तीवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान स्वीकारताना आज उर भरून आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन आणि परिश्रम तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या योगदानाबद्दल मंत्री शेलार यांनी आभार मानले आहेत. भारताचे युनेस्कोमधील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांनीही परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचेही तमाम महाराष्ट्रातर्फे मंत्री शेलार यांनी आभार मानले. तसेच हा महाराष्ट्रासाठी, देशासाठी शिवप्रेमींसाठी गौरवाचा क्षण असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. भारत संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा युनेस्को मुख्यालयाला भेट दिला असून, २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त या पुतळ्याची स्थापना पॅरिसमध्ये युनेस्को मुख्यालयात झाली आहे. सामाजिक न्याय, समानता, बंधुता आणि शिक्षणाद्वारे सक्षमीकरण यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली शिकवण ही युनेस्कोच्या मुलभूत ध्येयाशी सुसंगत आहे. पॅरिसमधील त्यांच्या या स्मारकाला मंत्री शेलार यांनी अभिवादन केले. यावेळी विशाल शर्मा यांच्यासह विभागाचे डॉ. सचिव किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक हेमंत दळवी आणि मान्यवर उपस्थित होते.




# स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी अकरा शासकीय वसतिगृह

**मुंबई/प्रतिनिधी :** स्थलांतरित उसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी संत भगवान बाबा शासकीय वसतिगृह योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील ११ वसतिगृहांच्या बांधकामासाठी १५९ कोटी ३६ लाख ६० हजार इतक्या रकमेच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली. उसतोड कामगारांच्या मुलांची शिक्षणाबाबतची आस्था वाढीस लावून त्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर करण्यासाठी स्थलांतरित उसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी 'संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना' सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील उसतोड कामगारांची संख्या अधिक असलेल्या ४१ तालुक्यांच्या ठिकाणी मुलांसाठी ४१ व मुलीसाठी ४१ अशी एकूण ८२ (प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमता) शासकीय वसतिगृह सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यात मुलांसाठी १० व मुलींसाठी १० अशी एकूण २० शासकीय वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत मान्यता देण्यात आलेल्या ८२ शासकीय वसतिगृहापैकी पहिल्या टप्प्यात सुरू करण्यात आलेली २० शासकीय वसतिगृहे वगळता उर्वरित ६२ शासकीय वसतिगृह सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात दोन (मुलांचे १ व मुलीचे १) प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमता) अशी एकूण २२ शासकीय वसतिगृहे सुरु करण्यास सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णयाद्वारे यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## पोशिंद्याला जगवा

इ.स २००० नंतर शेतकरी आत्महत्येचे प्रमाण महाराष्ट्रात वाढलेले असून विदर्भात याचे प्रमाण अधिक आहे.हवामान बदल, ओला व कोरडा दुष्काळ, प्रतिकूल आर्थिक परिस्थिती आणि कर्जबाजारीपणामुळे अनेक शेतकरी आपल्या आयुष्याचा शेवट करून घेतात, हे दुर्दैवी वास्तव. देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात (३८ टक्के) होत असून, ही बाब चिंताजनक आहेच, त्या रोखण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारीही आहे. २०२५ च्या पहिल्या आठ महिन्यांतच राज्यातील ११,१८३ शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली. या पार्श्वभूमीवर शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी स्वतंत्र कृतिदल निर्माण करण्याचा निर्णय राज्याच्या कृषी विभागाने घेतला. असे कृतिदल निर्माण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले. दलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्याबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींवर सर्वसमावेशक उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. तज्ज्ञांचा समावेश असल्यामुळे त्या प्रभावी आणि नेमक्या असतील, अशी अपेक्षा. शेतकऱ्यांच्या समस्या तांत्रिक, आर्थिक त्याचप्रमाणे मानसिक आहेत, याची जाण ठेवून तज्ज्ञांची निवड केल्याचे दिसते. हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान, आर्थिक अडचणी, सामाजिक ताणतणाव आणि मानसिक अस्थैर्याच्या समस्या निर्माण होतात. या अडचणींचा सामना करता यावा आणि नैराश्यातून बाहेर पडता यावे, यासाठी मार्गदर्शन आणि मानसिक आधाराची आवश्यकता असते. म्हणूनच आत्महत्या रोखण्यासाठीच्या प्रयत्नांबरोबरच आपत्तीपूर्व, आपत्तीकालीन आणि आपत्तीपश्चात शेती, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक या चतुःसूत्री दृष्टिकोनातून एकात्मिक उपाययोजना राबवण्यासाठी कृतिदलाची स्थापना केली जात आहे. आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास व संशोधन करावे लागेल. हवामान बदलाच्या परिणामांवर अचूक उपाययोजना सुचवाव्या लागतील. आत्महत्या होऊच नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजावे लागतील. विभागीय आणि जिल्हास्तरावर अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करावा लागेल. शासकीय, निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधावा लागेल.नुकसानभरपाई दिली की संपले, असे मानण्याचा हा विषय नाही. शेतकऱ्याचे कशा पद्धतीने सक्षमीकरण करता येईल, हे पाहावे लागेल. कृषी विभागातील वेगवेगळ्या योजनांची सांगड सरकारच्या इतर विभागांच्या उपक्रमांशी घालून, उत्पादन आणि उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करावे लागतील. आत्महत्या रोखण्यासाठी यापूर्वीच्या अनेक समित्यांनी आजवर सुचवलेल्या उपायांचा, अहवालांचा अभ्यास करून हे नवे कृतिदल बदलत्या काळानुसार गरजेच्या उपाययोजना अधिक व्यापकपणे राबवणार आहे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा लागेल. मराठवाडा आणि विदर्भात आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना सरकारकडून एक विशिष्ट आर्थिक रक्कम मिळते. 'वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन'अंतर्गत सर्व गरजू शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा योजना, आरोग्यसुविधा तसेच 'राजीव गांधी जीवनदायी योजने'चा लाभ दिला जातो. जलयुक्त शिवार, मनरेगा अंतर्गत कामांचा शेतकऱ्यांना लाभ मिळत असतो; परंतु अनेकदा कर्ज वसुलीसाठी सावकार तसेच बँकांचा ससेमिरा सुरू होतो आणि दडपणातून शेतकरी तणावामुळे आत्महत्येकडे वळतो. या वाढत्या आत्महत्यांची अचूक माहिती पुढे येऊ न देण्याबरोबरच व्यसनाधीनतेमुळे शेतकरी आयुष्य संपवत आहेत, कर्ज घेऊन लग्नादी सोहळ्यांवर उधळपट्टी केली जाते, असे बेछूट आरोप काही जण करतात. माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी 'शेतकरी कर्ज घेतात आणि परतफेडीसाठी दहा वर्षांची वाट पाहतात,' तसेच 'भिकारी शासन आहे, शेतकरी नव्हे,' अशी वादग्रस्त वक्तव्ये केली होती. वास्तविक बळीराजा कष्टाळू आणि प्रामाणिक आहे. तो परिस्थितीची शिकार बनतो. अनेकदा तो सावकारी शोषणाचा बळी ठरतो. बँकेचे व सरकारी अधिकारी त्याला खेटे मारायला लावतात.मुळात सातत्याने तोट्याच्या शेतीतून होणारी आर्थिक कुचंबणा हे आत्महत्यांचे प्रमुख कारण आहे. शेतीला सिंचन, विजेचा अनुभव, निकृष्ट दर्जाच्या महागड्या निविष्ठा, पेरणी हंगामात संस्थात्मक कर्जपुरवठ्याचा अभाव, बेहिशेबी कर्जाचे सावकारी पाश व त्याच्या वसुलीसाठीचा तगादा, नैसर्गिक आपत्तींमुळे होणारी पीकहानी, सक्षम विमा संरक्षण देण्यात सरकारला आलेले अपयश, घटती उत्पादकता, बाजारात मिळणारा कमी भाव ही शेती आतबट्ट्यात असण्याची कारणे आहेत. शेतमालाच्या आयात-निर्यातीबाबत शेतकऱ्यांना मारक ठरणाऱ्या धोरणांचा अवलंब सरकारने करता कामा नये. वेगवेगळ्या प्रकल्पांमध्ये जमीन जाते आणि त्याची समाधानकारक नुकसानभरपाई वेळेवर मिळत नाही. खरे तर, पिकांची लागवड करण्यापासून काढणीपर्यंत जागतिक स्तरावरील प्रगत शेती तंत्र शेतकऱ्यांना मिळायला हवे. नैसर्गिक आपत्तीमुळे तसेच वन्यप्राण्यांकडून शेतीचे नुकसान झाल्यास त्वरित नुकसानभरपाई मिळायला हवी. शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेसे कर्ज बँकांकडून मिळाले पाहिजे. उत्पन्नाचे स्रोत वाढवण्यासाठी जोडव्यवसाय आणि प्रक्रिया उद्योगाची साथ मिळाली पाहिजे. तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था केवळ शेतीवर आधारित असून चालणार नाही. शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या कमी करून, तरुणांना इतर उद्योग-व्यवसायांत गुंतवावे लागेल. शेतमालास रास्त दर मिळणे, हा शेतकऱ्यांचा मूलभूत अधिकार आहे. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी केवळ कर्जमाफी करून चालणार नाही, तर ठोस उपाय योजले पाहिजेत. त्यासाठी सरकारी पातळीवर सुरू असलेल्या प्रयत्नाला गती द्यावी लागेल. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत जबाबदारीची अधिक जाणीव निर्माण करावी लागेल. कृषी खात्यातील भ्रष्टाचाराचे निर्मूलन करावे लागेल. कुठल्याही परिस्थितीत शेतकरी एकटा नाही, जगाच्या पोशिंद्यामागे आम्ही उभे आहोत, असा दिलासा सरकारकडून दिला गेला पाहिजे. त्यादृष्टीने पाऊल उचलले जात आहे, ही स्तुत्य बाब. तसेच योजनांची अंमलबजावणीही चोख होणे आवश्यक आहे. नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, सयाजी शिंदे, आमिर खान यांच्यासारखे कलावंत शेतकऱ्यांसाठी धडपड करताना दिसतात. समाजातील अधिकाधिक स्वयंसेवी संस्थांनी आत्महत्या रोखण्याच्या कामात पुढे आले पाहिजे. ही सामूहिक जबाबदारी मानून काम झाले, तरच काही शेतकरी हिताचे घडू शकेल.

# व्यापार करार-काही प्रश्न

**- भारताचे पंतप्रधान, कृषिमंत्री, वाणिज्यमंत्र्यांनी कोणताही करार करताना भारतातील शेतीमालाला संरक्षण देण्याची हमी दिली आहे. असे असले तरी अमेरिकेसोबतचा व्यापार करार त्यांच्या देशात उत्पादित होणारा अतिरिक्त शेतीमाल भारतात विकण्यासाठी केला असल्याचेच स्पष्ट होते. यातून देशातील शेतीमालाचे संरक्षण कसे होणार?**



भारत आणि अमेरिकेने एक द्विपक्षीय करार संमत केला आहे. या कराराचा अंतरिम मसुदा प्रसिद्ध झाला आहे, अंतिम करारपत्र अद्याप येणे बाकी आहे. करार झाल्याचे भारताच्या वाणिज्य मंत्र्यांनी सांगितले, तसेच अमेरिकेच्या कृषी सचिवांनी सुद्धा जाहीर केले. प्रथमदर्शनी भारतातून अमेरिकेला निर्यात होणाऱ्या मालावर १८ टक्के आयात कर राहणार व अमेरिकेतून भारतात येणाऱ्या मालावर शून्य टक्का आयात कर राहणार, असे जाहीर करण्यात आले.

अमेरिकेतल्या शेतकऱ्यांच्या मालाला भारतासारखी मोठी बाजारपेठ मिळेल व अमेरिकेतील ग्रामीण भागात जास्त पैसे खेळणार, असे जाहीर विधान अमेरिकेच्या कृषी सचिवांनी केल्यामुळे भारतात अमेरिकी सोयाबीन, मका, फळे आयात होणार व भारतातील शेतकरी देशोधडीला लागणार असा सर्वसाधारण समज होणे स्वाभाविक आहे. काही शेतकरी संघटना कराराच्या विरोधात आंदोलनाचा पवित्रा घेत आहेत. कराराचा अंतिम मसुदा तयार होईपर्यंत शेतकऱ्यांनी आपली बाजू मांडणे आवश्यक आहेच.

भारताचे पंतप्रधान, कृषिमंत्री, वाणिज्यमंत्र्यांनी, भारतातील शेतीमालाला संरक्षण देण्याची हमी दिली आहे. असे असले तरी अमेरिकेने हा करार त्यांच्या देशात उत्पादित होणारा अतिरिक्त शेतीमाल भारतात विकण्यासाठी केला असल्याचेच स्पष्ट होत आहे. शून्य टक्का आयात कर लावण्यास भाग पाडणे व रशियाकडून क्रूड तेल खरेदी करण्यावर निर्बंध लादणे तसेच हा 'आदेश' न पाळल्यास पुन्हा ५० टक्के कर लावण्याची धमकी देणे, ही अमेरिकेची दादागिरीच म्हणावी लागेल. भारत हा करार दबावाखाली करत आहे हेही स्पष्ट दिसते आहे. असा करार देशाच्या हिताचा असणे संभव नाही.

### १८ टक्क्यांचे गणित

भारत - अमेरिकेतील व्यापारात आतापर्यंत अमेरिकेला घाटा होता. भारत अमेरिकेला सुमारे ८० ते ८५ अब्ज डॉलर किमतीचा माल निर्यात करत आहे व अमेरिकेकडून भारत प्रति वर्ष सरासरी ४५ ते ४७ अब्ज डॉलर किमतीचा माल आयात करीत आहे. म्हणजे अमेरिकेला होणारा हा व्यापारी तोटा कमी करायचा आहे. २०२५ पर्यंत भारतातून अमेरिकेत आयात होणाऱ्या मालावर तीन टक्क्यांच्या आसपास आयात शुल्क होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ते ५० टक्क्यांवर नेले व आता १८ टक्के केले आहे. शुल्क कमी केले म्हणून सत्ताधारी पक्ष आपली पाठ थोपटून घेत आहेत व तीन टक्क्यांचे १८ टक्के केले म्हणून विरोधी पक्ष आवाज उठवत आहेत. कृषी अर्थतज्ज्ञ म्हणतात, की आपले प्रतिस्पर्धी बांगला देश, व्हिएतनाम, पाकिस्तान या देशांपेक्षा भारतावर कर कमी आहे म्हणून आपण स्पर्धाक्षम राहू. पण या स्पर्धेत जिंकण्यासाठी भारताला, उत्पादनाचा दर्जा सुधारावा लागेल व उत्पादनखर्च कमी करावा लागेल.

### डीडीजीएस आयात धोकादायक

अंतरिम करारामध्ये इतर शेतीमालाबरोबर डीडीजीएस (डिस्टिलर्स ड्राइड ग्रेन्स सोल्यूबल) शून्य आयात शुल्कावर आयात होणार हे स्पष्ट आहे. डीडीजीएस म्हणजे मका, तांदूळ किंवा इतर धान्यांपासून इथेनॉल तयार केल्यानंतर जो चोथा शिल्लक राहतो तो. या चोथ्यामध्ये भरपूर प्रमाणात प्रथिने असतात व जनावरांना पौष्टिक खाद्य म्हणून वापरले जाते. सध्या भारतात मका व तांदळापासून इथेनॉल तयार केले जात आहे.

त्यातून निर्माण होणारे डीडीजीएस हे सोया पेंडीशी (सोया डी ओ सी) स्पर्धा करत आहे. अमेरिकेतून मोठ्या प्रमाणात डीडीजीएस आयात झाल्यास भारतातील मक्याचे व सोयाबीन दोन्ही पिकांचे दर पडणार आहेत. हे भारतातल्या शेतकऱ्यांना व खाद्यतेल उद्योगाला फार नुकसानकारक ठरेल. सध्या भारतात पुरेसे सोयाबीन उपलब्ध आहे पण आयात तेलामुळे तेलाला चांगला दर मिळत नाही व तेल काढण्याच्या प्रक्रियेत जी सोयाबीन पेंड तयार होते ती खपत नाही म्हणून क्रूड सोयाबीन तेल तयार करणाऱ्या ऑईल मिल पूर्ण क्षमतेने चालवल्या जात नाहीत.

प्रत्येक देशाचे टेरिफ बरोबरच 'नॉन टेरिफ बॅरियर्स'ही (आयात कर नसलेले अडथळे) असतात. परदेशातून आयात होणाऱ्या मालाचा दर्जा, त्याचे निकष, रोगराई, जंतू, तणांचे बियाणे, प्रमाणापेक्षा जास्त रासायनिक अंश शिल्लक आहेत का? जीएम (जनुकीय स्थानांतरित) आहे का? वगैरे तपासण्या करूनच माल स्वीकारला जातो. पाश्चात्य देशात हे निकष व तपासण्या फार कडक असतात. त्यामुळे युरोपमध्ये भारताचा शेतीमाल फार निर्यात होत नाही.

भारताने जीएम व शाकाहारी नसलेले दुग्धजन्य पदार्थ आयात करण्यातील हे आयातकर विनाचे अडथळे दूर करावेत, अशी अपेक्षा आहे. तसेही भारत जीएम खाद्य तेल, पेंड व काही वेळेला सोयाबीन सुद्धा आयात करतच आहे. मग जीएम विषयी भारताचे धोरण बदलून जीएम पिकांसाठी भारताची बाजारपेठ खुली करून द्यावी, अशी अमेरिकेची अपेक्षा आहे. असे झाल्यास भारतातील शेतकऱ्यांना सुद्धा जीएम बियाणे वापरण्यास परवानगी द्यावी लागेल. मग अधिक उत्पादन देणाऱ्या जीएम पिकांना वेगळी एमएसपी (किमान आधारभूत किंमत) द्यावी लागेल का, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

अमेरिकेतील दुधाळ जनावरांना दूध वाढीसाठी, हाडांचा चुरा व रक्तयुक्त पोषक खाद्य तयार करून दिले जाते. भारतामध्ये शाकाहारी जनतेला हे चालणार नाही. त्यामुळे हे अडथळे दूर होणे अवघड आहे. कोणत्या एका देशाच्या दबावाखाली व्यापार मुळीच करू नये. काही मालांची आयात टाळण्यासाठी सुद्धा या अडथळ्यांचा उपयोग केला जातो म्हणून ही सक्ती असावी.

(पूर्वार्ध)

● अनिल घनवट
९९२३७०७६४६

**संवाद**

## कालाय तस्मै नमः

'केरळ महाकुंभ' हा सनातन धर्मिक सोहळा नीला नदीच्या काठी अत्यंत उत्साहात पार पडला . 'हर हर महादेव' हा मंत्रघोष परिसरात दुमदुमला.भारतीय प्राचीन हिंदू संस्कृतीचे अनुपम आणि भव्य दर्शन घडले. हे आयोजन सन्यासी आनंद भारती यांच्या नेतृत्वाखाली झाले. पूर्वी वामपंथी विद्यार्थी संघटनेचे प्रमुख म्हणून ओळखले जाणारे ,कार्यरत असणारे कॉमरेड पी.सलील यांना हिंदू धर्माचे महत्त्व आणि आवश्यकता पटल्यामुळे त्यांनी आपल्या जीवनाची दिशा बदलली. त्यांनी सन्यास धर्म स्वीकारला. प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभमेळ्यात जुन्या आखाड्याचे महामंडलेश्वर यांनी त्यांचे 'आनंद भारती'असे नामकरण केले. गेल्यावर्षी प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी केरळ महाकुंभाचे भव्य आयोजन यशस्वीरित्या पार पाडले. समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या प्राचीन भारतीय संस्कृतीचे वैभवशाली दर्शन घडले. नृत्यकला, नाट्यकला, शिल्पकला यासबरोबर 'मामंगम ' या मार्शल आर्ट कवायतींचेही मनोज्ञ दर्शन घडले.दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा असूनही सनातन हिंदूधर्मीच्या परंपरा पुनर्जीवित करण्यासाठी लाखो हिंदू एकत्र आले. धर्म म्हणजे अफूची गोळी असे तत्त्वज्ञान सांगून हिंदूंना भ्रमित करण्याचे षड्यंत्र रचणाऱ्यांच्या उरात यामुळे धडकी भरली. २५९ वर्षापूर्वी बंद पडलेल्या धार्मिक उत्सवाचे पुनरुज्जीवन झाले.

**संध्या काटदरे**

## आता लोकसंख्येवरून पक्षपात

'हम दो, हमारे दो डझन' अशी घोषणा करत ए. आय. एम्. आय. एम्. चे उत्तरप्रदेशाचे अध्यक्ष शौकत अली यांनी एका सार्वजनिक सभेत मुसलमानांना २४ मुले जन्माला घालण्याचे आवाहन केले.लोकसंख्येच्या बाबतीत हिंदुस्थान पहिल्या क्रमांकाचे राष्ट्र बनले असताना अशा प्रकारचे आवाहन करणे म्हणजे देशाला रसातळाला नेण्यासारखे आहे. याचा परिणाम जीवनावश्यक पाणी, वीज, निवास यांच्या पुरवठ्यावर होईल.यातील महत्त्वाचे म्हणजे २४ मुले जन्माला घालण्याचे आवाहन पुरुषांना करण्यात आले आहे. जी स्त्री मुलांना जन्म देणार आहे तिचा आणि तिच्या आरोग्याचा विचार कोण करणार.भारतावर आक्रमण करणारे धर्मांध स्त्रीला केवळ भोगवस्तू समजत. शौकत अली सारखे त्यांचे वंशज आजही भारतात अशा प्रकारचे खुले आवाहन करून पुन्हा तेच सिद्ध करू पाहत आहेत का?

**- भूषण वाळणुसकर**

## 'व्हॅलेंटाईन डे' आणि कोटींची उलाढाल

प्रेम ही दैवी भावना असून माणसा-माणसांनी प्रेमबंधनात एकमेकांना गुंतवावे असा प्रचार तत्कालीन परिस्थितीला अनुसरून तिसऱ्या शतकातील इटलीच्या रोममधील संत 'व्हॅलेंटाईन' यांनी केला होता. तो प्रचार चुकीचा ठरवून त्यांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली. त्यांच्या बलिदानाचा १४ फेब्रुवारी (इसवी सन २७०) हा दिवस पाश्चिमात्य देशात 'व्हॅलेंटाईन डे' म्हणून पाळला जातो. परंतु दरवर्षी १४ फेब्रुवारी या दिवसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या आपल्याकडील अनेक प्रेमातुर प्रेमिकांना 'व्हॅलेंटाईन डे' म्हणजे एकमेकांप्रती उत्कट प्रेम भावना व्यक्त करण्याचा दिवस आहे असे वाटते आणि तरुणाईकडून तो इतर सणाप्रमाणे एक सण म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. 'व्हॅलेंटाईन डे'चे खूळ आता इतके वाढले आहे की रोज अनुक्रमे 'डे' साजरी करू लागली आहे. विशेष म्हणजे पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण केले जाते म्हणून येथील संस्कृतीरक्षक म्हणविणाऱ्यांकडून 'व्हॅलेंटाईन डे'ला विरोध केला जात असला तरी भारतात 'व्हॅलेंटाईन डे'ची बाजारपेठ यंदा सुमारे ३२ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. 'व्हॅलेंटाईन डे' साजरा करण्यावरून देशात मतभिन्नता असली तरी हजारो कोटींच्या प्रचंड उलाढालीमुळे सरकारी महसुलातही मोठी भर पडते.

**प्रदीप मोरे**

## विनाशकाले विपरीत बुद्धी

दोन दिवसांपूर्वी पाकिस्तान मधील एका शिया मशिदीत मोठा बॉम्बस्फोट झाला.तेथील परिस्थिती भीषण होती. मशिदीच्या परिसरात मृतदेहांचा खच पडला होता तेव्हा कंधार विमान अपहरण प्रकरणातील प्रमुख सूत्रधार आणि जैश ए मोहम्मद चा आतंकवादी अब्दुल रौफ असगर आणि एक अन्य आतंकवादी अब्दुल रहमान यांनी भारताला लक्ष करण्याच्या धमक्या दिल्या आहेत. तसेच पाकचे सैन्य प्रमुख असीम मुनीर यांनी काश्मीरमधील जनतेच्या मनातील स्वातंत्र्य त्यांना मिळवून देऊ अशी दर्पोक्ती केली. आतंकवाद्यांच्या धमक्या आणि सैन्य प्रमुखांनी गरळ ओकण्यामागे एकत्रित कट लक्षात येतो आणि काहीतरी मोठी सिद्धता तो निश्चित करत आहे. पाकची भ्याड आतंकवादी आक्रमणे आणि गुप्त कारवाया यांना भारत सणसणीत प्रत्युत्तर देत आहे. भिकेकंगाल झालेला, कर्जबाजारी आणि आतंकवाद्यांचे उत्पत्ती आणि लपायचे स्थान बनलेल्या पाक मृत्यूशय्येवरअसूनही भारताच्या कुरापती काढत आहे.अंतर्गत अस्थिरतेचे खापर भारतावर फोडून स्वतःची दुर्बलता प्रकट करत आहे.पाकच्या आगामी उघड आणि छुप्या सैन्य आणि आतंकवादी कारवायांचे अनुमान भारताला पुरेसे आले आहे आणि कोणत्याही क्षणी सिंदूर २.० करण्यासाठी सज्ज आहे.जेव्हा विनाशकाल जवळ येत असतो तेव्हा संबंधितांना आणखीन उत्पात मजवण्याची बुद्धी होते. पाकिस्तान देखील आता या स्थितीला पोहोचला आहे. भारतीय सैन्य आता पूर्ण शक्तीनिशी पाकचा भूगोल आणि इतिहास पालटण्यासाठी सज्ज झाला आहे पाकची एक चूक राष्ट्राला नामशेष करणारी ठरणार आहे.

**लीना गाडगीळ**

## अमेरिकेपुढे झुकण्याची गरज नाही

अमेरिकेकडून सातत्याने जगभरातील देशांची नाकेबंदी करण्याचे धोरण अवलंबले जात आहे.एकीकडे डोनाल्ड ट्रम्प सरकार भारतासह विविध देशांवर टॅरिफचा भुर्दंड अनेकपटीने वाढवत चालले आहे. तर दुसरीकडे त्या त्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर डोळा ठेवून आपले साम्राज्यवादी धोरण पुढे पुढे रेटत आहे. इराण आणि भारत यांच्यामध्ये चाबहार बंदर निर्मितीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरु होता. त्यावरही आता अमेरिकेची वाकडी नजर पडली आहे. या प्रकल्पासाठी भारताकडून पाच लाख डॉलर्सची गुंतवणूक करण्यात आली होती. अमेरिकेच्या हडेलहप्पीमुळे भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा प्रकल्प आता संकटात सापडला आहे.

चाबहारमुळे भविष्यात इंधन खरेदीसाठी एक सुरक्षित मार्ग उपलब्ध होणार आहे. नरेंद्र मोदी सरकारकडून या प्रकल्पाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून उल्लेख होत आला आहे. अमेरिकेकडून सुरु असलेल्या दबावामुळे हा प्रकल्प भारताला अर्धवट सोडून द्यावा लागत असल्याचा दावा विरोधी पक्षांकडून केला जात आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारकडून स्पष्टपणे काहीही खुलासा होताना दिसत नाही. चीन आणि पाकिस्तानला शह देण्यासाठी भारत आपली लष्करी व व्यापारी रणनीती पुढे नेत असताना अमेरिका त्यामध्ये अडथळे निर्माण करत असल्याचे हे चित्र अतिशय संतापजनक आहे. भारताने अमेरिकेपुढे झुकण्याची मुळीच आवश्यकता नाही.

**प्रा. मधुकर चुटे**

# रोहित पवारांचा संशय?



महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एका धक्कादायक अपघाताची चर्चा ताजी असतानाच, त्यावरून सुरू झालेले राजकारण आता खालच्या थराला पोहोचले आहे की काय, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रमुख आणि राज्याचे नेते अजित पवार यांच्या निधनानंतर, जिथे राजकारण विरहित शोकाचे वातावरण अपेक्षित होते, तिथे आता संशयाचे धुमारे फुटू लागले आहेत. विशेषतः राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या अपघाताभोवती मांडलेले संशयाचे जाळे अनेकांच्या भुवया उंचावणारे आहे.

अजित पवार आणि शरद पवार यांच्यातील राजकीय मतभेद सर्वांना माहित होते. मात्र, अजित दादांच्या अपघातानंतर ममता बॅनर्जी आणि अखिलेश यादव यांनी शंका उपस्थित केल्यावर खुद्द शरद पवारांनी 'यावर राजकारण करू नका' असा समजूतदारपणाचा सल्ला दिला होता. असे असतानाही, त्यांच्याच पक्षाचे आमदार रोहित पवार सातत्याने पत्रकार परिषदा घेऊन या अपघातावर प्रश्नचिन्ह उभे करत आहेत. प्रफुल्ल पटेल यांचे नाव न घेता 'फाईल'चा उल्लेख करणे आणि मंत्रालयातील विलंबावरून तर्क-वितर्क लढवणे, हे केवळ योगायोग नसून एक सुनियोजित राजकीय खेळी वाटत आहे.

रोहित पवारांनी आता हा विषय दिल्लीपर्यंत नेला आहे. एकीकडे अजित दादांच्या पत्नी आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन नवीन जबाबदारी स्वीकारत दुःखातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहेत, तर दुसरीकडे रोहित पवार संशयाचे व्हिडिओ प्रसिद्ध करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारंवार स्पष्ट केले आहे की, तपास यंत्रणांना त्यांचे काम करू द्यावे. तरीही रोहित पवार यांची आक्रमकता थांबताना दिसत नाही.

या संपूर्ण प्रकरणामागे एक खोल राजकीय गुंता असू शकतो. रोहित पवारांनी काही दिवसांपूर्वीच 'दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार' असल्याचे सूतोवाच केले होते. पण जर दोन्ही गट एकत्र आले, तर राष्ट्रवादीवर पुन्हा एकदा अजित पवार यांच्या कुटुंबाचाच (पार्थ पवार किंवा सुनेत्रा पवार) वरचष्मा राहील हे स्पष्ट आहे. अशा परिस्थितीत रोहित पवार यांना पक्षात कितपत राजकीय किंमत मिळेल? कदाचित हीच ती 'अगतिकता' आहे, ज्यामुळे ते स्वतःला अजित दादांचे सर्वात मोठे हितचिंतक म्हणून सादर करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. दादांच्या कुटुंबापेक्षाही आपणच त्यांच्याबद्दल जास्त संवेदनशील आहोत, हे दाखवून भावी काळात राष्ट्रवादीच्या मतदारांची सहानुभूती मिळवण्याचा हा एक 'पॉलिटिकल स्टंट' वाटत आहे.

राजकारण हे शेवटी संधीचे शास्त्र असते, पण हे करताना किमान नैतिकतेच्या मर्यादा ओलांडल्या जाऊ नयेत. रोहित पवार यांची सध्याची धडपड ही दादांच्या मृत्यूचे गूढ उकलण्यासाठी आहे की स्वतःची राजकीय स्पेस निर्माण करण्यासाठी, हे येणारा काळच ठरवेल. पण सध्या तरी त्यांचे हे वागणे 'अगतिकतेतून आलेले राजकारण' म्हणूनच ओळखले जात आहे.

**अविनाश देशपांडे**

# शिवजयंतीनिमित्त यवतमाळात छत्रपती महोत्सवाचे आयोजन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवजयंतीच्या पर्वावर भव्य छत्रपती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ज्ञानेश्वर गायकवाड यांनी विश्राम गृह येथे पत्रकार परिषदेत दिली. दि. १८ ते २० व २३-२४ फेब्रुवारी दरम्यान शिवतीर्थ येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात विविध कार्यक्रम रंगणार आहेत. १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता पालकमंत्री ना. संजयभाऊ राठोड यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार असून अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड राहतील. उद्घाटनानंतर ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक अशोक वानखडे (दिल्ली) यांचे "छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती व आजचे वास्तव" या विषयावर व्याख्यान होईल.

१९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता शिवमॅरेथॉन स्पर्धा तर सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन कार्यक्रम होणार आहे. पाच दिवसांच्या महोत्सवात मोटारसायकल रॅली, शोभायात्रा, विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा, निबंध, रांगोळी, चित्रकला, गायन, समूह नृत्य, कराटे तसेच रक्तदान शिबिर व नागरी समस्यांवरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्यांना ग्रंथ, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहेत. विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येईल.२३ फेब्रुवारीला संत गाडगेबाबा जयंती तर २४ फेब्रुवारीला राजाराम महाराज जयंती कार्यक्रमाने महोत्सवाची सांगता होईल. गेल्या ३५ वर्षांपासून सर्व धर्मीयांच्या सहभागातून हा महोत्सव उत्साहात साजरा केला जात आहे. विविध क्षेत्रांत उतुंग कामगिरी करणा-या मान्यवरांचा युवा पुरस्कार, पत्रकारिता पुरस्कार, कृषिरत्न पुरस्कार, आरोग्य सेवा पुरस्कार, महिला पुरस्कार, सामाजिक पुरस्कार देवून सन्मान केला जाणार आहे. २३ फेब्रुवारी रोजी संत गाडगेबाबा जयंती तर २४ फेब्रुवारी रोजी राजाराम महाराज जयंती कार्यक्रम संपन्न होईल. या भव्यदिव्य महोत्सवाचे स्वागताध्यक्ष विदर्भ ओ.बी.सी. सेवा संघाचे अध्यक्ष प्रदिप वादाफळे हे असून बक्षिस वितरण सोहळा २० तारखेला शिवतीर्थ येथे माजी मंत्री माणिकराव ठाकरे, राजाभाऊ ठाकरे, अशोकराव घारफळकर, प्रविण देशमुख, कृष्णा कडू, शितल वातीले, नानाभाऊ गाडबैले, बिपीन चौधरी, क्रांती धोटे, ज्ञानेश्वर चौधरी, पुष्पाताई नागपूरे, अरुणभाऊ गेडाम, डॉ. चेलन दरणे, ॲड. राजेश साबळे, माधुरी वाळके, नरेंद्र गुधाने, डॉ. छायाताई महाले, ॲड. सीमा तेलंगे, संजय चिद्दरवार, नरहरी उजैनकर, अमोल बोदडे, डॉ. गिरीष माने, भाई अमन, डॉ. प्रशांत कासारे, इंजिनियर भानुदास कानारकर, शैलेष गुल्हाने, शशांक कैकेंडे, विजय खडसे, डॉ. अनिल उर्फ बबलू देशमुख यांचे हस्ते संपन्न होणार आहे. गत ३५ वर्षापासून यवतमाळ येथे सर्व धर्म व सर्व जातींना एकत्रित घेवून सार्वजनिक शिवजयंती महोत्सवाचे आयोजन सुरु आहे. या आयोजना करिता ज्ञानेश्वर गायकवाड, चंद्रशेखर कुडूपले, नंदकुमार बुटे, निरज डफळे, सुनिल कडू, शशिकांत खडसे, प्रविण भोयर, अंकुश वानखेडे, विवेक गावंडे, नितीन मिझापूरे, अजय गावंडे, प्रद्युम्न जवळेकर, किशोर चव्हाण, संतिष काळे, निशा बुटले, आशाताई काळे, वैशाली सवाई, कीर्ती राऊत, अर्चना देशमुख, पुंडलीक बुटले, पंढरी पाठे, जयश्री देशमुख, प्रशांत कराळे, योगिराज अरसोड, डॉ. प्रदिप राऊत, उदय सरतापे, प्रा. धनश्याम दरणे, पंकज इंगळे, गौरव धवस, जितेंद्र सातपुते, राजू जॉन, उल्हास रणनवरे, सचिन येवले, संजय कोल्हे, सचिन मनवर, नितीन काळे ई. सहकार्य करीत आहेत.

# अंतरजिल्हा ड्रग्स तस्कर जेरबंद !

## ९.८२ लाखांचा एमडी ड्रग्स सह मुद्देमाल जप्त
## शिरपूर पोलिसांची जिल्ह्यातील सर्वात मोठी कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**




वणी - शिरपूर जिल्ह्यात वाढत्या अंमली पदार्थांच्या साखळीवर मोठा घाव घालत शिरपूर पोलिसांनी अंतरजिल्हा ड्रग्स तस्कराला जेरबंद केले आहे. तब्बल ५७.१ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) या घातक सिंथेटिक ड्रग्ससह ९ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ही कारवाई जिल्हा पातळीवरील आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई मानली जात आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना ड्रग्स विरोधात कठोर कारवाईचे आदेश दिल्यानंतर शिरपूर पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली होती.

त्याच पार्श्वभूमीवर ११ फेब्रुवारी २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पुनवट येथील व सध्या नागपूर येथे वास्तव्यास असलेला श्रेयश उर्फ गुड्डू शशिकांत पाटील (वय २४) हा वणी-शिरपूर परिसरात एमडीची विक्री करीत असल्याचे समोर आले. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी चारगाव–वणी मार्गावर सापळा रचला. सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास MH ३२ AH ४१२६ क्रमांकाची सिल्वर रंगाची DATSUN GO+ कार थांबवून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. झडतीदरम्यान त्याच्याकडून ५.६० लाख रुपये किंमतीचा ५७.१ ग्रॅम एमडी, ड्रग्स मोजण्यासाठी वापरले जाणारे ३ डिजिटल वजनकाटे (१५ हजार रुपये), ७० हजार रुपयांचा मोबाईल तसेच ४ लाख रुपये किंमतीची कार असा एकूण ९.८२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी (PCR) सुनावण्यात आली आहे. या काळात ड्रग्स तस्करीच्या साखळीचा मूळापर्यंत शोध घेण्याचा निर्धार ठाणेदार संतोष मनवर यांनी व्यक्त केला आहे. एमडीसारखे सिंथेटिक ड्रग्स तरुण पिढीला वेगाने जाळ्यात ओढत असून, अंतरजिल्हा पातळीवरून यवतमाळ जिल्ह्यात पुरवठा होत असल्याची धक्कादायक बाब या कारवाईतून समोर आली आहे.

जिल्हा पोलीस प्रशासनाने ड्रग्स माफियांविरोधात शून्य सहनशीलतेची भूमिका घेतली असून, ही कारवाई त्याच धोरणाचा भाग आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी वणी सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार संतोष मनवर व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## • वेचक

### खासगी रुग्णालयांची लूटमार थांबवा ; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा



पुसद - तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्र राज्यात काही खासगी दवाखाने व रुग्णालयांकडून सर्वसामान्य जनतेची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूटमार सुरू असल्याचा गंभीर आरोप भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांनी केला आहे. रुग्णांच्या नावाखाली अवाजवी रूम भाडे आकारणे, अनावश्यक तपासण्या लावणे, जादा बिलिंग करणे तसेच शासकीय आरोग्य योजनांचा गैरवापर करणे असे प्रकार सर्रास सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः शासकीय योजनेंतर्गत रुग्ण भरती झाल्यानंतर, रुग्ण २–३ दिवसांत बरा झाला असतांनाही त्याला मुद्दाम ७–८ दिवस रुग्णालयात ठेवून शासनाकडून जादा बिल उकळले जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. हा प्रकार म्हणजे शासन आणि जनतेची सरळ फसवणूक असून गरीब, शेतकरी, कामगार व मध्यमवर्गीय कुटुंबांवर मोठा आर्थिक भार टाकणारा आहे. या गंभीर प्रकरणाकडे लक्ष वेधण्यासाठी भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांच्या वतीने शिष्टमंडळाने मा. वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय पुसद तसेच मा. तालुका आरोग्य अधिकारी, पुसद यांना निवेदन सादर केले. लवकरात लवकर ठोस कारवाई झाली नाही तर भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांच्या वतीने जनतेच्या हक्कासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी अशोक भालेराव, राजकुमार भगत, विशाल डाके, प्रशिक कांबळे, अनिल कांबळे, आकाश चवरे, इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### श्री देव मतिमंद निवासी विद्यालयाचे जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेत यश



पुसद - जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या वतीने दिनांक 2 ते 4 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग मुला–मुलींच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये श्री देव निवासी मतिमंद विद्यालय पुसद या शाळेतील मतिमंद विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली. सांस्कृतिक स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या "हंगर (भूक)" या सामाजिक विषयावर आधारित नृत्य सादरीकरणाने विषयाची सखोल मांडणी, भावपूर्ण अभिव्यक्ती व कलात्मक सादरीकरणाच्या जोरावर सर्व परीक्षकांचे लक्ष वेधून घेत प्रथम क्रमांक पटकावला. प्रणव राजेश उगले – स्पॉट जंप – प्रथम क्रमांक नैतिक मारोती कळंबे – सॉफ्ट बॉल थ्रो – द्वितीय क्रमांक, पीयुष उद्धल राठोड – 100 मीटर धावणे – तृतीय क्रमांक, शिवराज संतोष दांडेगावकर – गोळाफेक – तृतीय क्रमांक, श्रेयस सिद्धार्थ कांबळे – स्पॉट जंप – तृतीय क्रमांक विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळा प्रशासन, शिक्षकवृंद व प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण मेहनत व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कारणीभूत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

# झरी जामणीत 'संपूर्णता अभियाना'ला प्रारंभ

## आमदार संजय देरकर यांच्या हस्ते उद्घाटन



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - निती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत झरी जामणीत "संपूर्णता अभियान 2.0" चे उद्घाटन आमदार संजय देरकर यांच्या हस्ते पंचायत समितीच्या मुख्य सभागृहात नुकताच पार पडले. या कार्यक्रमास तालुक्यातील 54 ग्रामपंचायतींचे सरपंच, लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत विकास अधिकारी तसेच विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

28 जानेवारी ते 14 एप्रिल या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत महिला व बालविकास, पशुसंवर्धन, आणि शिक्षण विभागांनी एकत्रितपणे काम करून दर्शकांची 100 टक्के संपृक्तता साध्य करण्याचे आवाहन आमदार संजय देरकर यावेळी केले. या दर्शकांमध्ये महिला व बालविकास विभागांतर्गत 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील पूरक आहार घेणारी मुले, अंगणवाडी केंद्रातील नोंदणीकृत मुलांची मोजमाप कार्यक्षमता, कार्यरत शौचालय असलेली अंगणवाडी केंद्रे तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा असलेली अंगणवाडी केंद्रे हे दर्शक निश्चित करण्यात आले आहेत. शिक्षण विभागांतर्गत पुरेशा मुलींच्या शौचालय सुविधांसह शाळा हा दर्शक असून, पशुसंवर्धन विभागांतर्गत लसीकरण झालेल्या गोवंशीय जनावरांची टक्केवारी हा दर्शक आहे. यावेळी आमदार संजय देरकर यांनी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करून निर्धारित कालावधीत सर्व दर्शकांमध्ये शंभर टक्के उद्दिष्टपूर्ती करण्याचे आवाहन केले. आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा उद्देश मागासलेल्या तालुक्यांचा सर्वांगीण व जलद विकास साधणे हा असून आरोग्य, पोषण, शिक्षण, शेती, सामाजिक विकास आणि मूलभूत सुविधांमध्ये ठोस सुधारणा घडवून आणणे हे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा व तालुका प्रशासनाने एकत्रितपणे काम करून विकासाची गती वाढवावी, असे आवाहनही करून त्यांनी उपस्थितांना "संपूर्णता अभियान 2.0" ची शपथ दिली. यावेळी झरी जामणीचे तहसिलदार अक्षय रासने, गटविकास अधिकारी र. वि. सांगळे, बालविकास प्रकल्प अधिकारी सुनिता भगत, गट शिक्षणाधिकारी निलेश खेरनार, तालुका पशुसंवर्धन अधिकारी जगताप, आकांक्षित तालुका कार्यक्रम फेलो अनिल नरवाडे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पोलीस भरती उमेदवारांसाठी युवासेनेचा मदतीचा हात

## यवतमाळात नि:शुल्क निवास व भोजनाचा शेकडो उमेदवारांना आधार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : जिल्हा पोलीस दलातर्फे स्थानिक दक्षता मैदान येथे ११ फेब्रुवारीपासून पोलीस भरतीची मैदानी चाचणी सुरू झाली आहे. या भरतीसाठी राज्यभरातून दररोज शेकडो तरूण दाखल होत आहे. या उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी युवासेना, यवतमाळच्या वतीने नि:शुल्क निवास व भोजनाचा स्तुत्य उपक्रम राबविला जात आहे. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली, मातोश्री प्रमिलादेवी दुलीचंद राठोड यांच्या स्मृतीप्रित्यर्थ युवासेनेने हा उपक्रम सुरू केला आहे.

यवतमाळ येथील पोलीस दलातील १६१ जागांसाठी तब्बल १५ हजारांवर उमेदवारांनी अर्ज केले आहेत. ही भरती प्रक्रिया २५ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. दूरवरून येणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या गरीब उमेदवारांना राहण्या-जेवणाची सोय व्हावी, या हेतूने स्थानिक उत्सव मंगल कार्यालयात हा सेवाभावी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ १० फेब्रुवारी रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे, तहसीलदार योगेश देशमुख, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, जिल्हा समन्वयक संजय हातगावकर, नगरसेवक गजानन इंगोले, पत्रकार नितीन पखाले, महिला आघाडी जिल्हा प्रमुख दर्शना इंगोले, स्मीता दुर्गे, प्रीती उपरे, युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांनी, पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या तरुणांसाठी युवासेनेने हाती घेतलेला हा उपक्रम संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे, अशा शब्दांत या उपक्रमाचे कौतुक केले. या उपक्रमात दररोज दुपारपासूनच विद्यार्थ्यांचे आगमन होते. सायंकाळी भोजन, निवास या सोबतच विद्यार्थ्यांना पोलीस भरतीसंदर्भात मार्गदर्शनही केले जात आहे. उपक्रमाच्या पहिल्याच दिवशी २००, दुसऱ्या दिवशी २५० पेक्षा जास्त उमेदवारांनी या सुविधेचा लाभ घेतला.

दररोज सायंकाळी ६ वाजल्यापासून शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडीचे पदाधिकारी स्वतः उपस्थित राहून उमेदवारांच्या व्यवस्थेची जबाबदारी सांभाळत आहेत. या उपक्रमात अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवार, शिवसेना संपर्क प्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, निलेश बेलोकार, संजय भुमकाळे, सरला इंगळे, ज्योती चिखलकर, श्रीकांत आडे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सक्रिय सहभाग नोंदवत आहेत. कार्यक्रमाचे संचालन प्रा. पंढरी पाठे यांनी केले, तर आभार प्रदर्शन युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांनी मानले. हा उपक्रम यवतमाळात पोलीस भरतीत सहभागी होत असलेल्या उमेदवारांसाठी मोठा आधारवड ठरत असून, सर्व स्तरांतून युवासेनेच्या या कार्याचे स्वागत होत आहे.

# सफाई कामगार हे नगरपालिकांचा कणा : अध्यक्ष शेरसिंग डागोर

## सफाई कामगारांच्या प्रश्नांबाबत घेतला आढावा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : जिल्ह्यातील नगरपालिकांमध्ये कार्यरत सफाई कामगार हे नगरपालिकांचा कणा आहे. त्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी गुरुवारी मुख्याधिकाऱ्यांना दिले.

जिल्ह्यातील सफाई कामगारांचे प्रश्न व त्यांच्या भेटीकरीता ते काल यवतमाळ जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आढावा बैठक घेतली. या बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी आणि सफाई कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीच्या सुरुवातीला अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेत मागील बैठकीच्या इतिवृत्ताचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी सफाई कामगारांची ग्रॅच्युईटी व सातव्या वेतन आयोगाची रक्कम देण्यात यावी, व्यपगत झालेले पद पुनर्जिवीत करण्याचा प्रस्ताव शासनास पाठवावा, सफाई कामगारांचे सेवा पुस्तक ३० दिवसात अद्ययावत करावे, सफाई कामगारांसाठी नाविण्यपूर्ण उपक्रम राबवावे, आस्थापनाविषक कामे गांभिर्याने पूर्ण करावे, सफाई कामगारांसाठी शिबीर आयोजित करुन आयुष्मान कार्ड तात्काळ काढावे, चांगले काम करणाऱ्या प्रोत्साहन देण्यासाठी 'सफाई मित्र' पुरस्कार द्यावे, असे निर्देश त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीनंतर अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी सफाई कामगारांसमवेत विविध विषयांवर चर्चा केली.

# बांधकाम कामगारांना अत्यावश्यक साहित्याचे वाटप तालुकास्तरावर होणार !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत जीवित (सक्रिय) बांधकाम कामगारांना गृहपयोगी व सुरक्षा संच आणि अत्यावश्यक साहित्याचे वाटप तालुकास्तरावर करावे. जेणेकरून इतर तालुक्यातील कामगारांची गैरसोय होणार नाही व गर्दी टळेल. तसेच जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्थाअबाधित राहील याची दक्षता घेण्यात यावी, असा आदेश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिला आहे. सरकारी कामगारअधिकारी कार्यालयाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, नोंदणीकृत बांधकाम कामगारांना पुसद व दारव्हा येथे गृहपयोगी व सुरक्षा संच तसेच अत्यावश्यक साहित्याचे वाटप सुरू होते. मात्र, या वाटपावेळी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याची दखल घेऊन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी हे वाटप तत्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत जिवीत (सक्रीय) बांधकाम कामगारांना गृहपयोगी संच, सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप कंत्राटदारामार्फत मंगळवारी दि.10 फेब्रुवारी रोजी शेलु बुद्रुक, ता. पुसद व शंकर जिनिंग ॲण्ड प्रेसिंग, जुना दिग्रसरोड, दारव्हा येथे सुरु करण्यात आले होते. यवतमाळ जिल्ह्यात एकूण 16 तालुके असून वणी व झरी जामणी हे तालुके या वाटपाच्या ठिकाणापासून सुमारे 210 किलोमीटर अंतरावर आहे. त्या तालुक्यातील कामगारांना वाटपाच्या ठिकाणी येऊन गृहपयोगी संच, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच घेऊन जाणे सुरक्षेच्या दृष्टीने सोईचे होत नाही. १० फेब्रुवारीपासून वाटपाच्या ठिकाणी सुमारे 3 हजारच्या आसपास किट वाटप करण्याबाबत ऑनलाईन अपॉईमेंट देण्यात आल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर गर्दी किंवा गोंधळ झाला असता,कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. तसेच बुधवारी दि. 11 फेब्रुवारी रोजीसुध्दा कामगारांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माणझाला. त्यामुळे हे वाटप तात्काळ बंद करण्यात यावे, असे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी मंडळाला दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. तसेच यापुढील काळात होणारे वाटप तालुकास्तरावर करुन एका दिवशी जास्तीत जास्त 500 बांधकाम कामगारांना वाटप करण्यात यावे. त्याठिकाणी सोयीसुविधा असाव्यात. या वाटपापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाची पूर्व परवानगी घेण्यात यावी, अशा सक्त सूचना देखील जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

**आर. यु. सुरडकर तहसीलदार, उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड**

क्रमांक/म.सहा./प्रस्तु-२/कावि/६९२/२०२६
तहसीलदार उमरखेड यांचे कार्यालय,
उमरखेड दिनांक :- ०२/०१/२०२६

**जाहीरनामा**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद फरीद सय्यद छोटू रा. चिल्ली ज. यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा जन्म दि. ०४/०९/१९७५ रोजी मौजा चिल्ली ज. येथे झाला आहे. तरी त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश होऊन मिळणेबाबत या कार्यालयास अर्ज सादर केला आहे.

उपरोक्त प्रकरणी सय्यद फरीद सय्यद छोटु यांचा जन्म दि. ०४/०९/१९७५ रोजी मौजा चिल्ली ज. येथे झाला असल्यामुळे जन्म नोंद करण्याचा आदेश देणेप्रकरणी कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक १९/०१/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

शिक्का

(आर.यु.सुरडकर)
तहसीलदार, आर्णी

# केशरबाई चाहल स्मृती सामाजिक पुरस्कार वगुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण सोहळा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - येथील केशरबाई चाहल स्मृती प्रतिष्ठान, पांढरकवडा (जि. यवतमाळ) यांच्या वतीने मातोश्री केशरबाई चाहल यांच्या ३८ व्या स्मृतीदिनानिमित्त भव्य सन्मान गौरव व गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण सोहळा १० फेब्रुवारी रोजी श्री शारदा ज्ञानपीठच्या प्रांगणात सायंकाळी ६ वाजता उत्साहात पार पडला.

समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते व माजी मंत्री शिवाजीराव मोघे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार, संपादक व प्रभावी वक्ते तसेच पांढरकवड्याचे सुपुत्र बाळ कुळकर्णी उपस्थित होते. विस्तार अधिकारी (शिक्षण), पंचायत समिती पांढरकवडा गोकुल गंधे हेही अतिथी म्हणून उपस्थित होते. सन २०२४–२५ चा 'केशरबाई चाहल स्मृती सामाजिक पुरस्कार' पांढरकवडा येथील हिंदू–मुस्लिम एकता व सामाजिक सौहार्दाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे काजी गजनफर अली साहेब (माजी मुख्याध्यापक तथा जामा मशीद ट्रस्ट व शांतता समिती अध्यक्ष) यांना प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रुपये रोख, शाल व स्मृतिचिन्ह असे होते. समाजात सलोखा, परस्पर आदर आणि शांततेचा संदेश देणाऱ्या त्यांच्या कार्याचा गौरव यावेळी करण्यात आला. तसेच सन २०२३–२४ चा 'केशरबाई स्त्री पुरस्कार' संवेदनशील कवयित्री, समीक्षक व चिंतनशील लेखिका श्रीमती पुष्पा पाटील (मीना बिसेटवार), पुणे यांना प्रदान करण्यात आला.

साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना ५ हजार रुपये रोख, शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक सत्र २०२४–२५ मधील शालांत परीक्षेत उत्कृष्ट यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनाही पारितोषिके देण्यात आली. शेखर सुरेश मल्लेलवार (९५.६०%) शाळेत प्रथम ठरला असून त्याला २१०० रुपये रोख पारितोषिक देण्यात आले. मराठी विषयात प्रथम (९८ गुण) कु. कल्याणी विष्णू कराळे – १००० रुपये, इंग्रजी विषयात प्रथम (९८ गुण) कु. टिया हरिभाऊ गुरनुले – ५०० रुपये, गणित विषयात प्रथम (९७ गुण) कु. हंसिका मनीष बुर्रेवार व कु. साची दीपक वरगणे – प्रत्येकी ५०० रुपये, तसेच विज्ञान विषयात प्रथम (९८ गुण) कु. श्रुती राजीव आगरकर व शेखर सुरेश मल्लेलवार – प्रत्येकी ५०० रुपये रोख देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास प्रतिष्ठानने व्यक्त केला.

# पुसद बसस्थानकावर अट्टल पॉकीटमार चोरट्यास अटक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - बसस्थानकावर चोरीच्या घटना घडत असल्याने पोलीस स्टेशन पुसद शहरचे ठाणेदार सेवांनद वानखडे यांनी चोरीच्या घटनाचे गांभीर्य लक्षात घेउन पॉकीटमार आरोपीचा शोध घेवुन त्यांचेवर कारवाई करने करीता डी.बी.स्टॉप. पुसद शहर यांना योग्य त्या सुचना देउन आदेशीत केले. आज दि.11/02/2026 रोजी दिग्रस येथील अट्टल पॉकीटमार चोरटा पुसद बसस्थानकावर चोरी करन्याचे उद्देशाने येनार असल्याची गोपनिय माहीती डी. बी. पथकाला मिळाली त्यावरुण पुसद बसस्थानकावर डी.बी. पथक सापळा लावुन बसले असता दिग्रस येथील अट्टल चोरटा नामे सोहन उर्फ मयुर मुकेश थोरात वय 24 वर्ष रा. दिग्रस जि.यवतमाळ हा पुसद बसस्थानकावर गर्दीत बसमध्ये चढताना प्रवाशाचे खिशाची चाचपनी करीत असताना डी. बी. पथकाने त्यास रंगेहाथ पकडुन त्यावर कलम 124 महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 प्रमाणे गुन्हा नोंद केला. असुन पुढील तपास डी.बी. पो.हवा.मनोज कदम करीत आहे. तरी पोलीस स्टेशन पुसद शहरचे ठाणेदार सेवानंद वानखडे यांनी जनतेला अवाहन केले प्रवासा दरम्यान गर्दीत आपण आपले किंमती वस्तु, दागदागीने, यावर गांभिर्याने लक्ष देवुन स्वत काळजी घ्यावी. सदरची कारवाई-पोलीस अधिक्षक, कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक, अशोक थोरात, पुसद एस.डी.पी.ओ. हर्षवर्धन बि.जे.यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सेवानंद वानखडे यांचे सुचने प्रमाणे स.पो.नि.प्रेमकुमार केदार, पो.हवा.पो.हवा. मनोज कदम, पो, काँ, शुध्दोधन भगत, पो.काँ. रविद्रं खंदारे, पो.काँ. आकाश बाभुळकर यांनी केली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ‘व्हॅलेंटाईन डे’ निमित्त गैरप्रकार रोखण्यासाठी भारतीय संस्कृतीविषयक उपक्रम राबवावेत

## हिंदू जनजागृती समितीची मागणी

**अमरावती/का.प्र.**

१४ फेब्रुवारी ‘व्हॅलेंटाईन डे’च्या पार्श्वभूमीवर शाळा-महाविद्यालयांमध्ये होणारे संभाव्य गैरप्रकार, विद्यार्थिनींची छेडछाड, शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घटना तसेच तरुणांमध्ये वाढणाऱ्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी भारतीय संस्कृतीविषयक उपक्रम राबवावेत, अशी मागणीचे निवेदन हिंदू जनजागृती समितीतर्फे जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन व शिक्षण विभागाला दिले आहे.

विद्यार्थी हे राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत; परंतु दुर्दैवाने ‘व्हॅलेंटाईन डे’सारख्या पाश्चात्त्य प्रथेमुळे काही विद्यार्थी अभ्यासापासून दूर जाऊन चंगळवादाच्या आहारी जात असल्याचे दिसते.या दिवशी शाळा-महाविद्यालयांच्या बाहेर होणारी गर्दी, मुलींची छेडछाड, एकतर्फी प्रेमातून होणारे हल्ले, तसेच शैक्षणिक संकुलाचे पावित्र्य भंग करणारी कृत्ये घडण्याची शक्यता असते. अनेकदा विद्यार्थी तणावाखाली येऊन नैराश्यात जातात किंवा आत्महत्यांसारखी टोकाची पावले उचलतात.

‘व्हॅलेंटाईन डे’च्या नावाखाली आयोजित खाजगी पार्ट्यांमध्ये मद्य व अंमली पदार्थांचा वापर करून तरुण पिढीला व्यसनाधीन करण्याचे प्रकार घडत आहे. या दिवशी संतती प्रतिबंधक साधनांच्या विक्रीत वाढ होते हे या दिवशी होणाऱ्या अनैतिक संबंधातील वृद्धी दर्शवते. काही समाजकंटक आणि धर्मांध युवक खोटी ओळख सांगून हिंदू युवतींना प्रेमाच्या जाळ्यात ओढतात, ज्यांचे रूपांतर पुढे लव जिहाद मध्ये होऊन पुढे त्या युवतीचे आयुष्य उध्वस्त होते. १४ फेब्रुवारीला महाविद्यालयात ओळखपत्राशिवाय कोणालाही प्रवेश देऊ नये व सुरक्षा रक्षक तैनात ठेवावेत, महाविद्यालय परिसर, कॅन्टीन व पार्किंग येथे विद्यार्थ्यांचे गैरवर्तन टाळण्यासाठी ‘शिस्तपालन समिती’ अथवा प्राध्यापकांचे पथक गस्तीवर ठेवावे, ‘महिला तक्रार निवारण कक्ष’ या दिवशी विशेष सक्रिय ठेवावा, जेणेकरून विद्यार्थिनींना सुरक्षित वाटेल,विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीचे महत्त्व सांगणारे



व्याख्यान आयोजित करावे किंवा ‘मातृ-पितृ पूजन दिन’ साजरा करावा.महाविद्यालय परिसरात किंवा बाहेर कोणतेही अशोभनीय कृत्य घडल्यास संस्थेची बदनामी होऊ शकते. त्यामुळे ‘सीसीटीव्ही’ यंत्रणेद्वारे विशेष लक्ष ठेवावे. विद्यार्थ्यांचे चारित्र्य व शैक्षणिक वातावरण अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक पाऊल उचलावे, असे आवाहन समितीने केले आहे,वरील निवेदन जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त अमरावती शहर, पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण व शिक्षणाधिकारी यांना देण्यात आले आहे.यावेळी रंजना पांडे,संगीता राठी, पंकज बारबुदे,सुनिता कुकुटकर,वेदांती दातीर,निराली होले,वैदेही चरपे,मेघशाम मावळे,कांचन शर्मा,चेतन वैद्य, गिरीश जामोदे, इशिका बाळापुरे, सौ अर्चना मावळे, पिंकी घटोरिया, सचिन वैद्य आधी हिंदुत्वनिष्ठ निवेदन देताना उपस्थित होते.

# डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन येथे एफडीटीपीचे उद्‌घाटन

**अमरावती / का.प्र.**

कृत्रिम बुद्धिमत्ता, व्हर्चुअल रिॲलिटी आणि जनरेटिव्ह एआय यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडत असून, या बदलांना सामोरे जाण्यासाठी शिक्षकांना भविष्यकालीन कौशल्यांनी सज्ज करण्याच्या उद्देशाने श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन येथे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई प्रायोजित फॅकल्टि डेवलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम चे आयोजन करण्यात आले आहे.

‘Future-Ready Educators: AI/VR, Generative AI and AI-driven Tools' या विषयावर आधारित या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव मेटकर सर यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न



झाले.उद्‌घाटनप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मेटकर यांनी शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा योग्य आणि परिणामकारक वापर केल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल, असे प्रतिपादन केले. आजच्या डिजिटल युगात शिक्षकांनी केवळ ज्ञान देणारे न राहता मार्गदर्शक व प्रेरकाची भूमिका बजावणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.प्रस्तावना सादर करताना डॉ. जी. आर. गोसावी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, व्हर्चुअल रिॲलिटी व जनरेटिव्ह एआय आधारित साधनांमुळे अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक प्रभावी, अनुभवाधारित आणि विद्यार्थी-केंद्रित होत असल्याचे स्पष्ट केले.प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे शिक्षकांचे कौशल्यविकसन होऊन शिक्षणाची गुणवत्ता निश्चितच उंचावेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.एफडीटीपीचे समन्वयक आर. एच. राठोड यांनी मार्गदर्शन व सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, तज्ज्ञांचे आणि सहभागी प्राध्यापकांचे आभार मानले. कार्यक्रमास सह-समन्वयकदातीर वपाटील उपस्थित होते.उद्‌घाटन समारंभास आर. एम. घरात, खोने, पी. व्ही. ठाकरे, डॉ. जे. व्ही. चव्हाण, मोलके तसेच महाविद्यालयातील अनेक अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एफडीटीपीमध्ये राज्यातील तंत्रनिकेतन मधील २२ अधिव्याख्याते सहभागी झाले असून, त्यांना एआय, व्हीआर, जनरेटिव्ह एआय व एआय-आधारित शैक्षणिक साधनांच्या प्रत्यक्ष वापराचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# डॉ. राजेंद्र गोड़े इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे कौशल्य विकास कार्यशाळा

**अमरावती / का.प्र.**

डॉ. राजेंद्र गोड़े इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, अमरावती येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास कक्ष व प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी चार दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली.

ही कार्यशाळा संस्थेचे माननीय अध्यक्ष योगेंद्र गोड़े साहेब यांच्या प्रेरणेतून तसेच माननीय सचिव तन्वी गोड़े यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. बुराकले यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.कार्यशाळेचे उद्‌घाटन प्रा.डॉ. पी. व्ही. बुराकले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच डॉ. रोहित गुप्ता (उद्‌घाटक) यांच्या हस्ते संपन्न झाले. उद्‌घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात आणि करिअर घडणीत सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी प्रा.



राधिका देशमुख यांनी ‘प्रेरणा’ व ’ध्येय निर्धारण’ या विषयांवर प्रभावी व्याख्याने दिली. दुसऱ्या दिवशी प्रा. क्षितिज शहा यांनी वाचिक व अवाचिक संवाद तसेच चारित्र्य, नीती व नैतिक मूल्ये या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी प्रा. आशीष कोकाटे यांनी रेझ्युमे लेखन व मुलाखत कौशल्य या विषयांवर उपयुक्त माहिती दिली. कार्यशाळेच्या अंतिम दिवशी डॉ. नमिता अवस्थी यांनी सादरीकरण कौशल्य, वेळ व्यवस्थापन व गटचर्चा या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतील अनुभव व्यक्त करत हा उपक्रम व्यक्तिमत्त्व विकास व रोजगाराभिमुख तयारीसाठी अत्यंत उपयुक्त ठरल्याचे नमूद केले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. प्रशांत अजमिरे तर विद्यार्थी विकास समन्वयक प्रा. प्रणाली चांदूरकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

# प्रधानमंत्री आवास योजनेबाबत तक्रारींसाठी महापौरांचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजने संदर्भात नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी किंवा तक्रारी असल्यास त्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी व्हावी यासाठी अमरावती महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील असून लाभार्थ्यांना सुलभ सेवा देण्यावर भर देण्यात येत आहे.तथापि, अर्ज प्रक्रियेतील अडथळे, मंजुरीतील विलंब, बांधकामासंबंधी समस्या किंवा इतर कोणत्याही तक्रारी असल्यास नागरिकांनी विलंब न लावता थेट महापौरांशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.‘पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेचा लाभ वेळेत व योग्य पद्धतीने मिळावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कोणत्याही प्रकारची गैरसोय सहन केली जाणार नाही,’ असे ठाम मत व्यक्त करत महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी नागरिकांना पुढे येऊन तक्रारी नोंदविण्याचे आवाहन केले आहे. महानगरपालिका नागरिकांच्या तक्रारींचे तत्पर निवारण करून योजनेचा लाभ खऱ्या अर्थाने गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी सज्ज असल्याचेही त्यांनी सांगितले.

# विविध शासकिय योजनांची माहिती केंन्द्रीय संचार ब्युरोचा अभिनव उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार केंन्द्रीय संचार ब्युरो अमरावती चे वतीने व तहसिल कार्यालय धारणी व पंचायत समिती धारणी यांचे सोबतच धारणी तालुक्यातील सर्व शासकिय विभाग यांच्या संयुक्त विदयमाने नविन प्रशासकिय इमारत तहसिल कार्यालय धारणी येथे शासनाच्या विविध दुर्गम भागातील नागरिकाकरीता आदिवासी कल्याण योजना व त्याबाबत जनजागृती व माहिती यांची मल्टीमिडीया चित्र प्रदर्शनी आयोजीत करण्यात आलेली असून या प्रदर्शनीचे उदघाटन धारणीचे तहसिलदार प्रदीप शेवाळे यांचे हस्ते करण्यात आले या प्रसंगी अमोल अंबुलकर, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी,रमेश वाढीवे, पुरवठा अधिकारी, शितल महाजन, नगर पंचायत धारणी कार्यालयीन अधिक्षीका,संजय इंगळे एबीपी फेलो- निती आयोग अधिकारी हे उपस्थित होते.



कार्यक्रमाचे उदघाटक व धारणीचे तहसिलदार यांनी मल्टीमिडीया चित्र प्रदर्शनीचे अवलोकन केले.

प्रसंगी त्यांनी धारणी तालुकावासीयांना या चित्रप्रदर्शनी माध्यमातून मिळत असलेल्या माहितीचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुकावासीयांना केलेले असून कार्यक्रमाचे कौतुक सुध्दा केले. सोबतच या कार्यक्रमाप्रसंगी आयोजकाव्दारे विविध स्पर्धांचे आयोजन या प्रसंगी करण्यात आले व विजेत्या स्पर्धकांना बक्षीस सुध्दा प्रसंगी वितरण करण्यात आले.सदर चित्रप्रदर्शनी १२ व १३ फेब्रुवारी अशी दोन दिवस सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरु राहणार असून सर्व तालुकावासीयाकरीता नविन प्रशासकिय इमारत तहसिल कार्यालय धारणी येथे सुरु राहणार असून या प्रदर्शनीचा सर्व तालुकावासीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार केंन्द्रीय संचार ब्युरो अमरावती चे क्षेत्रिय प्रचार अधिकारी शशीकांत पटेल यांचेकडून करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमाकरीता तहसिल कार्यालय धारणी, पंचायत समिती धारणी, नगर पंचायत धारणी, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय धारणी, एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय धारणी, पोलिस विभाग धारणी यांचे या कार्यक्रमाकरीता सहकार्य लाभलेले आहे.

## मैनाबाई यावलकर यांचे निधन



हिवरखेड-येथील मोरोती देवस्थानचे कोषाध्यक्ष तथा प्रतिष्ठित नागरिक श्री महादेवराव बैरामजी यावलकर यांच्या पत्नी सौ मैनाबाई महादेवराव यावलकर यांचे वयाच्या (८५) व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाल. त्यांचेवर निर्मिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यांचे मागे पती, तीन मुले, तीन सुना, दोन मुली दोन जावई, नातू व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# शासकीय विभागांनी मालमत्ता कर तातडीने भरावा-आयुक्त

## मालमत्ता कर वसुली संदर्भात बैठक

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्यालयातील कॉन्फरन्स हॉल येथे मालमत्ता कर वसुली संदर्भात सविस्तर आढावा बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस शहरातील विविध शासकीय विभागांचे विभागप्रमुख, प्रतिनिधी तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.




महानगरपालिकेच्या महसुलाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या वसुलीची सद्यस्थिती, प्रलंबित कराची रक्कम तसेच शासकीय विभागांकडील थकबाकीचा सखोल आढावा यावेळी घेण्यात आला. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी स्पष्ट शब्दांत नमूद केले की, शहरातील स्वच्छता व्यवस्था, रस्ते दुरुस्ती, प्रकाशयोजना, आरोग्य सेवा तसेच इतर नागरी सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असते आणि या निधीचा मुख्य स्त्रोत म्हणजे मालमत्ता कर होय.बैठकीदरम्यान आयुक्तांनी शासकीय विभागांनी त्यांच्या ताब्यातील इमारती व मालमत्तांवरील प्रलंबित मालमत्ता कर तात्काळ अदा करावा, तसेच पुढील काळात नियमितपणे कर भरण्याची प्रक्रिया राबवावी, असे निर्देश दिले. शासकीय विभागांनी आदर्श निर्माण करून कर भरण्यात पुढाकार घेतल्यास खासगी संस्था व नागरिकांनाही सकारात्मक संदेश जाईल, असे त्यांनी अधोरेखित केले.

आयुक्तांनी विभागांकडून येणाऱ्या अडचणींची सविस्तर



माहिती घेत संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

तसेच विभागांदरम्यान समन्वय वाढवून कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या सूचना दिल्या. महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता कर वसुली मोहिम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

प्रलंबित थकबाकी वसूल करून आर्थिक शिस्त प्रस्थापित करण्यावर भर देण्यात आला. आयुक्तांनी सर्व विभागांना ठराविक कालमर्यादेत कर भरण्याचे नियोजन सादर करण्याचे निर्देश दिले.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महानगरपालिकेला शासकीय विभागांचे सक्रिय सहकार्य अत्यावश्यक असून, सकारात्मक प्रतिसादातून महसूल वाढीस चालना मिळेल, असा विश्वास आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी व्यक्त केला.या बैठकीत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी, वसुली लिपिक, विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# संक्षिप्त

## आज गुरुमाऊली श्री अण्णासाहेब मोरे यांचे अमृततूल्य हितगुज

**अमरावती-** राजापेठ परिसरातील जयराम नगर स्थित श्री स्वामी समर्थ बाल संस्कार केंद्राच्या वतीने परमपूज्य गुरूमाऊली श्री अण्णासाहेब मोरे यांच्या महासत्संग सोहळ्याचे आयोजन शुक्रवार १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता गाडगे नगरातील समाधी मंदिरासमोरील प्रांगणात करण्यात आले आहे. यात परमपूज्य गुरुमाऊलींचे अमृततूल्य हितगुज आयोजिण्यात आले आहे.यावेळी विश्वशांती हेतू श्री स्वामी चरित्र सारामृताचे सामूहिक पठण देखील होणार आहे. अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक येथील श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे पिठाधीश (दिंडोरी प्रणित) परमपूज्य गुरुमाऊली श्री अण्णासाहेब मोरे यांचे १३ फेब्रुवारी रोजी अमरावती नगरात आगमन होत आहे. त्यांच्या उपस्थितीत हा महासत्संग सोहळा होत आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी परमपूज्य माऊलींचे हितगुज व मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केलेले आहे. राजापेठ येथील श्री स्वामी समर्थ बाल संस्कार केंद्र गेल्या २५ वर्षांपासून अशाप्रकारचे कार्यक्रम नित्यनियमाने आयोजित करीत आहे.



## बुध्दीबळ (पुरुष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती-** हैद्राबाद सिंद नॅशनल कॉलेजीएट युनिर्व्हसिटी, मुंबई येथे २ ते ०६ मार्च, २०२६ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बुध्दीबळ (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.चमूंमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावतीचा खुश दोशी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीचा सुह्मद आचार्यकोडुमगुल्ला, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा वि=ोश सयाम, एस.एस.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवचा प्रतिक तायडे व भावनेश थेलकर, पी.आर. पोटे (पाटील) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीचा आदित्य सदाफळे, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा रोशन कपूर, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीचा वेदांत बक्षी आणि जे.डी. इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळचा वेदांत रागेनवार याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथे १८ ते २७ फेब्रुवारी दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## ‘मेगा कृषी क्रेडिट आऊटरीच’ कार्यक्रम

**अमरावती-** सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने मोर्शी येथे विशेष ‘मेगा कृषी क्रेडिट आऊटरीच’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा शेतकरी मेळावा येत्या शुक्रवारी, १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिरभाते मंगलम, अमरावती रोड, मोर्शी येथे पार पडणार असून, यामध्ये बँकेच्या विविध नवीन शेती योजनांचे सादरीकरण आणि पात्र शेतकऱ्यांना प्रिन्सिपल सॅन्शन चेकचे वितरण करण्यात येणार आहे.कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार, गट विकास अधिकारी प्रिती खाटिंग, सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मुंबई कार्यालयाचे उपमहाव्यवस्थापक जयशंकर प्रसाद उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात बँक अधिकाऱ्यांमार्फत शेती कर्ज, शासनाच्या नवीन योजना आणि विविध सबसिडींबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यक्रमात सहभागी शेतकऱ्यांना बँकेच्या योजनांची माहिती देण्यासोबतच व्याजदरातील सवलतींबाबतही सादरीकरण केले जाईल. शासन आणि बँकेच्या या संयुक्त उपक्रमामुळे मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना आपला कृषी व्यवसाय विस्तारण्यासाठी संधी उपलब्ध होणार आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी केले आहे.

## चंदन उटी उत्सव व चैत्र मास मांड कार्यक्रम

**चांदूर रेल्वे -** अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यात असलेल्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे माघ मास अमावस्या निमित्त चंदन उटी उत्सव तसेच चैत्र मास अखंड जागृती भजन मांड कार्यक्रमाचा शुभारंभ आयोजित करण्यात आला आहे.श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान यांच्या वतीने १७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता संस्थान परिसरात भक्तिभावपूर्ण वातावरणात चंदन उटी उत्सव संपन्न होणार आहे. या प्रसंगी चंदनउटी नंतर बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन संस्थानच्या अन्नदान समितीमार्फत करण्यात आले आहे.याच दिवशी पहाटे ५.०० वाजता संस्थानतर्फे चैत्र मास निमित्त आयोजित अखंड जागृती भजन मांड कार्यक्रमाचा शुभारंभ लहान मंदिरात ढाल बसवून होणार असून,मुख्य मंदिरात कृष्णाजी महाराजांचे गण सुमरनाने विश्वस्त मंडळ व भाविक भक्तांच्या उपस्थितीत भजनाचा गजर सुरू होईल.गुढीपाडवा यात्रा महोत्सवात बाहेर गावातील अवधूत भजन मंडळांचे वाहनांना १८ मार्च २०२६ रोजी सायंकाळ पर्यंत संस्थानचे अधिकृत पत्रा आधारे प्रवेश दिला जाईल,या करिता अवधूत भजन मंडळांनी यात्रेपूर्वी संस्थानचे पत्र प्राप्त करून घ्यावेत आणि कायदा सुव्यवस्थेकरिता संस्थान आणि शासनाला सहकार्य करावे.भाविकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची नियमित बससेवा उपलब्ध आहे. चांदूर रेल्वे बसस्थानकातून: सकाळी ९.००, १०.००, दुपारी ३.०० व सायंकाळी ७.१५,अमरावती बसस्थानकातून: सकाळी ७.३० व सायंकाळी ५.४५ भाविकांनी अवैध वाहनांचा वापर टाळून अधिकृत बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मूळ उद्दिष्ट्य सफल झाले काय?

आजच्या एका दैनिकामध्ये एक बातमी वाचली. हिंदू जनजागृती समितीने पोलीस आयुक्तांची भेट घेऊन येत्या १४ तारखेला पोलिसांची गस्त वाढविण्यात यावी अशी मागणी केली आहे. १४ तारखेला व्हॅलेन्टाईन डे असून त्यादिवशी महाविद्यालये, उद्याने याठिकाणी तरुणींची छेडखानी होण्याची शक्यता असल्याने व अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असल्याने पोलिसांची गस्त वाढवून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याची आवश्यकता असल्यामुळे दामिनी पथक व अन्य पथकांना देखील सतर्क करावे अशी हिंदू जनजागृती समितीची मागणी आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ निर्माण होऊन शंभर वर्षे झाली आहेत. आणीबाणीमध्ये तुरुंगवासाच्या काळात माझी अनेक संघ स्वयंसेवकांशी चर्चा होत असे. संघाचे त्यावेळचे मुख्य प्रवक्ते व दैनिक तरुण भारतचे संपादक स्व. मा. गो. वैद्य यांच्यासोबत विशेष चर्चा व्हायची. संघ स्थापनेचा मूळ उद्देश जाणून घेण्याची उत्सुकता होती. त्यामुळे तुरुंगवासाच्या आधी व नंतरही अनेक संघ कार्यकर्त्यांसोबत विचार-विनिमय करत असे. त्या सर्वांच्या बोलण्यातून व त्यापैकी काहींचे लेख वाचून मला असे समजले की, राष्ट्र निर्माणासाठी चारित्र्यवान व्यक्ती तयार करणे हे संघाचे मूळ उद्दिष्ट्य आहे. म्हणूनच संघ स्वयंसेवकांनी दररोज शाखेत जाणे संघाच्या दृष्टीने महत्वाचे ठरते.

परंतु शंभर वर्षांच्या अथक प्रयत्नानंतरही जर हिंदू जनजागृती समितीला पोलिसांकडे गाऱ्हाणे मांडण्याची वेळ आली असेल तर चारित्र्यनिर्मितीच्या प्रयत्नामध्ये संघ कमी पडला असे मानायला हरकत नसावी. संघाचे चारित्र्यवान कार्यकर्ते पोलिसांची मदत न घेता संभाव्य गैरप्रकार १४ तारखेला रोखू शकत नाहीत असे दिसते. समाजाच्या सर्व स्तरांमध्ये संघ पोहोचला आहे असे सांगण्यात येते. संघ हिंदूंचे संघटन करतो. देशात व अमरावतीत हिंदू बहुसंख्य आहेत. परंतु वारंवार त्यांना गाईंच्या व स्त्रियांच्या रक्षणासाठी पोलिसांची मदत घ्यावी लागते.

संघाचे जे स्वयंसेवक राजकारणात आले, त्यांच्या चारित्र्याची काही सन्मान्य अपवाद वगळता समाजावर विशेष छाप पडलेली नाही. राजकारणात न जाता समाजकार्य करणाऱ्या स्वयंसेवकांची देखील यादी फार मोठी नसणार. जे स्वयंसेवक कौटुंबिक जीवन जगत आले, ते सर्वच धुतल्या तांदुळासारखे चारित्र्यवान आयुष्य जगले असतील असेही सांगता येत नाही.

काँग्रेसची स्थापना १८८५ साली झाली. त्यांचे उद्दिष्ट्य राज्यकारभारात भारतीयांचा अधिकाधिक सहभाग वाढविणे आणि ब्रिटीशांच्या राजवटीपासून भारताला स्वतंत्र करणे, असे होते. ते उद्दिष्ट्य १९४७ साली पूर्ण झाले. तेव्हा म. गांधींनी काँग्रेस विसर्जित करावी असा सल्ला दिला होता. परंतु तो सल्ला काँग्रेसने मानला नाही. असे असले तरी स्थापनेच्या वेळी असलेले उद्दिष्ट्य काँग्रेसने ६२ वर्षात पूर्ण केले. त्या कामात एक संघटना म्हणून संघाचे सहकार्य काहीच नव्हते.

संघाचा जो विस्तार झाला तो चारित्र्यनिर्मितीच्या कार्यामुळे नव्हे तर मुस्लीम समुदायाची भीती हिंदूंच्या मनात सतत वाढवत नेण्यामुळे झाला. संघ विचारांचे सरकार मागील ११ वर्षांपासून निरंकुश सत्तेवर असूनही 'हिंदू संकटात आहेत' अशी आरोळी संघ स्वयंसेवक देत असतात, तेव्हा संघ विचारांचे सरकार दुर्बल आहे की काय अशी शंका येते. बरे, सरकार सक्षम आणि सशक्त आहे म्हटले तर हिंदू संकटात कसे राहतील ? आणि चारित्र्यवान लक्षावधी स्वयंसेवक हिंदूंचे संरक्षण आरोळी न ठोकता करू शकत नाहीत काय? राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शताब्दीनिमित्त या मुद्द्यांवर देखील आत्मचिंतन करावे, ही नम्र विनंती.

**किशोर देशपांडे**

# 'व्हॅलेंटाईन डे' भारतात हवा कशाला ?

व्हॅलेंटाईन डेची तयारी तरुणवर्गामध्ये एक आठवडा आधीपासूनच सुरु आहे. गेल्या काही वर्षांत व्हॅलेंटाईन डेचे स्तोम भारतात भलतेच माजले आहे. चॉकलेट, भेटवस्तू यांची निर्मिती करणाऱ्या कंपन्या आपली उत्पादने खपवण्यासाठी या दिवसांत नाना शक्कल लढवताना दिसतात. टीव्ही मालिकांमध्ये सुद्धा व्हॅलेंटाईन डेचाच फिवर असतो. वृत्त वाहिन्यांचे प्रतिनिधीही यानिमित्ताने तरुणांशी याच विषयावर हितगुज साधताना दिसतात. चित्रपट आणि मालिकांत काम करणारे अभिनेते आणि अभिनेत्री यंदाचा व्हॅलेंटाईन कसा साजरा करणार याबाबतचे सविस्तर वर्णन आपल्या सामाजिक माध्यमाच्या अकाऊंटवरून प्रसारित करतात. व्हॅलेंटाईन दिनाच्या निमित्ताने मुलींच्या भावनांचा गैरफायदा घेणारे महाभागही गल्लोगल्ली टपलेले असतात. क्षणिक सुखाला भुलून चुकीचे निर्णय घेतात आणि स्वतःचे आयुष्य उध्वस्त करतात. यामध्ये आईवडिलांची बदनामी होते ती वेगळीच.एका सर्वेक्षणानुसार सुमारे ३० टक्क्यांहून अधिक मुले मुलींशी लैंगिक संबंध ठेवण्यासाठी हा दिवस साजरा करतात. गर्भनिरोधक साधने बनवणाऱ्या आस्थापनाच्या मतानुसार इतर दिवसांच्या तुलनेत या दिवशी गर्भनिरोधकांची विक्री अधिक होते. किशोरवयीन मुले-मुली आपल्या प्रिय व्यक्तीला महागड्या भेटवस्तू देण्यासाठी पैसे कुटून आणतात हे कुणी विचारात घेते का ? गुन्हेगारी कृत्य करण्यास प्रवृत्त करणाऱ्या, अनैतिक कृत्यास प्रोत्साहन देणाऱ्या आणि तरुणांना क्षणाचे सुख देऊन दीर्घकाळाचा भ्रमनिरास देणाऱ्या व्हॅलेंटाईन डेची भारतात गरज तरी आहे का ?

**● जगन घाणेकर**

# मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील सरकारी योजनांची जनजागृती



मेळघाट मधील धारणी व चिखलदरा या आदिवासी बहुल भागामध्ये विद्यार्थ्यांसोबत आयोजित केलेली फील्ड विजिट ही एक समृद्ध आणि अनुभव आधारित शिक्षणाची संधी ठरली. निसर्गरम्य डोंगर रांगा, दाट अरण्य आणि आदिवासी संस्कृतीने नटलेला हा प्रदेश विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचा जिवंत नमुना ठरला. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी स्थानिक कोरकू व इतर आदिवासी समाजाची जीवनशैली, पारंपारिक शेती पद्धती, लोककला, वेशभूषा आणि सण उत्सवाची प्रत्यक्ष माहिती घेतली. तसेच वनसंपदा जैवविविधता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजून घेतले. काही ठिकाणी आरोग्य पोषण व शिक्षणाशी संबंधित आव्हानही विद्यार्थ्यांना जाणून घेता आली. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन विविध योजना राबवत आहे मात्र अनेकदा भाषेच्या अडथळ्यामुळे या योजनांची अचूक माहिती स्थानिक आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचत नाही मेळघाटातील कोरकू आदिवासी समाजाच्या बाबतीत ही समस्या प्रकर्षाने जाणवत होती ही दरी कमी करण्यासाठी शासनाच्या विविध योजना कोरकू भाषेत रूपांतरित करून स्थानिकांपर्यंत पोहोचण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

शिक्षण, आरोग्य,पोषण, निवारा, रोजगार, वन हक्क कायदा, महिला व बालकल्याण अशा अनेक योजनांची माहिती सोप्या आणि समजण्यास सुलभ कोरकू भाषेत अनुवादित करण्यात आली. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागांमध्ये एम. ए. भाग एक येथे शिकत असलेली मेळघाट मधील कोरकू विद्यार्थिनी कुमारी अश्विनी भिलावेकर हिच्या माध्यमातून विविध योजना कोरकूमध्ये रूपांतरित करून ही माहिती गावागावापर्यंत रेकॉर्डिंग च्या माध्यमातून समजावून सांगण्यात आली. त्यामुळे योजनांचे उद्दिष्ट, पात्रता, अर्ज प्रक्रिया आणि लाभ याविषयी कोरकू समाजामध्ये स्पष्टता निर्माण झाली. या उपक्रमामुळे आदिवासी बांधवांचा शासनावरील विश्वास अधिक दृढ झाला.योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचा सहभाग वाढला आणि जागृती निर्माण झाली. भाषेच्या माध्यमातून संवाद अधिक प्रभावी ठरतो याचा हा उत्तम नमुना आहे. भाषेची अडचण आणि माहितीचा अभाव यामुळे अनेक लाभार्थी योजनांपासून वंचित राहतात ही बाब लक्षात घेऊन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. के.बी. नायक यांनी या योजनेची माहिती कोरकू भाषेत अनुवादित करण्याकरिता विभागातील कोरकू विद्यार्थिनीला अश्विनी भिलावे कर हिला तसेच मेळघाटातील कोरकू कीर्तनकार मंडळी जिल्हा परिषद शिक्षक विजय भाजपाले तसेच एक कोरकू आदिवासी प्रोफेसर मिस्टर आनंद कासदेकर यांना प्रोत्साहित व अनुवादित केले. तसेच या कार्यामध्ये विभागातील संशोधक मंडळी व शिक्षकांनी सुद्धा सहकार्य केले या जनजागृती करिता एका २६ सीटर दोन साऊंड सिस्टम च्या माध्यमातून विविध कोरकू आदिवासी गावांमध्ये योजनेविषयी माहिती देण्यात आली.

या उपक्रमामुळे कोरकू समाजामध्ये योजनांविषयी जागरूकता वाढली असून अनेकांनी अर्ज कुठे मिळतो, तो कसा भरावा लागतो याविषयी विचारणा करण्याकरिता आमच्याशी जुळले. स्थानिक भाषेत संवाद झाल्यामुळे नागरिकांचा विश्वास वाढला व शासन यंत्रणा व समाज यांच्यातील दरी कमी झाली. कोरकू भाषेतून माहिती देण्याचा या प्रयत्नांमुळे केवळ योजनांची अंमलबजावणी सुलभ झाली नाही तर, आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेलाही चालना मिळाली. स्थानिक भाषेचा सन्मान राखत विकास साधण्याचा हा उपक्रम निश्चितच अनुकरणी आहे. एकूण कोरकू भाषेत योजनांचे रूपांतर करून प्रत्यक्ष गाव पातळीवर जाऊन माहिती देण्याचा हा उपक्रम आदिवासी विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला आहे. भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्यात यावेत अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ही शैक्षणिक व्हिजिट विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ज्ञाना सोबतच सामाजिक जाणीव, संवेदनशीलता आणि ग्रामीण आदिवासी जीवनाबद्दल आदर निर्माण करणारी ठरली. अशा उपक्रमामुळे पुस्तकी ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळून शिक्षण अधिक प्रभावी व अर्थपूर्ण बनले अशा प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव,संशोधनाची दृष्टी आणि ग्रामीण आदिवासी विकासाबाबत संवेदनशीलता निर्माण होण्यास मदत होते. हा अभ्यास दौरा प्राध्यापक संशोधक विद्यार्थी व विभागातील एम ए भाग एक व एम ए भाग दोन च्या विद्यार्थ्यां करिता एक अविस्मरणीय बाब ठरली.

**डॉ.रोहिणी देशमुख**
समाजशास्त्र विभाग
संत गाडगेबाबा
अमरावती विद्यापीठ,

# चिखलदरा स्काय वॉकला मध्यभागी आधार देणार

भारतातील सर्वात लांबीच्या 'स्काय वॉक'



**अमरावती** - भारतातील सर्वात लांबीचा काचेचा पूल (स्काय वॉक) हा विदर्भातील चिखलदरा या थंड हवेच्या ठिकाणी उभारला जात आहे. या पुलाचे काम पूर्णत्वास आले आहे. या काचेच्या पुलावरून चालताना पर्यटकांना थरारक अनुभव येणार आहे. चिखलदरा येथील हरिकेन ते गोराघाट पॉइंटला जोडणाऱ्या स्कायवॉक प्रकल्पाला २०१८ मध्ये राज्य सरकारने परवानगी दिली होती. सुमारे ४०७ मीटर लांबीचा हा काचेचा पूल आहे. पण, आता या पुलाला आधार द्यावा लागणार आहे.

'स्काय वॉक'चा ८० ते १०० मीटरचा मध्यभाग हा मजबूत आणि पारदर्शक काचेचा असेल. पण, या स्कायवॉकची लांबी जास्त असल्याने मध्यभागी आधार द्यावा लागणार आहे. यासाठी वनविभागाची परवानगी घेण्यात आल्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सांगिले. जिल्हाधिकारी कार्यालयात पर्यटन आणि पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी ही माहिती देण्यात आली.

**प्रतिबंधात्मक उपाययोजनांची गरज**

या 'स्काय वॉक'ला कायमस्वरूपी आधार द्यावा लागणार असल्यामुळे या भागातून माकड किंवा इतर प्राणी चढून जाऊ नये, म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. यासोबतच चिखलदरा येथे २७ किलोमीटरचा गोलमार्ग तयार करण्यात येणार आहे. वन क्षेत्रातून जाणाऱ्या मार्गासाठी वनविभागाची परवानगी घ्यावी. तसेच ग्लो गार्डनसाठी शक्यता तपासून पहाव्यात. चिखलदरा येथे पर्यटन वाढीसाठी नवीन प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. याठिकाणी ट्रेकींगचे पर्याय दिल्यास पावसाळ्यानंतर मार्चपर्यंत पर्यटक येतील.

यासाठी वन विभागाने ट्रेकचे मार्ग निश्चित करावेत. पर्यटनामुळे चिखलदरामध्ये क्रांती घडू शकते. त्यामुळे येथे पर्यटकांना सुविधा द्याव्यात. पीएम मित्रा पार्कमधील महापारेषणने उपकेंद्राचे काम सुरू करावे. यासाठी आवश्यक असणारे सहकार्य करण्यात येईल. यासोबतच मेळघाटातील २२ गावांच्या विजेच्या प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाची परवानगी मिळातच इतर कामे करावीत.

आमझरी मधाचे गाव म्हणून विकसित करण्यात येत आहे. येथे शबरी महामंडळाने रिसॉर्टसाठी एकत्रितरित्या कार्य केल्यास जादा पर्यटकांची सुविधा निर्माण होण्यास मदत होईल, अशी सूचनाही आशीष येरेकर यांनी केली.स्काय वॉकची उंची २८० मीटर (अंदाचे ५९४ फूट) आहे. या स्काय वॉकचे फ्लोअर १२ मिलीमीटर जाडीच्या त्रिस्तरीय काचेचे असणार आहे.एकाचवेळी ५०० पर्यटकांचा भार सांभाळण्याची तसेच प्रतितास १९० किलोमीटर गतीचा वारा झेलण्याची क्षमता या काचेची राहणार आहे. हरिकेन आणि गोराघाट यादरम्यान सर्वसाधारण वाऱ्याचा वेग ताशी १६० किलोमीटर असतो. या प्रकल्पावर सुमारे ४० कोटी रुपये खर्च होत आहेत.



# श्रीक्षेत्र सालबर्डी

**'महादेवा जातो गा भोले रे नाथा' म्हणत खांद्यावर त्रिशूल घेऊन डफलीच्या तालावर नाचत गाजत महाशिवरात्री निमित्त श्रीक्षेत्र सालबर्डी येथे लहान महादेवाचे दर्शन घेण्यासाठी लाखो भोले भक्तांची गर्दी उसळणार आहे.मोर्शीपासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर असलेल्या सातपुडा पर्वताच्या कुशीत वसलेल्या श्रीक्षेत्र सालबर्डी येथे महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर ८ दिवसासाठी मोठी यात्रा भरत असते. महाशिवरात्रीनिमित्त भरणाऱ्या यात्रेत मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती राहणार आहे.**

सातपुडा पर्वतरांगेतील एका खोलगट भागात सुमारे ६०० ते ७०० वर्षापासून मध्यप्रदेशाच्या हद्दीत असलेल्या प्राचीन शिवगुफेत शिवलिंग असून या शिवलिंगावर बाराही महिने नैसर्गिकरित्या पाण्याचा जलाभिषेक सुरू असतो.सदर ठिकाणी अनेक किलोमीटर अंतरावर पाण्याचे कोणतीही नैसर्गिक साधन नसतांना शिवलिंगावर पाण्याचा होणारा जलाभिषेक हा विज्ञान युगातील चमत्कार आहे.या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सालवृक्षाचे झाडे असल्याने सालबर्डी हे नाव पडले. सालबर्डी हे गाव महाराष्ट्र व मध्यप्रदेश सीमेत वसलेले आहे.

मध्यप्रदेशाच्या हद्दीत बैतुल जिल्ह्यातील आठनेर तालुक्यात सालबर्डी ही स्वतंत्र ग्रामपंचायत आहे.तर अर्धेगाव महाराष्ट्रात असल्याने पाळा ग्रामपंचायतीचे गट ग्रामपंचायत सालबर्डी आहे.या ठिकाणी मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्र प्रशासनाच्या वतीने संयुक्तरित्या ८ दिवस भरणाऱ्या या यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. दोन्ही राज्याच्या प्रशासनाच्या वतीने यात्रा परिसरात पिण्याचे पाणी तसेच विजेची व्यवस्था करण्यात आली आहे.सालबर्डीच्या सुरुवातीलाच रस्त्याच्या दुतर्फा संत्र्याच्या बागा असून माळू नदीच्या काठावर संत महादेव महाराज देवस्थान,संत मारुती महाराज देवस्थान,संत भगवान बाबा देवस्थानची विशाल वास्तू उभी आहे.या ठिकाणी भाविक भक्तांना राहण्याची व्यवस्था सुद्धा मंदिर प्रशाशनाच्या वतीने करण्यात आली आहे. या ठिकाणी संत मारुती महाराज यांनी समाधी घेतली असून त्या ठिकाणी मोठे देवस्थान उभे आहे.सालबर्डीच्या पहिल्या पायरीपाशी भक्ताच्या दर्शनासाठी शिवलिंग असून पुढे काही अंतरावर माळु व गुप्त गंगानदीच्या संगमावर श्री रामाचे मंदिर आहे.महाराष्ट्र व मध्यप्रदेशाची दळणवळण योग्य रीतीने व्हावी यासाठी मध्यप्रदेश शासनाने सालबर्डी ते आठनेर हा महामार्ग सुरू केला आहे.या मार्गावरील नैसर्गिक देखावे अलोभनीय असे आहे. या संगमापासून काही अंतरावर गेल्यावर महानुभावाचे प्राचीन मंदिर असून या मंदिरात वर्षभर भाविक दर्शनासाठी हजेरी लावत असतात.या ठिकाणाहून काही अंतरावरच महाभारत कालीन पांडवाची कचेरी असून तिची देखभाल करण्याची जबाबदारी पुरातत्व विभाग नागपूर यांच्याकडे आहे.



रामायण या ग्रंथात सीतामाईचे वनवासाच्या काळातील वास्तव्य सातपुडा पर्वतात होते.या ठिकाणी सीतेला आंघोळ करण्याकरिता जलकुंड असून या कुंडात आजही गरम तसेच थंड पाणी अनुभवास मिळत आहे.सीतेने या ठिकाणी लवकुश् या जुळ्या बाळांना जन्म दिला अशी सुद्धा आख्यायिका आहे.नैसर्गिक वनसंपत्तीने नटलेल्या या मध्यप्रदेशात बरीच प्रेक्षणीय स्थळे असल्यामुळे यास्थळी भेट देण्याकरिता बाराही महिने पर्यटक हजेरी लावत असतात.ज्या ठिकाणी प्राचीन शिवगुफा आहे त्या ठिकाणी यात्रेकरूंसाठी मध्यप्रदेश सरकारतर्फे पिण्याच्या पाण्याची व विजेची व्यवस्था करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी



सुद्धा लाखोच्या संख्येने भाविक भक्तगण शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी येणार आहे.

या यात्रा महोत्सवात आकाश पाळणे,मौत का कुवॉ, सिनेमा टॉकीज, हॉटेल, स्टेशनरी दुकाने,चणे फुटाण्याची दुकाने,पितळी भांड्याचे दुकाने,दगडी जातेची दुकाने व्यवसायिकांनी उभारली आहे. महाशिवरात्री निमित्त १५ फेब्रुवारी रोजी एकादशीच्या पावन-पर्वावर देशभरातील लाखो भाविक भक्तगण लहान महादेवाचे दर्शन घेण्यासाठी मोठी रीघ लावणार आहे.या ठिकाणी माडु नदीच्या पात्रात भुयार मार्गावर हत्तीडोह असून ह्या हत्तीडोहातील पाणी संथ गतीने वाहत असल्यामुळे लोकांना आंघोळीचा मोह आवरता येत नाही त्यामुळे नदीपात्रातून वाहून जाणाऱ्या अनेक घटना घडल्या आहे. सदर यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोर्शी तसेच आठनेर पोलिसांच्या वतीने तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे. महाशिवरात्रीनिमित्त सालबर्डी येथे भरणाऱ्या यात्रेसाठी प्रवाशांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने मोर्शी, वरूड, परतवाडा, अमरावती, आर्वी, यवतमाळ, नागपूर येथून गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.येत्या १२ फेब्रुवारीपासून सालबर्डी यात्रा महोत्सवाला सुरुवात होणार असून भावीक भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**मोर्शी**

# सर्वोपचार रुग्णालयात जेवणाची दुरावस्था ; आ. पठाण यांचा संताप, अधिष्ठात्यांना धारेवर

## ‘स्मार्ट’ कंत्राटांवर मंत्र्यांच्या जावयाचा दबदबा ? अधिवेशनात सरकारला घेरण्याचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

*जिल्ह्यातील सर्वोपचार रुग्णालयातील जेवणाचा निकृष्ट दर्जा, वार्ड परिसरातील अस्वच्छता, कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती आणि रुग्णांशी होणारी उद्धट वागणूक या गंभीर मुद्द्यांवर पश्चिम अकोला मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी गुरुवारी रुग्णालय प्रशासनाला चांगलेच फैलावर घेतले. अधिष्ठाता डॉ. सोनोने यांच्यासोबत झालेल्या बैठकीत त्यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत, व्यवस्था तात्काळ सुधारण्याच्या निर्देश दिले.*



### जेवणाचा दर्जा पाहून संताप

रुग्णालयातील विविध वार्डची पाहणी करताना आ. पठाण यांनी रुग्णांना दिले जाणारे जेवण स्वतः तपासले. जेवणाचा दर्जा अत्यंत खालावलेला असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. ‘जेलमधील कैद्यांना जसे अन्न दिले जाते, त्याप्रमाणे रुग्णालयातील रुग्णांना जेवण देणे ही लाजिरवाणी बाब आहे,’ अशी टीका त्यांनी केली. जेवणाचा दर्जा तात्काळ सुधारावा, अन्यथा संबंधितांवर कारवाईचा इशारा त्यांनी दिला.

### वार्डबॉय नसल्याने नातेवाईकांकडूनच रुग्णांची हलवणूक

वार्ड परिसरात फेरफटका मारताना स्ट्रेचरवर रुग्णांना हलवण्यासाठी वार्डबॉय उपलब्ध नसल्याचे आढळले. परिणामी रुग्णांचे नातेवाईकच स्वतः रुग्णांना एका वार्डमधून दुसऱ्या वार्डमध्ये नेत असल्याचे दृश्य पाहून आमदार संतप्त झाले. ‘ही बाब अत्यंत निंदनीय असून व्यवस्था सुधारली नाही तर प्रशासनाला जड जाईल,’ असा दम त्यांनी दिला.

### कर्मचाऱ्यांच्या वागणुकीवर तक्रारी

पाहणीदरम्यान अनेक रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कर्मचाऱ्यांकडून उद्धट वागणूक मिळत असल्याच्या तक्रारी केल्या. यावर आमदारांनी संबंधित कर्मचाऱ्यांना वर्तणूक सुधारण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. ‘हे रुग्णालय जनतेच्या सेवेसाठी आहे, त्रास देण्यासाठी नाही,’ असे स्पष्ट शब्दांत त्यांनी बजावले.

### कंत्राटांवर राजकीय छाया?

रुग्णालयातील अनेक कंत्राटे एका मंत्र्याच्या जावयाला देण्यात आल्याची चर्चा असल्याचा मुद्दा उपस्थित करत आ. पठाण यांनी या कंपनीचा अंधाधुंद कारभार सुरू असल्याचा आरोप केला. ‘कंत्राटदारांवर कोणाचेही नियंत्रण नसल्याने रुग्णालयातील सेवा कोलमडली आहे. याबाबत अधिवेशनात सरकारला जाब विचारणार,’ असे त्यांनी स्पष्ट केले.

### प्रशासनाच्या अडचणीही ऐकल्या

पाहणीनंतर घेतलेल्या बैठकीत आ. पठाण यांनी रुग्णालय प्रशासनाच्या अडचणी जाणून घेतल्या. रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत, अधिवेशनात हा प्रश्न ठामपणे मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. सर्वोपचार रुग्णालयातील सध्याची स्थिती चिंताजनक असून, जनतेच्या आरोग्याशी संबंधित या प्रश्नावर आता प्रशासन नेमकी काय पावले उचलते, याकडे लक्ष लागले आहे.

# थकित मालमत्ता करासाठी ‘शास्ती अभय योजना’ लवकरच ?

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या वसुलीत वाढ करण्यासाठी शहरात ‘शास्ती अभय योजना’ राबविण्याचे संकेत मिळत आहेत. तसेच मुख्य बाजारपेठ व प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमणांवर कठोर कारवाई करून वाहतूक कोंडी कमी करण्याचा निर्णय विशेष बैठकीत घेण्यात आला.

अकोला पूर्वचे आमदार तथा मुख्य प्रतोद रणधीर सावरकर यांच्या पुढाकाराने गुरुवारी (दि. १२) मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या दालनात बैठक पार पडली. यावेळी महापौर शारदा रणजीत खेडकर, माजी महापौर विजय अग्रवाल, भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक जयंत मसने, उपमहापौर अमोल गोगे, शहर विकास आघाडीचे गटनेते पवन महल्ले, नगरसेवक शरद तुरकर आदी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील थकित मालमत्ता करधारकांना कर भरणे सुलभ व्हावे, यासाठी ‘शास्ती अभय योजना’ लागू करण्याबाबत चर्चा झाली. दंड व व्याजात सवलत देऊन थकबाकी वसुलीला गती देण्याचा प्रस्ताव पुढे आला. मनपाच्या आर्थिक स्थितीला बळकटी देण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले.



### मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम

दरम्यान, शहरातील मुख्य मार्गांवरील अतिक्रमणामुळे वाढत असलेली वाहतूक कोंडी आणि नागरिकांची गैरसोय लक्षात घेता अतिक्रमण हटविण्याची मोहीम तीव्र करण्याचे निर्देश देण्यात आले. फेरीवाले व हातगाडीधारकांना मनपाने तयार केलेल्या ‘हॉकर्स झोन’मध्ये स्थलांतरित करून रस्ते मोकळे करण्यावर भर देण्यात आला. तसेच मनपा आवारभिंतीलगतचे अतिक्रमण काढून त्या ठिकाणी सौंदर्यीकरण करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

अतिक्रमण निर्मूलनासाठी झोननिहाय स्वतंत्र पथके स्थापन करून नियमित कारवाई करण्याच्या सूचना आमदार सावरकर यांनी दिल्या. बैठकीस मनपा उपायुक्त विजय पारतवार, सहाय्यक आयुक्त देविदास निकाळजे, राजेश सरप, मालमत्ता अधिकारी संदीप गावंडे, विधी अधिकारी शाम ठाकूर आदी उपस्थित होते.

# गावठी हातभट्टी उद्ध्वस्त, एक ताब्यात

## माना पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

माना पोलिसांनी ऑपरेशन प्रहार अंतर्गत ग्राम कुरुम येथे अवैध गावठी दारू निर्मितीवर धडक कारवाई करत हातभट्टी उद्ध्वस्त केली. या कारवाईत एकास अटक करण्यात आली असून सुमारे ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास गुप्त माहितीच्या आधारे माना पोलीस स्टेशनच्या पथकाने ग्राम कुरुम (ता. मुर्तीजापूर) येथे छापा टाकला. यावेळी आरोपी राहुल अवधूत गवई (वय ३६, रा. कुरुम) याच्या ताब्यातून १० लिटर गावठी हातभट्टी दारू (किंमत सुमारे २ हजार रुपये) तसेच ३६० लिटर सडवा मोहामाच (किंमत सुमारे ७२ हजार रुपये) असा एकूण ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार, पो. हे. कॉ. भड, पो. हे. कॉ. उमेश हरमकर व पो. कॉ. आकाश काळे यांनी सहभाग घेतला.

# सावधान ! उड्डाणपुलावर रॉंग साईड चढल्यास फुटणार गाडीचे टायर

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील नव्या उड्डाणपुलावर वाढत्या ‘रॉंग साईड’ वाहतुकीमुळे होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी अकोला जिल्हा पोलीस दलाने ठोस पाऊल उचलले आहे. उड्डाणपुलावरील चुकीच्या दिशेने धावणाऱ्या वाहनांना रोखण्यासाठी स्पाईक बॅरियर बसविण्याची उपाययोजना गुरुवारी अमलात आणण्यात आली.

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून हा प्रस्ताव जिल्हा रस्ता सुरक्षा समितीसमोर मांडण्यात आला होता. समिती अध्यक्षा तथा जिल्हाधिकारी यांच्या मंजुरीनंतर १२ फेब्रुवारी रोजी दोन महत्त्वाच्या उतारांवर स्पाईक बॅरियर बसविण्यात आले. यामध्ये उड्डाणपुलावरून नेहरू पार्क चौकाकडे उतरणारा मार्ग तसेच टॉवर चौकाकडे जाणारा उतार यांचा समावेश आहे. या ठिकाणी विरुद्ध दिशेने वाहन नेऊ नये, यासाठी दर्शनी भागात सूचना फलक व फ्लेक्स बोर्ड लावण्यात आले आहेत. मात्र, तरीही ‘रॉंग साईड’ने वाहन चालविण्याचा हट्ट केल्यास संबंधित वाहनधारकांच्या टायरचे नुकसान होणार असून त्यास ते स्वतः जबाबदार राहतील, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.



### नव्या उड्डाणपूलावर लागले अत्याधुनिक स्पाईक बॅरियर

शहर वाहतूक शाखेमार्फत या दोन्ही ठिकाणी नियमितपणे वाहतूक पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. तसेच मोटार वाहन कायद्यानुसार नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, उड्डाणपुलावरील बेफिकीर ‘रॉंग साईड’ संस्कृतीमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत होता. पोलिसांच्या या निर्णयामुळे अपघातांना आळा बसणार का, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. शहर वाहतूक शाखेने नागरिकांना आवाहन केले आहे की, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे आणि जीव धोक्यात घालणारी ‘रॉंग साईड’ सवय त्वरित बंद करावी.

# प्रभातचे ८ विद्यार्थी डॉ. होमिभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवड

**अकोला :** शालेय जीवनात शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत प्रतिष्ठेच्या ‘डॉ. होमिभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या’ दुसऱ्या प्रात्यक्षिक फेरीतून प्रभात किड्स स्कूलचे ८ विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी गुणवत्तापूर्ण निवड झाली आहे.

यामध्ये इयत्ता ६ वी चे पाच विद्यार्थी असून त्यामध्ये अर्णव गोलोकार, रेयांश बोबडे, आराध्या राठी, ओजस सोर आणि मोरया सोनवणे यांनी उज्वल यश प्राप्त केले आहे. या स्पर्धेत इयत्ता नववीच्या आदित्य गुरुदासानी, नील अंभोरे आणि तनिष्क कोरडे यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

प्रभातच्या या बालवैज्ञानिकांना स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख व्ही. अनुराधा यांच्या मार्गदर्शनात शुभम डांगे, पुजा ठाकूर, शुभांगी व्यवहारे, वैशाली जोशी व प्रियंका माणिकराव यांचे मार्गदर्शन लाभले असून प्रभात किड्स स्कूलचे संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ यांनी कौतुक केले असून अंतिम फेरीतील उज्वल यशासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.


## जाहिर सुचना

सर्व जनतेस व वित्तिय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री. सुमनबाई रामकृष्ण इधोकार रा. शंकर नगर, संग्रामपूर ता. संग्रामपूर जि. बुलढाणा यांनी पी.एन.बी. हॉऊसींग फायनांस लिमिटेड अकोला येथे खालील वर्णनाचि मालमत्ता गहाण ठेवून कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला आहे.

गट नं ३४८/१ (नविन) १६८ (जुना), नगर पालिका मालमत्ता क्र. ३७८, लेआऊट प्लॉट नं ५४ मौजे संग्रामपूर चे क्षेत्रफळ १०८९ चौ फूट ता. संग्रामपूर जि. बुलढाणा’.

ची मुळ नोंदणीकृत खरेदी खत ९७/१९९३ दि. १९.०१.१९९३, ज्यात लि घेणार :- सुमनबाई रामकृष्ण इधोकार व लिहून देणार ;- प्रल्हाद राजाराम सावतकर हे आहेत ज्याची मुळ प्रत दिनांक ०१.०३.२००१ रोजी सुमनबाई रामकृष्ण इधोकार यांच्याद्वारे गहाळ झाली आहे ज्याचा रिपोर्ट पोलीस स्टेशन तामगाव, येथे ता ३०.०१.२०२६ ला दिला आहे.

ज्या अर्थी वरील मालमत्ते वर कोणाचे काही कर्ज, हक्क, बोजा, गहाण, अधिकार, असेल त्यांनी सदर सूचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्र पुराव्यासह आक्षेप नोंद्वावा अन्यथा कोणाचाही कसलाही स्वरूपाचा आक्षेप नाही असे समजुन पी. एन. बी हॉऊसींग फायनांस लिमिटेड अकोला हे वरिल मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाचि रक्कम वितरीत करतील त्यानंतर कोणाचीहि कसलीहि हरकत वा उजर चालनार नाही, याचि नोंद घ्यावी.

अकोला
दि ०९.०२.२०२६

**विरेंद्र सुरेशकुमार नान्दे**
रा :- रामधन प्लौट, रामदासपेठ, अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २०६/२०२६ — प्रोसेस नं.१७४९/२०२६
चौ.ता. १६/०३/२०२६ — दिनांक : ०७/०२/२०२६

**अर्जदार :** १. शशिकला शालीग्राम राउत २. सुभाष शालीग्राम राउत रा. वनोजा ता. मंगरूळपीर, जि. वाशिम. सध्या रा. रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. दिलीप शालीग्राम राउत रा. वनोजा ता. मंगरूळपीर, जि. वाशिम. ४. ललिता ज्ञानदेव भोयर रा. मु. पो. साखरडोह, ता. मानोरा, जि. वाशिम ५. सुनंदा प्रकाश वाघमारे रा. कानशिवणी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शालीग्राम नारायण राउत
**पत्ता :-** रा. व्दारा सुभाष शालीग्राम राउत रा. हनुमान मंदिरासमोर, गजानन पेठ, राउतवाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शालीग्राम नारायण राउत यांचे दि. ११/०३/२०२३ रोजी वनोजा ता. मंगरूळपीर, जि.वाशिम येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्र. ०९/२०२६ कलम - 19
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** श्री. मारोती संस्थान पारद, ता. मुर्तीजापूर जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. अमोल श्रीकृष्ण ठक रा. मु.पो. पारद, ता. मुर्तीजापूर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ )वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन):-** रुपये २१००/- अध्यक्षांच्या कडे जमा.

**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** मौजे पारद, ता. मुर्तीजापूर जि. अकोला येथील ग्राम पंचायत हद्दीतील मालमत्ता क्रमांक ४२७ मध्ये श्री. मारोतीचे मंदिर, मोजमाप फुटात पूर्व-पश्चीम २१ फुट उत्तर-दक्षिण ५० फुट ऐकून - १०५० चौरस फुट जमीन. पुर्वेस : खुली जागा पश्चिमेस : रस्ता उत्तरेस : रस्ता दक्षिणेस : खुली जागा स्थावर मालमत्तेची अंदाजे किंमत २,००,०००/- (दोन लक्ष रुपये)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेलत्यांनी त्यांची केलेली कैफियतही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी दिली.

शिक्का — **प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. क्र. २४/२०२६ — प्रोसेस नं.६३२/२०२६
चौ.ता. १६/०३/२०२६ — दिनांक : १०/०२/२०२६

**अर्जदार :** १. कौसर बानो जमीर अहमद, वय ६३, धंदा -घरकाम २. इरफान अहमद जमीर अहमद, वय ४३. धंदा -मेडीकल प्रॅक्टीस ३. रीजवान अहमद जामीर अहमद, वय ३७, धंदा- नोकारी सर्व रा. इफ्तेखार प्लॉट आकोट ता. आकोट जि. अकोला मो. नं. ७०२०८३६६९९ ४. हुमेरा आफरीन मोहसीन खान, वय ३७ धंदा - घरकाम रा. फ्लॉट नं. ६०३, बिल्डींग एफ १ ग्रीनफील्ड, भारत इको विस्टा, मुंबई पणवेल रोड शिलफाटा, ठाणे दवाले ठाणे ५. सालेहा फरहीन अब्दुल समी, वय - ३३, धंदा - घरकाम रा. नुर नगर आकोट फाईल अकोला ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :**कोणीही नाही.

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७चे कलम २ अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे. अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क. १ ते ३ हे वरील पत्ताचे कायम चे रहीवासी आहेत. मयत जमीर अहमद शेख दाउद यांचा मृत्यु दि. २९/१०/२०२५ रोजी मौजे ओझोन स्पेशालिटी हॉस्पीटल अकोला येथे मरण पावले. मयतांची पत्नी नामे कौसर बानो जमीर अहमद, मयतांचा मुलगा नामे इरफान अहमद जमीर अहमद, मयतांचा मुलगा नामे रीजवान अहमद जमीर अहमद, मयतांची मुलगी हुमेरा आफरीन मोहसीन खान, मयतांची मुलगी सालेहा फरहीन अब्दुल समी, मयत जमीर अहमद शेख दाउद यांना अर्जदार क. १ ते ५ यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वत: वारस असल्यास सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक )
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोट, जि. अकोला.

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८/२०२६ — प्रोसेस नं.१६९/२०२६
चौ.ता. १८/०३/२०२६ — दिनांक : ०४/०२/२०२६

**अर्जदार :** १. वेणुताई नारायण निलखन वय अं.३६ वर्ष धंदा-घरकाम २. सोहम नारायण निलखन वय १५ वर्ष धंदा-शिक्षण ३. अणुजा नारायण निलखन वय ११ वर्ष धंदा-शिक्षण अर्जदार क. २ व ३ तर्फे अ.पा.क.आई नामे वेणुताई नारायण निलखन सर्व रा. मु.सायवणी पो. चान्नी ता. पातुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : नारायण रामकृष्ण निलखन
**पत्ता :-** रा. सायवणी ता.पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नारायण रामकृष्ण निलखन यांचा मृत्यु दि.३०/०८/२०२५ रोजी सायवणी ता. पातुर जि. अकोला येथे झाला. तसेच मयत यांची आई नामे शांताबाई रामकृष्ण निलखन हया दिनांक २६/०१/२०२४ रोजी मयत झाल्या. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८७१/२०२५ — प्रोसेस नं.१८३५३/२०२५
चौ.ता. २४/०३/२०२६ — दिनांक : ०७/११/२०२५

**अर्जदार :** १. महवश अफरोज फझल उर रहेमान रा. कद्री, पुरा, अबुबकार शाळेजवळ, ता. बाळापूर, जि. अकोला. २. महेजाबिन अफरोज आरिफ हुसेन रा. नेहरू नगर, १६०० प्लॉट, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : आरिफ हुसैन सफदार हुसैन
**पत्ता :-** रा. नेहरू नगर, १६०० प्लॉट, रोड नं. ३, अजमालिया मस्जिद जवळ, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आरिफ हुसैन सफदार हुसैन यांचे दि. १४/०३/२०१९ रोजी नेहरू नगर, १६०० प्लॉट, रोड नं. ३, अजमालिया मस्जिद जवळ, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४३/२०२६ — प्रोसेस नं.१३८९/२०२६
चौ.ता. ०९/०३/२०२६ — दिनांक : ०२/०२/२०२६

**अर्जदार :** १. कमलाबाई रामचंद्र बुंदे २. प्रकाशराव रामचंद्र बुंदे अर्जदार क. १ व २ रा. बजरंग वाडी समोर, नेहरू नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ३. शकुंतला गजानन पटके रा. चांदणी पुरा, मुंडगाव, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** किसन रामचंद्र बुंदे रा. मु. पो. कोकर्डा ता. दर्यापूर, जि. अमरावती. मो. नं. ८४५९१७५१०७
**मयताचा पत्ता :-** मयत : रामचंद्र नथ्थुजी बुंदे
**पत्ता :-** रा. बजरंग वाडी समोर, नेहरू नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामचंद्र नथ्थुजी बुंदे यांचे दि. ०२/०७/२००८ रोजी मोठी उमरी, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्याचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०२/ २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

एस. आर. एन. क्र. AKL/14502/18/23 फेरफार अहवाल /अर्ज क्र. ०१/२०२४
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** श्री महालक्ष्मी माता मंदिर संस्थान, मु.पो.पणज, ता. अकोट, जि. अकोला बाबत
**न्यासाचा पत्ता :-** सुरेश वामनराव दातीर, ता. अकोट, जि. अकोला, अकोला, अकोट, पानज
**अर्जदार :** सुरेश वामनराव दातीर,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, अकोला, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Stamp paper | 500.00 |
| 2 | LOUDSPEAKER SET - 1 PIECE | 5000.00 |
| 3 | DEVICHE MUKUT - 3 PIECE 2 SET (SILVER) | 10000.00 |
| 4 | PITALI GHANTA - 2 PIECE | 4000.00 |
| 5 | STEEL ALMARI - 1 PIECE | 10000.00 |
| 6 | DAANPAETI LOKHANDI - 1 PIECE | 5000.00 |
| 7 | CCTV CAMERA - 6 PIECE | 2300.00 |
| 8 | TAAT, VATYA, GADVE, STEEL GLASS ETC. | 1500.00 |
| 9 | BOREWELL AND 1.5 HORSEPOWER MACHINE - 1 PIECE | 18000.00 |
| 10 | VAPARNYACHE PANYAKARITA PANI SATHWAN PLASTIC TANK - 12 PIECE | 15000.00 |
| 11 | NADIVARIL LOKHANDI PUL | 500000.00 |
| 12 | TIN SHED MANDIRACHE PURN PASCHIM UTTAR DAKSHIN BAJUNE | 1000000.00 |

**(अ) जंगम मिळकत :-** रोख रु. १५७१३००/- मात्र
( अक्षरी रुपये पंधरा लाख एक्काहत्तर हजार तीन शे मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी.एस. किंवा महानगर पालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 Mouje 'Waghoda, Grampanchayat Panaj, Tq. Akot, Dist | Gat no. 78 | 0.18 R | विशेष | Occupant Class 1 | 117500.00 |

(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. ११७५००/- मात्र (अक्षरी रुपये एक लाख सतरा हजार पाच शे मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ११-०२-२०२६ रोजी दिली.

शिक्का — **अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला



जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ७७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# 'वर्धा उत्सवा'त खुर्च्यांचा सन्नाटा

## दर्जेदार मैफिलींनाही रसिकांची साथ नाही; सांस्कृतिक चैतन्याला काय झाले?

**वर्धा/जनमाध्यम**
रामनगर परिसरातील एका नामांकित शिक्षणसंस्थेच्या भव्य सभागृहात सध्या 'वर्धा उत्सवा'च्या निमित्ताने गीत-संगीत, काव्यवाचन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी सजली आहे. व्यासपीठ उजळलेले, कलाकारांची दमदार उपस्थिती, दर्जेदार सादरीकरण सगळे काही असूनही सभागृहात मात्र रिकाम्या खुर्च्यांचे चित्र दिसत आहे. काही वर्षांपूर्वी याच सभागृहात हास्य-व्यंग संमेलने, कवी संमेलने, विनोदी मैफिली आणि अध्यात्मिक प्रवचने यांना मोठी गर्दी उसळायची. टाळ्यांचा कडकडाट आणि खचाखच भरलेली आसनव्यवस्था हे नेहमीचे चित्र होते. मात्र यंदाच्या उत्सवात अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आयोजकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.कार्यक्रमांची गुणवत्ता, कलाकारांची निवड आणि आयोजनात कोणतीही कमतरता नसल्याचे आयोजक सांगतात. तरीही रसिकांची उपस्थिती कमी का, यावर चर्चा सुरू आहे. सोशल मीडियाचे वाढते आकर्षण, ऑनलाईन मनोरंजनाचे पर्याय, तसेच स्थानिक पातळीवरील जनसंपर्कातील मर्यादा ही संभाव्य कारणे पुढे येत आहेत.वर्धा ही गांधी-विनोबांच्या विचारांनी नटलेली भूमी. काव्य, संगीत आणि विचारांच्या परंपरेला जपणाऱ्या या शहरात सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रतिसाद मिळणे अपेक्षित असते. मात्र सध्याचे चित्र वेगळेच काही सांगते.सांस्कृतिक उपक्रमांना नागरिकांनी साथ दिली नाही, तर अशा उत्सवांचे भवितव्य काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. वर्धेकर रसिकांनी पुन्हा एकदा सभागृहाकडे पावले वळवली, तरच शहराच्या सांस्कृतिक चैतन्याला नवी उभारी मिळू शकेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कामगारांच्या घामाचा हिशोब द्या, ३० कोटी कामगारांचा एल्गार

## निवासी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधान- मुख्यमंत्र्यांना निवेदन

**वर्धा/जनमाध्यम**
देशातील संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संपाची हाक देण्यात आली. या पार्श्वभूमीवर वर्ध्यात भाकपा (माले) व एआयसीसीटीयूच्या वतीने निवासी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले.



कामगारविरोधी नव्या कायद्यांमुळे कामगारांचे हक्क धोक्यात आले असून, सार्वजनिक उद्योगांची वाट लावली गेल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. गेल्या दहा वर्षांत केंद्र व राज्य सरकारच्या क्षेत्रात नोकरभरती न झाल्याने बेरोजगारी वाढल्याचे सांगण्यात आले. सध्या होणारी भरतीही कंत्राटी पद्धतीने होत असून, आरक्षणाचे नियम लागू होत नाहीत. कंत्राटी कंपन्या जीपीएफ, सीपीएफ व विमा सुविधा देत नसल्याने कामगारांचे भविष्य असुरक्षित झाले आहे, असा आरोप निवेदनात करण्यात आला.

अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शालेय पोषण आहार देणाऱ्या महिला, बँक कर्मचारी आदी विविध क्षेत्रातील कामगारांनी संपात सहभाग नोंदविला. देशभरात जवळपास ३० कोटी कामगार या संपात सहभागी झाल्याचा दावा संघटनांनी केला असून, शेतकरी संघटनांचाही पाठिंबा लाभला आहे.महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाचे अध्यक्ष प्रा. राजू गोरडे यांनी कामगारांना एकत्र येण्याचे आवाहन केले. यावेळी प्रा. राजू गोरडे, मनोहर पंचारिया, प्रा. राजेंद्र जिभकाटे, जितेंद्र गोरडे, नितीन सुळे, पद्माकर कांबळे, शेख नजीर शेख, संजय देसाई, राजू तेलतुंबडे, अविनाश नागदेवे, हसीना गोरडे, चंद्रशेखर भेंडे, प्रा. राजेंद्र बानमारे, राजू भगत, कॉम्रेड राजू डांगे, सचिन डहाके यांच्यासह अनेक प्रतिनिधी उपस्थित होते.आंदोलनाची पुढील दिशा लवकरच जाहीर केली जाणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.कामगारांच्या हक्कांसाठीची ही लढाई आता अधिक तीव्र होण्याचे संकेत या संपातून मिळत आहेत.

## संक्षिप्त

### मोबाईलवर मोठ्याने बोलणे ठरले कारण; तिघांकडून मारहाण

**कारंजा (घा.)** - मोबाईलवर जोरात बोलल्याच्या कारणावरून राहटी येथे तिघांनी एकास मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. शिवलिंग बिटणे (वय ३८) हे घरात नेटवर्क नसल्याने स्लॅबवर उभे राहून मोबाईलवर बोलत होते. शेजारी राहणाऱ्या शरद चेले यांनी मोठ्याने बोलत असल्याने हटकले. त्यातून शाब्दिक वाद झाला. वाद वाढल्यानंतर शरद चेले, लक्ष्मण चेले व संगीता चेले यांनी बिटणे यांना लाथाबुक्यांनी मारहाण केल्याची तक्रार आहे. जखमीवर उपचार करण्यात आले असून कारंजा पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. किरकोळ कारणावरून हिंसाचार होत असल्याने नागरिकांत नाराजी व्यक्त होत आहे.

### दुभाजक ओलांडताना कारची धडक; दुचाकीस्वार गंभीर जखमी

**देवळी** - पेट्रोल संपल्याने दुभाजक ओलांडताना कारने दुचाकीला धडक दिल्याने एक जण गंभीर जखमी झाला. हरीश चुटे (रा. शिरपूर होरे) हे पत्नीसह दुचाकीने जात असताना पेट्रोलपंपाकडे वळण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचवेळी समोरून येणाऱ्या एमएच २९ एआर ६०२३ क्रमांकाच्या कारने जोरदार धडक दिली. अपघातात हरीश चुटे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. या प्रकरणी देवळी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष जीवावर बेतत असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले.

### कट मारल्याचा जाब विचारताच रॉडने हल्ला; सहा जणांवर गुन्हा

**कारंजा (घा.)** - वाहनाला कट मारल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून सहा जणांनी मिळून एका इसमाला लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना बोरी फाटा येथे घडली. आनंद मिश्रा (वय ३२, रा. ठाणेगाव) हे कारने जात असताना दुसऱ्या वाहनचालकाने कट मारला. यावरून मिश्रा यांनी जाब विचारला. त्याचा राग मनात धरून हीरा नेहारे व अन्य पाच जणांनी संगनमत करून लाथाबुक्यांनी व रॉडने मारहाण केल्याची तक्रार आहे. जखमीवर उपचार करण्यात आले. कारंजा पोलिसांनी सर्व आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

### कामगाराची आत्महत्या

**वर्धा-** भुगाव येथील एका कंपनीत काम करणाऱ्या तरुण कामगाराने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. मृत तरुण हा मूळचा गोंदिया जिल्ह्यातील असून रोजगारासाठी वर्ध्यात वास्तव्यास होता. आत्महत्येमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी या घटनेने कामगार वर्गात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### संतोष भालेराव यांचे निधन



**सिंदी रेल्वे-** विनोबा वार्डात राहणारे संतोष भालेराव (वय ५४) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते भारत पेट्रोलियम मध्ये अग्निशमन विभागात कार्यरत होते. मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडला.त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि परिवार आहे.

# काळ्या पैशावर सत्तेची कुबडी

## रामनगरच्या खोलीतून 'महालक्ष्मी'पर्यंतचा माफिया प्रवास, राजकीय आशीर्वादाने उन्मत्त झालेली अवैध सत्ता

**वर्धा/जनमाध्यम**
वर्धा जिल्ह्यात सध्या एकच खळबळजनक चर्चा रंगली आहे, काळा पैसा, अवैध धंदे आणि त्यावर उभारलेली राजकीय छत्रछाया! कालपर्यंत रामनगर परिसरात एका छोट्याशा खोलीत मध्यमवर्गीय आयुष्य जगणारा व्यक्ती आज अचानक कोट्यवधींचा मालक कसा झाला, हा प्रश्न सामान्य जनतेला अस्वस्थ करत आहे. या प्रश्नामागे दडलेले सत्य अधिकच धक्कादायक आहे.

अवैध धंद्यातून गोळा केलेल्या पैशावर उभे राहिलेले साम्राज्य टिकवण्यासाठी या महाशयाने थेट राजकारणाचा मार्ग स्वीकारला. कायदा, नियम, नैतिकता यांना पायदळी तुडवत सत्तेच्या उंबरठ्यावर नतमस्तक होण्याचा हा उघडउघड प्रयत्न आहे. पत्नीला शिवसेनेत प्रवेश करून देत 'सामना' हातात घेण्याआधीच सत्ता हातात येईल, असा भ्रम या महाशयांनी बाळगला. शिवसेनेच्या तिकीटावर नगरपालिकेची निवडणूक लढवून नगरसेवक होण्याचे स्वप्न रंगवले गेले. मात्र जनतेने हा बनाव उघड केला आणि मतपेटीतूनच उत्तर दिले पराभव, पण माफियांची स्वप्ने पराभवाने थांबत नाहीत. आता डाव बदलला आहे. येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी सालोट पंचायत समितीतून थेट मुलाला मैदानात उतरवण्याची तयारी सुरू आहे. यावेळी रंग वेगळा मुलगा भाजपकडून उमेदवारी मागणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात आहे. सत्ता कुणाचीही असो, माफियांचा उद्देश एकच आपली माया सुरक्षित ठेवणे, यासाठी देवळीचे आ. राजेश बकाने यांच्याशी जवळीक वाढवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचीही चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. हाच फॉर्म्युला याआधी हिंगणघाट विधानसभा



क्षेत्रात वापरण्यात आला. आ, समीर कुणावर यांच्या जवळीक साधून 'अंकुश' नावाच्या व्यक्तीने अवैध धंद्यातून संपत्तीचा डोंगर उभा केला, हे उदाहरण अजूनही ताजे आहे. सत्ता बदलते, चेहरे बदलतात, पण काळ्या पैशाचा खेळ मात्र तोच राहतो.

सोमवारी 'जनमाध्यम'मध्ये कन्स्ट्रक्शन माफियाचा काळ्या पैशावर राजकीय छत्रछाया या स्फोटक मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध होताच अनेकांचे फोन खणखणले. तो कोण हा प्रश्न शहरभर घुमू लागला. आज तो मुखवटा फाटला आहे.शहरात महालक्ष्मी या नावाने ओळखला जाणारा कन्स्ट्रक्शन माफिया होमेश ठमेकर हाच तो चेहरा असल्याचे स्पष्ट झाले आहे.काळा पैसा, अवैध धंदे आणि राजकीय आशीर्वाद यांचा हा घातक संगम लोकशाहीसाठी थेट धोका आहे. प्रशासन, तपास यंत्रणा आणि राजकीय पक्ष आता डोळे उघडणार का, की पुन्हा एकदा माफियांच्या दारात लोकशाही लोटांगण घालणार हा सवाल वर्ध्याच्या प्रत्येक जागरूक नागरिकाच्या मनात धगधगत आहे.

## अडबाले यांच्या पुढाकाराने ४ प्रकरणे 'ऑन द स्पॉट' निकाली

# शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा



**वर्धा/जनमाध्यम**
जिल्ह्यातील खासगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आ.सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयात सभा पार पडली. बैठकीत अनेक प्रकरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेष म्हणजे, अडबाले यांच्या पुढाकाराने चार प्रकरणे 'ऑन द स्पॉट' निकाली काढण्यात आल्याने संबंधितांना मोठा दिलासा मिळाला.

जयप्रकाश थोटे व मनोज धंदरे यांच्या वैद्यकीय देयकांना तत्काळ मान्यता देण्यात आली. तसेच डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यालयातील सीमा चव्हाण व अक्षय चांदूरकर यांना सहायक शिक्षक म्हणून सेवासातत्य पदास पुढील आदेशापर्यंत मान्यता देण्यात आली.अनुकंपा नियुक्ती, शालार्थ आयडी, प्रलंबित मान्यता, वरिष्ठ/निवड श्रेणी, पेन्शन प्रकरणे, वेतनेतर अनुदान आदी विषयांवर चर्चा झाली. प्रलंबित प्रकरणे वेळेत निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. २७ मार्च रोजी सहविचार सभेचे आयोजन करण्याचे आदेशही देण्यात आले.बैठकीस शिक्षणाधिकारी महेंद्र गजभिये, विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व समस्याग्रस्त कर्मचारी उपस्थित होते.

# अंत्योदयाच्या विचारांचा दीप आजही तेवत आहे

## पं.दीनदयाळ उपाध्याय यांची पुण्यतिथी भावपूर्ण वातावरणात साजरी

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**
समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची किरणे पोहोचविण्याचा ध्यास घेणारे, एकात्म मानववादाचे प्रणेते आणि प्रखर राष्ट्रप्रेमी पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त सिंदी (रेल्वे) नगरपरिषद कार्यालयात भावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्रद्धा, कृतज्ञता आणि विचारांची उजळणी अशा वातावरणात पंडितजींना अभिवादन करण्यात आले.नगरपरिषदेच्या नवनिर्मित सभागृहात पं. दीनदयाळ यांच्या प्रतिमेचे पूजन करून नगराध्यक्ष राणी कलोडे, सर्व नगरसेवक व



मान्यवरांनी त्यांना विनम्र अभिवादन केले. त्यांच्या कार्याचा आढावा घेताना 'अंत्योदय' ही केवळ संकल्पना नसून ती समाजघडणीची दिशा आहे, असे प्रतिपादन करण्यात आले.भाजपाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश राठी, सुधाकर घवघवे व नगराध्यक्ष राणी कलोडे यांनी पंडितजींच्या साधेपणाचा, संघटन कौशल्याचा व राष्ट्रनिष्ठ भूमिकेचा उल्लेख करत त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित केली.

यावेळी नगरपरिषदेचे गटनेते प्रवीण मडावी, उपाध्यक्ष शेख अकील, नगरसेवक शरद तळवेकर, सुधाकर वलके, चेतना बडबाईक, राजश्री बोरीकर, योगीता जांबुतकर, घनश्याम मेंढे, ऐश्वर्या गवळी, इंदुमती कस्तुरे, स्नेहल कलोडे, वंदना डकरे, अरुण ढेंगरे, जयंता बडवाईक, चंद्रशेखर बेलखोडे, गणेश काळबांडे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी पं. दीनदयाळ यांच्या विचारांचा दीप प्रत्येकाच्या कृतीतून जिवंत ठेवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. सभागृहात त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञतेची आणि प्रेरणेची भावना स्पष्टपणे जाणवत होती.

### मजुरीच्या पैशावरून युवकाला बेदम मारहाण

**कारंजा (घा.)** - मजुरीच्या पैशाच्या वादातून २६ वर्षीय युवकाला बेदम मारहाण केल्याची घटना कारंजा तालुक्यात उघडकीस आली. प्रफुल्ल भलावी (रा. गारपीट) याने मजुरीचे पैसे मागितल्यावर संजय राठोड याने जुन्या पैशांचा मुद्दा काढत देयक देण्यास नकार दिला. यावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून प्रफुल्लला मारहाण करून जखमी करण्यात आल्याची तक्रार आहे. जखमीवर उपचार करण्यात आले. प्रकरणाची गंभीर दखल घेत कारंजा पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पैशांच्या किरकोळ कारणावरून वाढत असलेल्या अशा घटनांमुळे परिसरात चिंता व्यक्त होत आहे.

### सांडपाण्याच्या वादातून महिलेला मारहाण

**समुद्रपूर-** सांडपाण्याच्या कारणावरून राळेगाव येथे महिलेला मारहाण झाल्याची घटना घडली. माधुरी धापटे (वय ३५) व शेजारील ममता धापटे यांच्यात यापूर्वीही वाद होता. सकाळच्या सुमारास झालेल्या वादात ममता धापटे, ऋतूजा धापटे व सविता धापटे यांनी शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केल्याची तक्रार आहे. या मारहाणीत माधुरी जखमी झाल्या. घटनेनंतर समुद्रपूर पोलिसांनी तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. किरकोळ कारणांवरून वाद विकोपाला जात असल्याने ग्रामस्थांनी सामोपचाराने प्रश्न सोडविण्याची गरज व्यक्त केली आहे.

# ४३६ रुपयांचा हप्ता आणि संकटात दोन लाखांचा जीवनाधार

## रोहणा बँक ऑफ इंडियाची सामाजिक जाण; पीडित कुटुंबाला दिलासा

**रोहणा जनमाध्यम**
आयुष्याचा प्रवास कधी कोणत्या वळणावर थांबेल, याचा नेम नसतो. कष्टाने संसार उभा करणाऱ्या रेणुका उईके यांच्या अकाली निधनाने उईके कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. मात्र, संकटाच्या या अंधारात बँक ऑफ इंडियाच्या रोहणा शाखेने आशेचा दिवा पेटवला.

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत रेणुका उईके यांनी केवळ ४३६ रुपयांचा वार्षिक हप्ता भरला होता. त्यांच्या निधनानंतर शाखा व्यवस्थापक विशाल मुजमुल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि 'बँक सखी'च्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे दोन लाख रुपयांचा विमा दावा मंजूर झाला.मयत रेणुका यांच्या पती दिनेश उईके यांना पत्रकार फनींद्र रघाटाटे यांच्या हस्ते दोन लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. या मदतीमुळे दु:खाने खचलेल्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळाला असून भविष्यातील वाटचालीसाठी नवी उमेद मिळाली आहे.ग्रामीण भागात बँकिंग सेवा म्हणजे केवळ व्यवहार नव्हे, तर विश्वास आणि संवेदनशीलतेचे नाते असते. रोहणा शाखेने ही सामाजिक बांधिलकी जपत, गरजूंना दिलासा देण्याची परंपरा कायम ठेवली आहे. परिसरातून शाखेच्या या कार्याचे मनापासून कौतुक होत आहे.

# शाळा म्हणजे पारिवारिक ऋणानुबंध जपणारी संस्था'-इमरान राही

## आजी-माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमिलन सोहळा

**कारंजा/जनमाध्यम**
शाळेच्या अंगणात पुन्हा एकदा हसरे चेहरे, डोळ्यांत दाटलेला गहिवर आणि आठवणींचा ओलावाष्ठ काजळी येथील माध्यमिक विद्यालयात पार पडलेल्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमिलन सोहळ्याने अनेकांच्या मनातील जुन्या आठवणी जाग्या केल्या.



शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून ती पारिवारिक ऋणानुबंध जपणारी पवित्र जागा आहे. आयुष्याच्या वाटेवर कितीही पुढे गेलो तरी शाळेचे संस्कार आपल्याला आकार देत राहतात, असे हृदयस्पर्शी प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक इमरान राही यांनी केले.कार्यक्रमाचे उद्घाटन आदर्श शिक्षक मोहन मोहिते यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रसिक डोंगरदेव होते.

मंचावर राष्ट्रीय कराटे प्रशिक्षक उल्हास वाघ, अंकुश गिरडे, निकलेस भानसे, अमोल पेंढारकर, पायल धारपुरे, चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी मोहन मोहिते यांचा शाळेतर्फे सत्कार करण्यात आला. निलेश रमदम, मनोज बगाडे, लीलाधर दिग्रेस, रौशन धारपुरे, मिलिंद पठाडे, रौशन वरठी, कांचन फरकाडे, आशु कोसे या माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना शाळेच्या आठवणींना उजाळा दिला.कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका आशा उपासे यांनी ओघवत्या शैलीत केले, तर आभार अमोल पेंढारकर यांनी मानले.

मोठ्या संख्येने उपस्थित आजी-माजी विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत जुन्या दिवसांची चमक स्पष्ट दिसत होती. शाळेच्या त्या अंगणाने पुन्हा एकदा आपुलकीचा सुवास दरवळवला.

**नावात बदल**
माझे पूर्वी SHAHIN PARVIN AFSARKHA PATHAN असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील SHAHIN PARVEEN ABDUL RASHID SHEIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता : महादेवपुरा वर्धा ४४२००१**

**नावात बदल**
माझे पूर्वी SANTOSH KUMAR SAHOO असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील SANTOSH DURJADHAN SAHOO हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता : तळेगांव टालाटूले वर्धा ४४२००१**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक ७९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मध्यरात्री 'टॉमी'घेऊन चोराचा धुमाकुळ

## -शेतकऱ्याच्या घरातून साडेपाच लाखांचा ऐवज गायब



**अमरावती :** शेतात पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याच्या गैरहजेरीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने थेट घरात घुसून सशस्त्र चोरी केल्याची धक्कादायक घटना घाटलाडकी (ता. ब्राह्मणवाडा थडी) येथील बारीपुरा भागात घडली. सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे ५ लाख ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरट्याने लंपास केला आहे.

मितालेसिंग जगदेवसिंग पवार (४४) हे मंगळवारी (दि. १०) रात्री आपल्या संत्रा बागेला पाणी देण्यासाठी शेतात गेले होते. पहाटे साडेतीनच्या सुमारास ते घरी परतले असता घराचे कुलूप उघडे असल्याचे त्यांच्या लक्षात आले. संशयाने त्यांनी घरात प्रवेश केला असता हातात 'टॉमी' घेतलेला आणि चेहरा झाकलेला चोर समोर उभा असल्याचे दिसले. पवार यांना पाहताच चोराने पळ काढला. घरातील कपाटे उचकापाचक करून सर्व साहित्य अस्ताव्यस्त टाकण्यात आले होते. तपासणीअंती कपाटातून ४० हजारांची रोख रक्कम, २५ ग्रॅम वजनाची सुमारे ७५ हजार किमतीची सोन्याची साखळी, १ लाख २ हजार किमतीच्या चार सोन्याच्या अंगठ्या, १ लाख १२ हजार किमतीच्या सात मुलांच्या अंगठ्या, ८० हजारांचे ब्रेसलेट असा ऐवज चोरीला गेल्याचे आढळले. तसेच दुसऱ्या खोलीतून १ लाख २० हजारांची रोख रक्कम, चांदीची मूर्ती व सुमारे ५ लाख ३८ हजार किमतीची चांदीची प्लेटही चोरट्याने पळवली. घटनेनंतर पवार यांनी ब्राह्मणवाडा थडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तसेच श्वानपथकाच्या मदतीने तपासाची चक्रे फिरवली जात आहेत. ग्रामीण भागात सशस्त्र चोरीची ही घटना घडल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# निवृत्तीवेतनधारकांसाठी उद्या सायबर सुरक्षा जनजागृती शिबिर

**अमरावती:** आजच्या डिजिटल युगात सायबर फसवणुकीचे प्रमाण वाढत असल्याने, निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना सुरक्षित व्यवहार करता यावेत यासाठी विशेष पुढाकार घेण्यात आला आहे.

संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई व सी-डॅक यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यातील सर्व निवृत्तीवेतनधारकांसाठी उद्या, शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता 'सायबर सुरक्षा जनजागृती' विषयावर ऑनलाईन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये डिजिटल युगात वावरताना, विशेषतः बँक व्यवहार आणि ऑनलाईन सुविधांचा लाभ घेताना कोणती खबरदारी घ्यावी, याविषयी तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त निवृत्तीवेतनधारकांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेता घ्यावा. कोषागार कार्यालयाच्या प्रांगणातील 'जिजाऊ सभागृह' येथे आसन व्यवस्था करण्यात आली आहे.

अमरावती कोषागार कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन वरिष्ठ कोषागार अधिकारी शिल्पा पवार यांनी केले आहे.

# राष्ट्रीय लोक अदालत १४ मार्च रोजी

**अमरावती:** जिल्ह्यातील सर्व न्यायालयात शनिवार, दि. १४ मार्च २०२६ रोजी 'राष्ट्रीय लोकअदालत'चे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यात दाखल व दाखलपूर्व अशी प्रकरणे तडजोडीने व सामंजस्याने निकाली काढण्याकरिता ठेवण्यात येणार आहेत. या आयोजनाची विशेष बाब म्हणून त्याकरिता कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नसून प्रकरणाचा अंतिम निकाल लागतो. तडजोडपात्र प्रलंबित खटले 'राष्ट्रीय लोकअदालत'मध्ये ठेवून तडजोडीने व सामंजस्याने मिटविण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा. तसेच (दाखलपूर्व) प्रकरणांबाबत नजीकच्या संबंधित जिल्हा किंवा तालुका न्यायालय यांच्याकडे संपर्क साधावा. तसेच १४ मार्च रोजी आयोजित केलेल्या 'राष्ट्रीय लोकअदालत' समक्ष आपली प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने मिटवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावतीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर वें. यार्लगड्डा तसेच सचिव डी. एस. वमने यांनी केले आहे.

# स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्यास २० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

**अमरावती :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी शुक्रवार, दि. २० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यासाठी इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नसल्यास विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट लाभ जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. योजनेचे निकष व अटी पोर्टलवर उपलब्ध आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जाचा विहित नमुना hmas.mahait.org वर उपलब्ध आहे. परिपूर्ण कागदपत्रासह विद्यार्थ्यांनी सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामध्ये दि. १६ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज सादर करावा. तसेच यापूर्वी स्वाधार योजनेचा अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांसाठी बँक तपशिल भरण्याबाबतचा टॅब उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी बँक तपशील भरून घेण्याची कार्यवाही तातडीने करावी. अधिक माहितीसाठी सामाजिक न्याय भवन, सहायक आयुक्त, समाज कल्याण, अमरावती, तसेच speldswo_amt@r ediffmail.com व दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६१२६१ यावर संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.

# विविध राज्यस्तरीय सामाजिक पुरस्कारांसाठी प्रस्ताव आमंत्रित

## २१ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती:** महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. यामध्ये महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार आणि क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारांचा समावेश असून, इच्छुकांनी २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आपले प्रस्ताव सादर करावेत.

सर्व आवश्यक कागदपत्रे, कार्याचा सविस्तर अहवाल, शिफारस पत्रे व प्रमाणपत्रे जोडणे आवश्य, असे आवाहन सहायक संचालक सरिता बोबडे यांनी केले आहे.

या पुरस्कारांसाठी अर्जदार व्यक्ती किंवा संस्था महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अथवा अन्य क्षेत्रातील उत्थानासाठी सलग आणि उल्लेखनीय स्वरूपाचे कार्य केलेले असावे.

पुरस्कारासाठीचा अर्ज विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक आहे. अपूर्ण, चुकीची माहिती असलेले किंवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# नोंदणीकृत बांधकाम कामगारांना साहित्याचे वाटप १३ फेब्रुवारीपासून तात्पुरते स्थगित

**अमरावती:** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृत कामगारांना देण्यात येणाऱ्या गृहपयोगी वस्तू संच, सुरक्षा संच आणि अत्यावश्यक संचाचे वाटप १३ फेब्रुवारी २०२६ पासून तात्पुरते बंद करण्यात आले आहे. वाटपाच्या ठिकाणी होणारी प्रचंड गर्दी आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेता, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशानुसार आता हे वाटप तालुकानिहाय केले जाणार असल्याची माहिती कामगार उप आयुक्त कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. मंडळामार्फत साहित्याचे वाटप सुरळीत होण्यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करून वेळ दिली जाते. ज्या कामगारांनी १३ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत गृहपयोगी वस्तू संच मिळण्यासाठी नोंदणी केली होती, अशा ठिकाणी मोठ्या संख्येने कामगारांची गर्दी होऊन गोंधळ निर्माण होत आहे. यामुळे साहित्यासाठी नोंदणी केलेल्या कामगारांना वेळेत संच देणे शक्य होत नाही. या बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी येरेकर यांनी सध्याचे वाटप तात्काळ बंद करून प्रत्येक नोंदणीकृत कामगाराला त्यांच्या तालुक्याच्या ठिकाणी दररोज जास्तीत-जास्त ५०० संच वाटप करण्याचे आदेश दिले आहेत. तालुकानिहाय वाटपाच्या तारखा संबंधित कंत्राटदाराकडून कामगारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहेत. तोपर्यंत कामगारांनी वाटप केंद्रावर गर्दी करू नये आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास सहकार्य करावे, असे आवाहन कामगार उप आयुक्त, अमरावती विभाग यांनी केले आहे.



## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१०५/२०२६ ने.ता.१८.०३.२०२६

**अर्जदार -**
१. शरद अंबादास भागवत, वय ५० वर्षे, धंदा - शेती
२. रविंद्र अंबादास भागवत, वय ४८ वर्षे, धंदा - शेती
३. उमेश अंबादास भागवत, वय ४६ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा. बऱ्हाणपूर, पो.रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. सूर्यकांता रविंद्र काचरे, वय ६२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बेलोरा, पो.आलोडा. ता.वरुड, जि.अमरावती
५. सुनंदा भीमरावजी गोहत्रे, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.माधान, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
६. संगीता प्रकाशराव शेकार, वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बोराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ ते ६ यांचे वडील नामे **अंबादास बळीरामजी भागवत** हे दि.**०६.१२.२०२४** रोजी पी.डी.एम.सी.हॉस्पीटल, अमरावती, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ६ यांची आई नामे **शांता अंबादासराव भागवत** हिचा दिनांक **०५.०१.२०२५** रोजी पी.डी.एम.सी.हॉस्पीटल, अमरावती, जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक .०३.२०२६-

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६१/२०२६
**श्री.सोपान अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१८.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sopan S/o Deoraj Kalange, Age 62 Yrs. Occu.: Retired
2. Kundan S/o Sopan Kalange, Age 32 Yrs. Occu.: Pvt.Service
Appli.No.1 & 2 Both R/o Green Park Apartment Shegaon-Arjun Nagar Road, Near Water Tank, Arjun Nagar-Shivaji Nagar, Amravati.Tq.Dist.Amravati.
3. Ashish S/o Sopan Kalange, Age 45 Yrs. Occu.:Pvt.Service R/o Flat No.A-401, Bhalchandra Prospera, Survey No.95, S.B.Patil Road, Near Bhondawe Bagh, Ravet, Po.Ravet, Dist.Pune-412101

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **वर्षा सोपान काळंगे,** ही दिनांक 03.07.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सोपान अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सोपान अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अमरावती यांचे कार्यालय**
जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा (रा.मा.क्र.आर.सी-८१/बडनेरा/९८/२०२५-२६

**अर्जदार -** श्री.अमरदीप ज्ञानेश्वर गवई
रा.जुनी वस्ती माळा कॉलनी, चंद्र नगर जवळ बडनेरा ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निबंधक जन्म/मृत्यू आरोग्य विभाग**
महानगरपालिका, अमरावती, ता.जि.अमरावती

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम रहिवासी आहेत. अर्जदार श्री.अमरदीप ज्ञानेश्वर गवई, रा.जुनी वस्ती माळा कॉलनी, चंद्र नगर जवळ बडनेरा ता.जि.अमरावती यांच्या आजोबा नामे पुंडलिक मारोतराव वानखडे यांच्या मृत्यूची दिनांक ०२.१०.२०२० रोजी मृत्यू झाला. निबंधक जन्म मृत्यू विभाग महानगरपालिका, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मृत्यूची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त मृत्यूच्या प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे मृत्यूची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार जन्माच्या नोदणीचा आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार अमरावती येथील दाखल अर्जातील श्री.अमरदीप ज्ञानेश्वर गवई, रा.जुनी वस्ती माळा कॉलनी, चंद्र नगर जवळ बडनेरा ता.जि.अमरावती यांच्या आजोबा नामे पुंडलिक मारोतराव वानखडे यांच्या मृत्यूची दिनांक ०२.१०.२०२० रोजी मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्यास ता.१५.०२.२०२६ पर्यंत स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत येऊन हरकत न घेतल्यास सदरहू अर्जदार यांची साक्ष घेवून जन्म नोद सदरकार्यालयात घेण्याचा आदेश किंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

दिनांक १०.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.८३/२०२६ ने.ता.१७.०३.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.पुंडलिक यादवराव चौधरी, वय ८३ वर्षे, धंदा - शेती
रा.पुनर्वसन कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. छत्रपती यादवराव चौधरी (मयतांचे वारस)
२अ) श्री.राजेंद्र छत्रपती चौधरी, वय ५५ वर्षे, धंदा - शेती
रा.ग्रीन पार्क कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती
२ब) श्री.प्रविण छत्रपती चौधरी, वय ४९ वर्षे, धंदा - शेती
रा.दीप प्रतिष्ठान कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती
२क) सौ.संगीता चंद्रशेखर विधाते, वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे वडील तर अर्जदार नं.२(अ,ब,क) चे आजोबा नामे **यादवराव गोविंदराव चौधरी** हे दि.**२५.०४.१९८१** रोजी त्यांचे राहते घरी जिल्हा सामान्य रुग्णालय,अमरावती, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०७.०२.२०२६-

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

प्रो.क्र.१७१९२/२०२५
दिनांक २०.०९.२०२५

Appendix E, No.7
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Shubhangi Manikrao Tamgadge
24th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**NOTICE TO SHOW CAUSE WHY EXECUTION SHOULD NOT ISSUE (0.21, R.16)**

Reg.Dkst./40/2024
**Vinod Bashakmal Sawra -Vs- Yadgire Super Speciality Hospital**
NEXT DATE 27.02.2026

To,
Yadgire Super Speciality Hospital,
R/o. Vijay Colony, Congress Nagar Road, Amravati.
Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **Vinod Bashakmal Sawra** has made application to this Court for execution of decree in Suit No., on the allegation that the said decree has been transferred to him by assignment or without assignment, this is to give you notice that you are to appear before this Court **24th Jt.Civil Judge, Sr.Dn., Amravati** on the **27.02.2026**, to show cause why execution should not be granted.

Given under my hand and the seal of the Court, this 20.09.2025.

शिक्का

**24th Jt.Civil Judge, Sr.Dn., Amravati**

---

प्रो.नं.४७६/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१२.०२.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./६९/२०२६ दिनांक १७.०३.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. राधेशाम राममुर्ती बरडे, वय ६५ वर्षे, धंदा - शेती
रा.विदर्भ मिल कॉलनी, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती
२. अशोक राममुर्ती बरडे, वय ५३ वर्षे, धंदा - शेती
३. मनोज राममुर्ती बरडे, वय ५० वर्षे, धंदा - शेती
अ.नं.२ व ३ रा.माहुली धांडे, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. रेखा राधेशाम वरधैया, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.कोंढाळी, ता.काटोल, जि.नागपूर

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **राममुर्ती शिवचरण बरडे** हे दिनांक **०९.०१.२०२६** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम ३७२ भारतीय वारसा हक्क कायद्याप्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **राममुर्ती शिवचरण बरडे** यांनी त्यांचे जीवंतपणी दि.अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक मर्या., अमरावती शाखा दर्यापूर येथे बचत खाते उघडले होते. त्याचा त्यांचा खाते नं.०३१००६२०००२०२२१ असून त्या खात्यात त्यांचे नांवे रक्कम रु.२०७९४०.३८ ईतकी रक्कम जमा आहे.

आज दि.१२.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७९/२०२६
**वृषाली व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१७.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Vrushali Vinayak Mandilik
Age 71 Yrs. Occu.: Retired
R/o W/o Vinayak Mandilik Mardi Road, Ambika Nagar, Near Gajanan Mandir Camp, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विनायक दत्तात्रय मंडलिक,** ही दिनांक 25.02.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वृषाली विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वृषाली विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 07/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **मुहम्मदीया एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर ट्रस्ट, अमरावती, ता. जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **अजिज बेग युसूफ बेग**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**
(अ) **जंगम मिळकत -** रोख रु.५०००/- मात्र
(अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०९.०२.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

प्रो.नं.४७५/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१२.०२.२०२६

वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./७०/२०२६ दिनांक १८.०३.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. गोपाबाई कृष्णराव भटकर, वय ८२ वर्षे, धंदा - काही नाही
२. निर्मला मनोहरराव इंगळे, वय ६१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.टोपे नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. सुभाष कृष्णराव भटकर, वय ६१ वर्षे, धंदा - मजुरी
४. संतोष कृष्णराव भटकर, वय ५४ वर्षे, धंदा - मजुरी
अ.नं.३ व ४ रा.राजेंद्र नगर, रुक्मिणी नगर अमरावता
५. अनिता दासदाराव तानोळकर, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बुधागड, ता.भातकुली, जि.अमरावती
६. प्रमोद कृष्णराव भटकर, वय ५० वर्षे, धंदा - शेती
अ.नं.१ व ६ रा.खोलापूर, ता.भातकुली, जि.अमरावती
७. वंदना राजू तेलगोटे, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.राऊत बेकरीजवळ, नारायण पार्क, मंजारी बु., ता.जि.पुणे

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **कृष्णराव नारायणराव भटकर** हे दिनांक **११.०८.२०२४** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम ३७२ भारतीय वारसा हक्क कायद्याप्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **कृष्णराव नारायणराव भटकर** यांच्या नावे (अ) मौजा माटरगांव, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट नं.१६१, यात मृतकाचे क्षेत्र ० हे.४० आर, आ.रु.२.०८ पैसे, भो.वर्ग-१ (ब) मौजा माटरगांव, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट नं.१६२ क्षेत्र १ हे.१९ आर. आ.रु.६.५० पैसे, भो.वर्ग-१ अशा वर्णनाची शेतजमीन असून शेताची अंदाजे किंमत रु.२०,०००/- एवढी आहे.

आज दि.१२.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५६/२०२६ ने.ता.१३.०३.२०२६

**अर्जदार :** १. जनार्धन लक्ष्मण कंटाळे
वय ७० धंदा - मजुरी
रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. अर्जदाराचे वडील नामे **लक्ष्मण श्रावण कंटाळे**, रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवाशी होते. त्यांचा मृत्यू दिनांक **१६.०३.२०१५** रोजी राहते घरी ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.०२.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१८/२०२६ ने.ता.२०.०२.२०२६

**अर्जदार :**
१. श्रीमती चंद्रकला श्रीकृष्ण हिवसे, वय ८६ धंदा - घरकाम
२. विनोद श्रीकृष्ण हिवसे, वय ६७ धंदा - मजुरी
३. अशोक श्रीकृष्ण हिवसे, वय ६१ धंदा - मजुरी
४. प्रमोद श्रीकृष्ण हिवसे, वय ६१ धंदा - मजुरी
५. दिलीप श्रीकृष्ण हिवसे, वय ५९ धंदा - मजुरी
अर्जदार नं.१ ते ३ व ५ रा.जालनापूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.४ रा.आझाद चौक, भिवापूर, ता.भिवापूर, जि.नागपूर

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक श्रीकृष्ण सूर्यभानजी हिवसे** यांचा मृत्यू दिनांक **१३.०९.२०२५** रोजी जालनापूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१९.०१.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १५८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## विद्यार्थांना संस्कारांचे धडे देणाऱ्या प्राध्यापकाचा

# शिवीगाळचा 'तो' व्हिडिओ व्हायरल; सारडा महाविद्यालयाची अब्रू वेशीवर

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयात प्राचार्य आणि प्राध्यापकांमध्ये वाद एवढा टोकाला गेला की, त्याचे रूपांतर एकमेकांच्या अंगावर जाऊन अश्लिल भाषेत शिवीगाळ करण्यात आली. विशेष म्हणजे प्राध्यापकांनी या घटनेचे व्हिडिओ शूट करून सोशल मीडियावर व्हायरल केले आहेत. तर कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज प्राचार्य यांच्या आदेशानुसार व्हायरल करण्यात आले असल्याचे समजते. शाळा-महाविद्यालयांमध्ये अनेकदा विद्यार्थांच्या कृत्यामुळे संस्थेची अब्रू धोक्यात येते. मात्र आता प्राध्यापकही यामध्ये मागे राहिलेले नाहीत.

अंजनगाव सुर्जी येथिल श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयात प्राचार्य आणि प्राध्यापकांमध्ये वाद एवढा टोकाला गेला की, एकमेकांना अंगावर जाऊन परस्पर दोन्ही कडील बोलण्याचा संयम सुटला असून शिवीगाळ करण्यात आली. याबाबत प्राचार्य यांनी चार प्राध्यापकांची पोलीसात तक्रार दाखल केली तर प्राध्यापक यांनी प्राचार्य यांची तक्रार दाखल केली. प्राचार्य यांच्या कॅबिनमध्ये वाद होत असताना प्राचार्य आणि प्राध्यापकांचा बोलण्याचा संयम सुटला आणि अश्लिल भाषेतील शिवीगाळ केली. प्राचार्य आणि प्राध्यापकांमध्ये वाद होत असताना



इतर काही प्राध्यापक एकमेकांना समजून सांगण्याचा प्रयत्न करीत असल्याचे व्हिडिओत दिसून येत आहे. विशेष म्हणजे एका प्राध्यापकांनी या घटनेचे व्हिडिओ शूट करून सोशल मीडियावर व्हायरल केले आहेत.

या अश्लिल भाषेतील शिवीगाळीमुळे सारडा महाविद्यालयाची आणि संपुर्ण अंजनगाव तालुक्यांची अब्रू वेशीवर टांगली गेली आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात मोठी चर्चा रंगली असून अशा प्रकारामुळे प्राचार्य ,प्राध्यापकांची प्रतिमा मलीन होत असल्याचे बोलले जात आहे.श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ वैशिष्ट्य चौबे हे वयोमानानुसार ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त झाले. प्राचार्य डॉ वैशिष्ट्य चौबे यांच्या म्हणण्यानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर शिक्षण विभागाच्या नियमानुसार सारडा एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या वतीने त्यांना काही दिवसासाठी पदभार देण्यात आला आहे. महाविद्यालयातील काही प्राध्यापक उशिरा आल्यामुळे हा वाद झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आला. तर प्राध्यापक यांच्या म्हणण्यानुसार प्राचार्य यांचे पद रिक्त झाले आहे. त्यामुळे प्राचार्य यांना बोलण्याचा अधिकार नाही असे प्राध्यापकांनी तक्रारीत नमूद केले आहे.महाविद्यालयातील या शिवीगाळ घटनेमुळे महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण मात्र या कलहाने गढूळ झाले आहे. तर संस्थेची प्रतिमा खालावली असून शिक्षण प्रेमी या घटनेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. या गोंधळामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार का अशी चिंता पालक व्यक्त करीत आहेत.

# शेतकऱ्यांचे बँक खाते होल्ड

## भाजप किसान मोर्चाचे पदाधिकारी धडकताच,खाते सुरू

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

बँक ऑफ इंडिया चांदूरबाजार शाखेने अनेक शेतकऱ्यांचे खाते होल्ड केले होती. याबाबतच्या तक्रारी भाजपा किसान मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांना मिळताच त्यांनी बँक ऑफ इंडिया च्या चांदूरबाजार शाखा कार्यालयावर धडक देताच येथील कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांची होल्ड केली खाते पुन्हा सुरू केली.

बँक ऑफ इंडिया चांदूरबाजार शाखेने येथील अनेक शेतकऱ्यांचे खाते होल्ड केले होती. तसेच विम्याचे आलेल्या पैशांची बँकेने बचत खात्यामधून कर्जात कपात केली होती. अशा अनेक प्रकारच्या तक्रारी भाजपा किसान मोर्चाचे पदाधिकारी जिल्हाध्यक्ष माधव अवघड यांना मिळालेल्या



होत्या. त्यानुसार १०फेब्रुवारी रोजी भाजपा किसान मोर्चा जिल्हा मेळघाट अमरावती ग्रामीण च्या वतीने बँक ऑफ इंडिया शाखा चांदूरबाजार येथे किसान मोर्चाने आंदोलन केले. या दरम्यान बँकेच्या व्यवस्थापकाशी आणि तेथील कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. वरिष्ठांशी चर्चा करून सर्व शेतकऱ्यांचे होल्ड काढण्यात आले. तसेच ज्यांचे पिक विम्याचे पैसे कपात केले गेले होते त्यांचे पैसे पूर्णपणे त्यांच्या बचत खात्यात जमा करण्यात आले. यामुळे शेतकरी वर्गामध्ये आनंद व्यक्त करण्यात आला. भाजपा किसान मोर्चाच्या आंदोलनामुळे खात्यातील कपात केलेले पैसे मिळाले तसेच बँक खाते पुन्हा सुरू करण्यात आले असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.यावेळी भाजपा किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष माधव अवघड, जिल्हा सरचिटणीस आशिष मेहत्रे, जिल्हा संपर्कप्रमुख अमोल देवतोंडे, जिल्हा सचिव विशाल लकडे, विकी राठी, पंकज नागापुरे, राजू पुसे, चंद्रशेखर ढगे, राजेश बोबडे, नितीन डवंगे व अनेक शेतकरी उपस्थित होते.

## संक्षिप्त



**अमरावती-** नगरसेविका सोनाली सचिन नाईक यांच्यातर्फे श्रीचंद तेजवानी महापौर यांच्या कार्यालय विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देण्यात आली. यावेळी सचिन नाईक, राजू तायडे, प्रमोद बोधळे, तुषार खिराडे, अनिकेत तायडे, विशाल जाधव उपस्थित होते.



### मुद्रांक विभागाच्या वतीने जनसंवाद

**मोर्शी-** महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुद्रांक विभागाला केलेल्या सूचनाच्या अनुषंगाने जनसंवाद व जनता दरबाराचे आयोजन मोर्शी सहाय्यक दुय्यम निबंधक ( मुद्रांक ) कार्यालयाच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर तर प्रमुख अतिथी म्हणून मोर्शी नगरीच्या नगराध्यक्षा प्रतिक्षा गुल्हाने व उपाध्यक्ष डॉ. प्रदीप कुऱ्हाडे, मोर्शी येथील सह. दुय्यम निबंधक मुद्रांक शैलेश माहूरे,नगरसेवक भूषण कोकाटे, हर्षल चौधरी, आनंद सदापुरे तथा माजी जिल्हा परिषद सदस्य संजय घुलक्षे व बंडू साउत प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा आयोजकाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला होता. राज्य सरकारने बहु प्रतीक्षेत तुकडेबंदी करण्याचा महत्त्वकांक्षी निर्णय घेतल्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले अनधिकृत अकृषक वापरण्यात आलेले शेतीचे तुकडे या अभियानांतर्गत नियमित केले जाणार आहे. जन संवाद व जनता दरबार कार्यक्रमात अनेकांचे प्रकरणी तात्काळ निकाली काढण्यात आले होते. या सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सारिका भेंडे हिने केले.

## एआयसीटीई-एडुस्किल्स इंटर्नशिपमध्ये

# पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचा देशात दुसरा क्रमांक

## १४व्या कोहोर्टच्या राष्ट्रीय सर्वेक्षणात महाविद्यालयाचा गौरव

**अमरावती/का.प्र.**

मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, नॅशनल इंटर्नशिप पोर्टल आणि एडुस्किल्स यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या एआयसीटीई-एडुस्किल्स व्हर्च्युअल इंटर्नशिपच्या १४ व्या कोहार्ट (ऑक्टोबर २०२५ ते डिसेंबर २०२५) दरम्यान घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी, सादरीकरण तसेच मूल्यमापन व प्रमाणपत्रच्या राष्ट्रीय सर्वेक्षणात पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती यांनी भारतातील टॉप १० परफॉर्मिंग इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या कामगिरीमुळे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीला व विद्यार्थ्यांच्या कौशल्याधारित शिक्षणाला राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. या अभियांत्रिकी प्रभागामध्ये सर्वोच्च



स्थान प्राप्त करणारे महाराष्ट्रातील पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय एकमेव आहे. या यशामुळे अमरावती जिल्ह्याचे शैक्षणिक क्षेत्रात नाव उज्ज्वल झाले असून संस्थेच्या गुणवत्तेची आणखी एक राष्ट्रीय पातळीवर नोंद झाली आहे.

एआयसीटीई-एडुस्किल्स व्हर्च्युअल इंटर्नशिप उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, क्लाउड कम्प्युटिंग, मशीन लर्निंग, ब्लॉकचेन, रोबोटिक्स अशा अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये उद्योगाभिमुख प्रशिक्षण देण्यात आले. या कालावधीत विद्यार्थ्यांच्या सहभागाची संख्या, प्रोजेक्ट पूर्णत्वाचे प्रमाण, उद्योगतज्ज्ञांकडून मिळालेला अभिप्राय, नवोपक्रमशील प्रकल्प सादरीकरणे व एकूण कामगिरी या निकषांवर देशभरातील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले.

या सर्व निकषांमध्ये पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्रातून प्रथम व भारतामधून द्वितीय स्थान पटकावले. संस्थेचे प्राचार्य डॉ पी. एम. जावंधिया यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, 'विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता उद्योगसुसंगत कौशल्ये विकसित करणे हे आमचे ध्येय आहे.संस्थेतील रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेलनेही विद्यार्थ्यांना नवोन्मेषी प्रकल्प विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यात अधिकाधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांमध्ये सहभाग घेण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी व्यक्त केला आहे.संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच संचालक डॉ. पी. एम. खोडके यांनी विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकांचे व इंटर्नशिप विभागाचे अभिनंदन करून भविष्यातही अशाच प्रकारे गुणवत्तापूर्ण शिक्षण व कौशल्यविकास उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.या यशामुळे पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती हे नाव राष्ट्रीय शैक्षणिक नकाशावर अधिक ठळकपणे अधोरेखित झाले आहे.

# ज्ञान विज्ञान महोत्सव पुरोगामी विद्यालय येथे आयोजन



**अमरावती-** दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा आसरा शाळेच्या प्रांगणात या विज्ञान महोत्सवचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, त्यांना विज्ञानाची आवड निर्माण व्हावी, सभोवतालच्या पर्यावरणीय घटना बद्दल जाणिव व्हावी,या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे उद्घाटन शैलेशभाऊ मोहोड यांनी केले.

प्रदर्शन मध्ये पर्यावरण शिक्षण व हरित यावर आधारित प्रयोगासहित, पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चर्चा, करण्यात आली. या वर्षी सुद्धा प्रदर्शनात'विज्ञान केन्द्र नागपूर' या संस्थेचे फिरते विज्ञान प्रदर्शन ची बस दोन दिवस शाळेच्या प्रांगणात थाटात उभी होती. या प्रदर्शनात शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अतिशय चांगल्या प्रकारे सादरीकरण केले तालुक्यातील अनेक शाळातील शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांसहित प्रदर्शनास भेट दिली व प्रयोगाच्या माहिती सहित आनंद लुटला, अतिशय सुंदर प्रतिक्रिया विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांनी दिल्या. यावेळी केन्द्र प्रमुख शैलेंद्र दहातोंडे, निपुण मार्गदर्शक बनसोड,अवघड या अधिकार्यासहित मुख्याध्यापक मोहोड, तालुक्यातील अनेक शिक्षक उपस्थित होते.या करिता शाळेच्या मुख्याध्यापिका विल्हेकर, बोबडे, राठोड, गांजरे,उईके व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


## मनपाच्या १३ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये 'महात्मा फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' लागू

# नागरिकांना शहरातच मिळणार ५ लाखांपर्यंत मोफत उपचार

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या अध्यक्षतेखाली आज आयोजित महत्त्वपूर्ण सभेमध्ये अमरावतीकरांसाठी अत्यंत दिलासादायक निर्णय घेण्यात आला. महानगरपालिकेद्वारे संचालित सर्व १३ शहरी आरोग्य केंद्रांना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत अंगीकृत करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांना आता महागडे उपचार मिळवण्यासाठी दूरच्या रुग्णालयात जाण्याची गरज भासणार नाही, तर शहरी आरोग्य केंद्रांमधूनच योजनांचा थेट लाभ घेता येणार आहे.

या दोन्ही योजनांच्या माध्यमातून एकूण २३९९ आजारांवर पूर्णपणे मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. या आरोग्य विमा योजनेअंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष एकत्रित ५ लाख रुपयांपर्यंतचा उपचार खर्च शासनाकडून केला जातो. त्यामुळे आर्थिक दुर्बल घटकांतील कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे.प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांकडे को-ब्रँडेड 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना गोल्डन कार्ड' असणे बंधनकारक आहे. हे कार्ड नसल्यास योजनेचा लाभ मिळू शकणार नाही. त्यामुळे ज्या नागरिकांकडे अद्याप गोल्डन कार्ड उपलब्ध नाही, त्यांनी तात्काळ




आपल्या जवळच्या शासकीय दवाखान्यात संपर्क साधून कार्ड तयार करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गोल्डन कार्ड तयार करताना E-KYC प्रक्रिया आवश्यक आहे. त्यासाठी नागरिकांचे राशन कार्ड अद्ययावत व E-KYC झालेले असणे गरजेचे आहे. तसेच आधार कार्ड अपडेट असणे आणि आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक सोबत असणे आवश्यक आहे. मोबाईलवर येणाऱ्या ओटीपीद्वारे E-KYC प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनच दवाखान्यात जावे, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.सभेमध्ये ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'वयवंदना योजना' अंतर्गत स्वतंत्र लाभाची माहितीही देण्यात आली. या योजनेअंतर्गत ७० वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्रपणे ५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा लाभ उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, वयवंदना कार्ड तयार करण्यासाठी संबंधित व्यक्तीचे फक्त आधार कार्ड आवश्यक आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनीही या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. अमरावती महानगरपालिकेच्या १३ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये या योजना लागू झाल्याने शहरातील प्राथमिक व दुय्यम आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार आहेत.

नागरिकांना त्वरित उपचार, आर्थिक संरक्षण आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असल्याचे मत सभेत व्यक्त करण्यात आले. तसेच योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.या सभेला १३ शहरी आरोग्य केंद्रांतील सर्व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजना जिल्हा समन्वयक डॉ. अंकिता मटाले, डॉ. अविनाश मरकड, विभागीय समन्वयक, माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती कोवे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप पाठबागे यांनीही उपस्थित राहून योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.आरोग्य विभागामार्फत सर्व पात्र नागरिकांनी त्वरित आपले गोल्डन कार्ड व वयवंदना कार्ड तयार करून घ्यावे, तसेच आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले. या निर्णयामुळे अमरावती शहरातील हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून शासकीय आरोग्य योजनांचा लाभ आता अधिक सुलभ, पारदर्शक आणि सर्वसमावेशक पद्धतीने उपलब्ध होणार आहे.

## निधन

### रमेशराव पोकळे



**अंजनगाव बारी-** येथील समाजाचे सामाजिक कार्यकर्ते तसेच श्रीकृष्ण लीला उत्सव मंडळाचे माजी सदस्य रमेशराव मारोतराव पोकळे (६२) व्या वर्षी अल्प आजाराने दि. ७ रोजी सकाळी ११ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्यावर अंजनगाव बारी येथील हिंदू स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात तीन मुले, एक भाऊ व नातूपंतू असा बराचसा आप्त परिवार आहे.

### सुमन काळमेघ



**तिवसा-** येथील श्री समर्थ सोटागीर महाराज संस्थानचे अध्यक्ष अनिल काळमेघ यांच्या मातोश्री सुमन शालिकराम काळमेघ (वय ७६ वर्षे) यांचे १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मृत्यूपश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.

# दिव्या अहीरला 'ज्युनिअर सायंटिस्ट अवॉर्ड'मध्ये प्रथम क्रमांक

**बडनेरा-** येथील एइए स्कूल ची विद्यार्थिनी दिव्या अहीर हिने प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च द्वारे आयोजित 'एस्पेरांझा-२०२६' अंतर्गत ज्युनिअर सायंटिस्ट अवॉर्ड स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धेत 'AI for AI' या संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांनी आपले नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले होते.दिव्या अहीर हिने सादर केलेल्या 'AI आधारित ग्रीन एनर्जी ऑब्झर्व्हेशन सिस्टम' या प्रकल्पाचे परीक्षकांनी विशेष कौतुक केले. या गौरवशाली यशाबद्दल तिला



बक्षीस म्हणून एचपी कंपनीचा लॅपटॉप प्रदान करण्यात आला. दिव्याच्या नावे एक पेटेंट असून तिने यापूर्वीही अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत. विज्ञानाप्रती असलेली तिची ओढ तिच्या 'दिव्या एज्युकेशनल ग्रुप अमरावती' या यूट्यूब चॅनेलवरूनही दिसून येते, ज्याद्वारे ती विज्ञानातील नवनवीन प्रयोग लोकांपर्यंत पोहोचवते.दिव्याने आपल्या या यशाचे श्रेय एसएफएस स्कूलचे प्राचार्य फादर नोबिट, शिक्षिका रोशनी, देवांगना, सविता, सारिका, कल्पना, स्टीवन, सुमित, पूनम, शुभम, प्रज्ञा, सिस्टर रिबेका, लीना, अपर्णा आणि आपल्या पालकांना दिले आहे. दिव्याच्या या यशाबद्दल तिची आई डॉ. मंजू, पिता वसंत अहीर, आत्या शोभा, मोठे बाबा राजकिशोर अहीर आणि आजी यांनी अभिमान व्यक्त केला आहे. दिव्याच्या या उत्तुंग यशामुळे संपूर्ण परिसरात तिचे कौतुक होत आहे.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **सौ. नीता अजय खाडेकर** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णनः** मौजे- पेठ अमरावती, प्रगणे-बडनेरा, नझुल शिट क्रं. ४८-D, नझुल प्लॉट क्रं. १३, ग्राउंड फ्लोवर वरील दुकान क्रं. ८ कावेरी कॉम्प्लेक्स, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **सौ. नीता अजय खाडेकर** हे **विमल पांडुरंग मोरे** यांच्या कडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तसेच **विमल पांडुरंग मोरे** यांना सदर मालमत्ता हि **श्री. पांडुरंग कृष्णराव मोरे** यांचा ०७/०८/२०२५ रोजी मृत्यू झाल्यानंतर वारसाने व अनोंदणीकृत मृत्यूपत्र २५/०३/२०१४ नुसार **विमल पांडुरंग मोरे** यांच्या नावे झाली. तद्नंतर **सौ. नीता अजय खाडेकर** यांनी Piramal Finance ltd. येथे गृह कर्जासाठी अर्ज केलेला आहे, तसेच सदर मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही आणि सदर खरेदी खत ठरल्याप्रमाणे नोंदणीकृत करून Piramal Finance ltd. **येथे सदर मालमत्ता गहान करण्यात येईल** करिता हि जाहीर नोटीस देत आहे.

शिक्का

**ॲड. रवींद्र रू. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. ९८२३६९८७४५

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार **श्री. आकाश लक्ष्मणराव देशमुख,** रा. न्यू छांगाणी नगर, अमरावती, ता. जि. अमरावती यांनी मला दिलेल्या माहीती व अधिकारावरुन सर्वांना या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **श्रीमती इंद्रकला फुलसिंग राठोड,** रा. लालखेड, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती यांचेसोबत यांचे मौजा लालखेड, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती येथील भूमापन व उपविभाग क्र. २९/१, भोगवटदार वर्ग २, खाते क्र. ४८, मधील एकूण क्षेत्र १.०५ हे.आर + पोटखराब ०.१० हे. आर असे एकूण १.१५ हे.आर. आकार रु. ०.७१ पै. यात असलेल्या झाडाझुडूपासह व खोडाबागासह ज्याच्या चतुःसिमा पुर्वेस श्री. आनंदराव दादु राठोड यांचे शेत, पश्चिमेस सरकारी रस्ता, उत्तरेस फॉरेस्ट बंदी व दक्षिणेस विमला धारुसिंग जाधव यांचे शेत आहे. सदर शेत हे माझ्या पक्षकाराने श्रीमती इंद्रकला फुलसिंग राठोड यांचेकडून खरेदी करण्याचा सौदा स्थावर मालाची इसारचिठ्ठी दिनांक १८/०२/२०२५ रोजी केली असुन कराराप्रमाणे श्रीमती इंद्रकला फुलसिंग राठोड यांनी माझे पक्षकाराकडून इसाराची रक्कम ४,२५,०००/- रुपये स्विकारले आहे. परंतु श्रीमती इंद्रकला फुलसिंग राठोड यांनी खरेदीखत करुन दिले नसल्यामुळे माझे पक्षकाराने विद्यमान दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर), अमरावती येथे दिवाणी विशेष दावा क्रमांक ३५७/२०२५ (आकाश ल. देशमुख - वि- श्रीमती इंद्रकला फुलसिंग राठोड) यांचेविरुध्द दावा इसारचिठ्ठीवरुन शेताचे खरेदीखत करुन मिळण्याकरीता, ताब्याकरीता व कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळण्याकरीता दावा दाखल केला असुन तो न्यायप्रविष्ठ आहे. श्रीमती इंद्रकला फुलसिंग राठोड ह्या वरील नमुद शेत, दावा न्याप्रविष्ठ असतांना विकण्याच्या बेतात आहेत. तरी या नोटीसव्दारे सर्वांना सुचित करण्यात येते की, वरील शेत मालमत्तेचा श्रीमती इंद्रकला फुलसिंग राठोड यांचेसोबत कोणीही कोणासोबतही खरेदी-विक्रीचा किंवा कोणत्याहीप्रकारे हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. व्यवहार केल्यास तो गैरकायदेशीर ठरेल व तो माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व तो गैरकायदेशीर व अवैध ठरेल व माझे पक्षकार संबधीतांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करतील यांची नोंद घ्यावी.
ठिकाण- अमरावती.
दिनांक - /०२/२०२६

**श्री. आकाश लक्ष्मणराव देशमुख यांचेतर्फे**
अधिवक्ता (जी.एस. तांबटकर), खंडेलवाल कॉम्पलेक्स सुंदरलाल चौक, अमरावती,
मो. नं. ९४२२८५५३४८, ९०७५२७५४२०

# पैशासाठी युवकाची हत्या करून जाळला मृतदेह

## शाहनुर गावाजवळ आढळला होता मृतदेह





### अल्पवयीनसह सात आरोपी जेरबंद

**पथ्रोट/प्रतिनिधी:** शाहनुर गावाजवळ कॅनल मध्ये अर्धवट जळालेला मृतदेह आढळला होता. गुन्हे शाखेच्या पथकाने या प्रकरणात यशस्वी तपास करत २४ तासाच्या आत अल्पवयीन सह सात आरोपींना ताब्यात घेतले. पैशासाठी युवकाची हत्या करून पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. अटक आरोपीं मध्ये टीकेश प्रशांत महाजन (२८,गणपती वार्ड,आर्वी ), प्रशांत हरिचंद्र महाजन (५९, गणपती वार्ड,आर्वी), शुभम मोहनलाल राय (२८,बुधवारा, अंजनगाव सुर्जी),अली अजगर सब्दर हुसेन (२८,जाजूवाडी आर्वी ),हर्षित प्रकाश गौर (१९, भोईपुरा ,बुधवारा, अंजनगाव सुर्जी), निखिल दीपचंद गौर (३२, भोईपुरा बुधवार अंजनगाव सुर्जी) व एक अल्पवयीनचा समावेश आहे. बुधवारी रवींद्र शिंपी यांनी पोलिसात तक्रार दिली होती. सकाळी ९ वाजता पोलीस पाटील सुभाष काकडे यांनी माहिती दिली की, वाघडोह ते खोडगाव मार्गा वर मारुती जहानपूर शेत शिवारात एका अनोळखी इसमाचे प्रेत अर्धवट जळलेल्या अवस्थेत मिळाले आहे. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. कैनल जवळील कच्च्या रोडवर चार चाकी वाहनाच्या टायरचे निशाण दिसून आले. आजूबाजूला सदर ☞(पान २ वर)

# मेळघाटच्या विकासासाठी आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकरणावर भर



जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**अमरावती/प्रतिनिधी:** मेळघाट परिक्रमासाठी सेवा देणाऱ्या खाजगी दवाखान्यातील डॉक्टर्संना रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक औषधसाठा, वाहन सुविधा तसेच त्यांच्या राहण्याची सुविधा जिल्हा प्रशासनातर्फे पुरविण्यात येईल. मेळघाटच्या विकासासाठी येथील आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकरणावर विशेष भर देणार, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज येथे केले.

महसूल भवन येथे जिल्हाधिकारी येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विषयाची आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य डॉ. विभावरी दाणी, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे तसेच संबंधित विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

मेळघाट परिक्रमाउपक्रमातंर्गत माहिती, शिक्षण आणि संप्रेषण अभियान राबविण्यासाठी शिवाजी सायन्स कॉलेजचा सहभाग राहील. या महाविद्यालयाचे विद्यार्थी मेळघाटमध्ये कोरकू भाषेतून पथनाट्य, कोरकू बांधवांना समजेल अशा भाषेत संवादसत्र असे विविध उपक्रम राबवून आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करणार आहेत. अन्य महाविद्यालयांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन येरेकर यांनी यावेळी केले.

मेळघाटमधील प्रामुख्याने होणारे कुटकी, सावा या मिलेट्स फूड्सबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रम राबवावा. ☞(पान २ वर)

# अमरावतीत आधुनिक फिशरीज हब उभारणीसाठी प्रशासन सज्ज

### प्रकल्पासाठी पाहणी दौरा; तांत्रिक मार्गदर्शन, नियोजनावर चर्चा

**अमरावती/प्रतिनिधी:**

अमरावती येथे प्रस्तावित फिशरीज हब प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी दौरा आयोजित करण्यात आला. या दौऱ्यानंतर प्रकल्पाच्या विविध तांत्रिक, प्रशासकीय व व्यवस्थापन विषयक बाबींचा सखोल आढावा घेण्यासाठी विस्तृत बैठक आयोजित करण्यात आली.



सदर पाहणीदरम्यान प्रकल्पासाठी निवडलेल्या जागेची सद्यस्थिती, उपलब्ध पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा व्यवस्था, वीजपुरवठा, साठवण क्षमता, वाहतूक सुलभता तसेच भविष्यातील विस्ताराची शक्यता आदी मुद्द्यांचा बारकाईने अभ्यास करण्यात आला. तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून तांत्रिक मार्गदर्शन घेऊन प्रकल्प कार्यान्वयनाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी कशी करावी, याबाबत दिशा निश्चित करण्यात आली.

बैठकीत अमरावतीसह संबंधित जिल्ह्यांतील मत्स्य उत्पादन क्षमता, उपलब्ध जलस्त्रोत, ☞(पान २ वर)

# ट्रकच्या धडकेत सरपंच प्रशांत हुडे ठार

## तिवसा - कुऱ्हा मार्गावर अपघात मुलीला सेंटरवर सोडून येताना काळाचा घात

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधी:** कुऱ्हा- तिवसा रोडवर कौंडण्यपूर वाय पॉईंट वर आज गुरुवार १२ फेब्रुवारी रोजी दुपारी झालेल्या भीषण अपघातात धामणगाव बाजार समितीचे संचालक आणि वाढोणा गावाचे सरपंच प्रशांत हुडे? (४०) यांचा जागीच मृत्यू झाला तर प्रितेश काळे (वाढोणा) जखमी आहे. त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालय येथे उपचार सुरू आहे.





अपघात इतका भीषण होता की दुचाकीचा चुराडा झाला. दुचाकीला धडक दिल्यानंतर ट्रक चालक फरार झाला. माहितीनुसार सरपंच प्रशांत हुडे यांच्या मुलीचा बारावीचा पेपर होता. मुलीला सेंटरवर सोडून ते परत गावी येत होते. मधातच त्यांना प्रशांत काळे मिळाले, दोघे एकाच दुचाकीने येत असताना कुऱ्हा-तिवसा रोडवर कौंडण्यपूर वाय टी पॉईंट वर दुपारच्या सुमारास मालवाहतूक करणाऱ्या ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरून दोघे जण रस्त्यावर फेकले गेले. दोघांच्याही डोक्याला गंभीर दुखापत झाली. जास्त रक्तस्त्राव झाल्यामुळे प्रशांत हुडे यांनी जागेवरच ☞(पान २ वर)

# 'वरली-मटका' अड्ड्यावर छापा

## पाच जण ताब्यात, गुन्हे शाखेची शहरात तीन ठिकाणी कारवाई

**अमरावती/प्रतिनिधी:** शहरात अवैध वरली मटका पुन्हा डोके वर काढत असतानाच गुन्हे शाखेने बुधवारी (दि. ११) एकाच दिवशी तीन ठिकाणी समन्वित कारवाई करत मटका अड्ड्यांवर घाला घातला. गाडगे नगर आणि फ्रेजरपुरा हद्दीत टाकलेल्या या छाप्यांत पाच जणांना ताब्यात घेण्यात आले असून २३ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एक आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या निर्देशानुसार शहरातील



अवैध धंद्यांवर नियंत्रण आणण्यासाठी गुन्हे शाखा सक्रिय झाली आहे. गुप्त माहितीच्या आधारे प्रथम गाडगे नगर हद्दीतील लुबिनी नगर, तपोवन येथे छापा टाकण्यात आला. येथे अमर विजय गुडथे (४०) याच्याकडून १९ हजार १० रुपयांचे जुगार साहित्य व रोख रक्कम जप्त करण्यात आली. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. याच हद्दीत नवसारी, महात्मा फुले नगर परिसरात दुसरी कारवाई करत कैलास भाऊराव कोकणे (४८) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून १ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, फ्रेजरपुरा ☞(पान २ वर)

# भरधाव ट्रकच्या धडकेत २४ वर्षीय तरुण ठार

**अमरावती/प्रतिनिधी:** शहरातील जमील कॉलनी चौक पुन्हा एकदा अपघाताने हादरला. गुरुवारी दुपारी भरधाव ट्रकने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणाव व वाहतूक कोंडी निर्माण झाली.



मृत तरुणाचे नाव मोहम्मद जिशान मोहम्मद जाकीर (रा. परफेक्ट धर्मकाटा, शरीफा मस्जिद परिसर) असे असून तो दुचाकी ☞(पान २ वर)

# कोणार्क कंपनीला कचरा उचलण्याचे आदेश



**अमरावती/प्रतिनिधी:** कृष्ण नगर परिसरात स्वच्छता मोहिमेला गती देण्यात आली असून ११ फेब्रुवारी २०२६ रोजी नगरसेवक मनिष बजाज यांच्या मार्गदर्शनाखाली व सहायक आयुक्त नंदकिशोर तिखिले यांच्या उपस्थितीत विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. १ ते ७ फेब्रुवारी दरम्यान कृष्ण नगर गल्ली क्रमांक १ ते ५ मधील अतिरिक्त कामगारांच्या☞(पान २ वर)

## राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयाचे स्थलांतरण


**अमरावती :** राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, विभाग अमरावती या कार्यालयाचे स्थलांतरण झाले आहे.

या कार्यालयाचा नवीन पत्ता- ''राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, जुना बायपास रोड, कॅम्प, अमरावती ४४४६०२'' याप्रमाणे राहील. सदर कार्यालयाच्या पत्त्यात बदल झाल्याची नोंद नागरिकांनी घ्यावी, असे उपसचिव देवेंद्र चव्हाण यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# स्पीड ब्रेकरवरून सुरु झालेल्या वादातून तरुणाची हत्या

### तिघे जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधी:** केवळ वाहनाचा 'कट' लागल्याच्या किरकोळ कारणावरून पेटलेला वाद एका तरुणाच्या जीवावर बेतला. नांदगावपेठ येथील एसटी बसस्थानकाजवळ बुधवारी (दि. ११) रात्री सुमारे १० वाजता झालेल्या या थरारक घटनेत गौरव सुधाकर घोटेकर (२४) याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा भाऊ सौरभ घोटेकर (३०) गंभीर जखमी झाला आहे. पोलिसांनी तीन आरोपींना तात्काळ अटक केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गौरव व सौरभ हे दोघे भाऊ मूळचे अंजनगाव सुर्जी येथील असून सध्या नांदगावपेठ येथे भाड्याच्या खोलीत राहत होते. बुधवारी रात्री मेसमधून जेवण करून दुचाकीने परतत असताना बसस्थानकाजवळील स्पीड ब्रेकरवर मागून आलेल्या दुचाकीचा कट लागला. या क्षुल्लक कारणावरून दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक वाद सुरू झाला. क्षणातच वादाने हिंसक वळण घेतले. आदेश रघुनाथ तेलमारे (२५), दीप उर्फ यशोदीप विनायक वेलकर (२५) आणि रोहित संजय तायडे (२३, तिघेही रा. ☞(पान २ वर)

# संयुक्त कामगार संघटनेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश



### कामगार विरोधी श्रम संहितेच्या निषेधार्थ विशाल मोर्चा



**अमरावती/प्रतिनिधी:** संयुक्त कामगार कर्मचारी संघटना कृती समिती व संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने आज गुरुवार १२ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल मोर्चा काढण्यात आला. देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेल्या मोर्चेच्या माध्यमातून जिल्हाधिकारी मार्फत प्रधानमंत्री यांना निवेदन देण्यात आले. इरविन☞(पान २ वर)

# वाढीव वेतनाचा हप्ता तत्काळ अदा करा



### एसटी कामगारांची निदर्शने

**अमरावती/प्रतिनिधी:** राज्य परिवहन महामंडळ येथील कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मांडण्यासाठी गुरुवारी विरोध प्रदर्शन केले.थकबाकीचा हप्ता एस टी महामंडळाने व राज्य सरकारने तत्काळ अदा करावा ही मागणी करण्यात आली. निर्दशने करून सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली.

एसटी कामगारांनी सांगितले की, त्यांना दरमहा दिला जाणारा वाढीव वेतनाचा हप्ता अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे त्यांनी राज्यव्यापी निदर्शने करण्याचा निर्णय घेतला होता. एसटी विभागीय कार्यालया समोर कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने करत आपला निषेध नोंदवला. अनेक कर्मचाऱ्यांनी वाढीव हप्त्याचा विचार करून कर्ज व घरगुती खर्चाचे नियोजन केले होते. अचानक हप्ता थांबल्याने आर्थिक अडचणी वाढली आहे. एसटी कर्मचाऱ्यां मध्ये नाराजीचे ☞(पान २ वर)

# चपराशीपुरा परिसरात स्वच्छता मोहीम

## १६ आस्थापनांची तपासणी, दंड वसूल



**अमरावती/प्रतिनिधी:** महापालिकेच्या वतीने झोन क्र. ३ अंतर्गत दस्तुरनगर परिसरातील चपराशीपुरा चौक येथे विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत प्लास्टिक जप्ती, डस्टबिन तपासणी तसेच हॉटेल वेस्ट☞(पान २ वर)

# स्काय टॉवर अपार्टमेंटमध्ये अडकली अल्पवयीन मुलगी

**अमरावती/प्रतिनिधी**

स्थानिक दयासागर गर्ल्स हॉस्टेल च्या मागच्या साईडला स्काय टॉवर अपार्टमेंट मध्ये राहणारी एक मुलगी सेकंड फ्लोअर मध्ये आपल्याच घरामध्ये आज गुरुवार १२ फेब्रुवारी अडकली होती. याची माहिती तिच्या घरच्यांनी अग्निशमन विभागाला दिली. पथकाने तिथे पोहोचून १० मिनिटाच्या आत देवीशा जयस्वालला बाहेर काढले आणि तिची आई जयश्री जयस्वाल यांच्या स्वाधीन केले.



### अग्निशमन पथकाने काढले बाहेर

माहितीनुसार गुरुवारी दुपारी बारा वाजता स्काय टॉवर अपार्टमेंट मध्ये देवीशा आपल्या घरामध्ये लॉक झाली होती. याची माहिती तिची आई जयश्री जयस्वाल☞(पान २